


जनमाध्यम
paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ अकोला, रविवार १ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४




# इस्त्रायल व अमेरिकेचा इराणवर मोठा हल्ला



## काहीतरी मोठे घडणार...? 'आता अशी शस्त्रे काढू, जी तुम्ही कधी पाहिली नसतील!'

### इराणच्या 'खूंखार' कमांडरची अमेरिकेला धमकी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मध्यपूर्वेत जबरदस्त युद्ध पेटले आहे. वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, इस्त्रायल आणि अमेरिकेने संयुक्तपणे इराणवर मोठा हल्ला केला. यानंतर इराणनेही पलटवार करत अमेरिकेच्या काही ठिकाणांवर आणि इस्त्रायलवर क्षेपणास्त्रे डागली. दरम्यान, इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स (IRGC) चे मेजर जनरल इब्राहिम जबारी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना थेट धमकी दिली आहे. त्यांनी अशा शस्त्रांनी हल्ला करण्यासंदर्भात भाष्य केले आहे, जे अद्याप जगालाही माहीत नाहीत.

**'अशी शस्त्रे काढू, जी तुम्ही कधी पाहिली नसतील'** -खरे तर, ही धमकी क्ष्डक्रञ्च चे मेजर जनरल इब्राहिम जबारी यांनी दिली आहे. धमकी देताना ते म्हणाले, ट्रम्प यांना हे माहित असायला हवे की, आज आम्ही आमच्या जुन्या भांडारातील क्षेपणास्त्रे डागली. आणि आता लवकरच अशा शस्त्रांचे प्रदर्शन करून, जी अमेरिकेनं यापूर्वी कधीही बघितली नसतील. दरम्यान अमेरिका आणि इस्त्रायलच्या हल्ल्यानंतर इराणनेही इस्त्रायलवर अत्यंत भीषण प्रतिहल्ला केला. इराणने आतापर्यंत ७० हून अधिक बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे इस्त्रायलवर डागली. इस्त्रायली संरक्षण दलाने (IDF) या हल्ल्याची पुष्टीही केली. तसेच संपूर्ण देशात हाय-अलर्ट जारी केला. इस्त्रायलची ➪(पान २ वर)

## इराणच्या 51 शाळकरी मुलींचा मृत्यू

*इस्त्रायल-अमेरिकेने इराणमधील साधारण ३० विविध ठिकाणांना लक्ष्य करत भीषण हवाई हल्ले केले. या लष्करी कारवाईदरम्यान इराणमधील एका शाळेवर झालेल्या हल्ल्यात ५१ विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तसेच ६०हून अधिक मुली जखमी झाल्या आहेत. इराणच्या सरकारी माध्यमांनी याला दुजोरा दिला आहे.*







## युद्धामुळे भारताचे वाढले टेन्शन

### 50% तेल पुरवठ्यावर संकटः सोने-चांदी महाग होउ शकते होर्मुज मार्ग बंद झाल्यास 10% निर्यातही धोक्यात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराण आणि इस्त्रायल यांच्यात सुरू झालेल्या युद्धाचा परिणाम भारताच्या तेल, व्यापार, शेअर बाजार आणि सोने-चांदीच्या किमतींवर दिसू शकतो. जर दोन्ही देशांमधील युद्ध आणखी वाढले, तर होर्मुज सामुद्रधुनी बंद होउ शकते. यामुळे भारताला दरमहा होणा-या तेल पुरवठ्याचा अर्धा भाग धोक्यात येईल. याव्यतिरिक्त, भारताची नॉन-ऑइल निर्यात देखील प्रभावित होउ शकते. याचा १०% पेक्षा जास्त भाग या प्रदेशातून पुरवला जातो. तज्ञांचे मत आहे की, युद्ध वाढल्यास कच्च्या तेलाच्या (क्रूड ऑइल) किमती वेगाने वाढू शकतात. तेल महाग झाल्याने महागाई वाढते आणि याचा परिणाम शेअर बाजारावरही होईल. अशा परिस्थितीत बाजारात मोठी विक्री आणि घसरण दिसून येउ शकते. दुसरीकडे, जेव्हा जगात



तणाव वाढतो, तेव्हा गुंतवणूकदार सुरक्षित पर्यायांकडे वळतात. अशा वेळी लोक सोने आणि चांदी खरेदी करण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे त्यांच्या किमतींमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. इराण आणि ओमान दरम्यान स्थित होर्मुज सामुद्रधुनी जगातील सर्वात महत्त्वाचा तेल मार्ग आहे. भारत आपल्या गरजेपैकी ➪(पान २ वर)

## इराणनेही इस्त्रायल-दुबईवर 400 क्षेपणास्त्रे डागली

### इस्त्रायली हल्ल्यात इराणी संरक्षणमंत्र्यांच्या मृत्यूचा दावाः 10 शहरांवर हल्ले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** शनिवारी सकाळी इस्त्रायलने इराणची राजधानी तेहरानसह अनेक शहरांवर मोठा हल्ला केला. सूत्रांच्या हवाल्याने रायटर्सने दावा केला आहे की, इस्त्रायली हल्ल्यात इराणचे संरक्षण मंत्री अमीर नासिरजादेह आणि रिव्होल्यूशनरी गार्ड्स कमांडर मोहम्मद पाकपूर यांचा मृत्यू झाला.

यापूर्वी, इराणी वृत्तसंस्थांनी सांगितले की, दक्षिण इराणमधील एका शाळेत क्षेपणास्त्र पडल्याने ४० विद्यार्थिनींचा मृत्यू झाला आणि ४५ जण जखमी झाले. इस्त्रायलने अमेरिकेच्या सहकार्याने इस्त्रायलने १० इराणी शहरांवर हवाई हल्ले केले. हल्ल्यानंतर, ट्रम्प यांनी एक व्हिडिओ जारी केला ज्यामध्ये म्हटले आहे की इराणवरील हल्ला अमेरिकन नागरिकांच्या संरक्षणासाठी होता. प्रत्युत्तरादाखल, इराणने इस्त्रायलवर सुमारे ४०० क्षेपणास्त्रे डागली आणि कतार, कुवेत, जार्डन, बहरीन, सौदी अरेबिया आणि युएईमधील अमेरिकन तळांना लक्ष्य केले. शिवाय, इराणने युएईच्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या दुबईवरही हल्ला केला.

इस्त्रायलने इराणविरुद्धच्या आपल्या नवीन मोहिमेला 'सिंहाची गर्जना' असे नाव दिले आहे. अल जझीराने अमेरिकन अधिका-यांच्या हवाल्याने वृत्त दिले आहे की ही अमेरिका आणि इस्त्रायलमधील संयुक्त लष्करी कारवाई आहे.अणुशस्त्रांबाबत इराण आणि अमेरिकेत सुरू असलेल्या वाटाघाटी दरम्यान हा हल्ला झाला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर हल्ला करण्याची धमकी दिली आहे. त्यांनी सांगितले की या कारवाईचा उद्देश अमेरिका आणि तिच्या लोकांना धोक्यापासून वाचवणे आहे. ट्रम्प यांच्या मते, अमेरिकन सैन्य इराणचे क्षेपणास्त्र नष्ट करण्याचा आणि त्यांचा क्षेपणास्त्र कार्यक्रम उध्वस्त करण्याचा प्रयत्न करत आहे.









**जनमाध्यम**

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा, रविवार १ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४




# इस्त्रायल व अमेरिकेचा इराणवर मोठा हल्ला



## काहीतरी मोठे घडणार...? ‘आता अशी शस्त्रे काढू, जी तुम्ही कधी पाहिली नसतील!’

### इराणच्या ‘खूंखार’ कमांडरची अमेरिकेला धमकी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मध्यपूर्वेत जबरदस्त युद्ध पेटले आहे. वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, इस्त्रायल आणि अमेरिकेने संयुक्तपणे इराणवर मोठा हल्ला केला. यानंतर इराणनेही पलटवार करत अमेरिकेच्या काही ठिकाणांवर आणि इस्त्रायलवर क्षेपणास्त्रे डागली. दरम्यान, इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स (IRGC) चे मेजर जनरल इब्राहिम जबारी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना थेट धमकी दिली आहे. त्यांनी अशा शस्त्रांनी हल्ला करण्यासंदर्भात भाष्य केले आहे, जे अद्याप जगालाही माहीत नाहीत.

**‘अशी शस्त्रे काढू, जी तुम्ही कधी पाहिली नसतील’** -खरे तर, ही धमकी क्ष्डक्रब्र चे मेजर जनरल इब्राहिम जबारी यांनी दिली आहे. धमकी देताना ते म्हणाले, ट्रम्प यांना हे माहित असायला हवे की, आज आम्ही आमच्या जुन्या भांडारातील क्षेपणास्त्रे डागली. आणि आता लवकरच अशा शस्त्रांचे प्रदर्शन करून, जी अमेरिकेनं यापूर्वी कधीही बघितली नसतील. दरम्यान अमेरिका आणि इस्त्रायलच्या हल्ल्यानंतर इराणनेही इस्त्रायलवर अत्यंत भीषण प्रतिहल्ला केला. इराणने आतापर्यंत ७० हून अधिक बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे इस्त्रायलवर डागली. इस्त्रायली संरक्षण दलाने (IDF) या हल्ल्याची पुष्टीही केली. तसेच संपूर्ण देशात हाय-अलर्ट जारी केला. इस्त्रायलची ➩(पान २ वर)

## इराणच्या 51 शाळकरी मुलींचा मृत्यू

*इस्त्रायल-अमेरिकेने इराणमधील साधारण ३० विविध ठिकाणांना लक्ष्य करत भीषण हवाई हल्ले केले. या लष्करी कारवाईदरम्यान इराणमधील एका शाळेवर झालेल्या हल्ल्यात ५१ विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तसेच ६०हून अधिक मुली जखमी झाल्या आहेत. इराणच्या सरकारी माध्यमांनी याला दुजोरा दिला आहे.*







## युद्धामुळे भारताचे वाढले टेन्शन

### 50% तेल पुरवठ्यावर संकटः सोने-चांदी महाग होउ शकते होर्मुज मार्ग बंद झाल्यास 10% निर्यातही धोक्यात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराण आणि इस्त्रायल यांच्यात सुरू झालेल्या युद्धाचा परिणाम भारताच्या तेल, व्यापार, शेअर बाजार आणि सोने-चांदीच्या किमतींवर दिसू शकतो. जर दोन्ही देशांमधील युद्ध आणखी वाढले, तर होर्मुज सामुद्रधुनी बंद होउ शकते. यामुळे भारताला दरमहा होणाऱ्या तेल पुरवठ्याचा अर्धा भाग धोक्यात येईल. याव्यतिरिक्त, भारताची नॉन-ऑइल निर्यात देखील प्रभावित होउ शकते. याचा १०% पेक्षा जास्त भाग या प्रदेशातून पुरवला जातो. तज्ञांचे मत आहे की, युद्ध वाढल्यास कच्च्या तेलाच्या (क्रूड ऑइल) किमती वेगाने वाढू शकतात. तेल महाग झाल्याने महागाई वाढते आणि याचा परिणाम शेअर बाजारावरही होईल. अशा परिस्थितीत बाजारात मोठी विक्री आणि घसरण दिसून येउ शकते. दुसरीकडे, जेव्हा जगात



तणाव वाढतो, तेव्हा गुंतवणूकदार सुरक्षित पर्यायांकडे वळतात. अशा वेळी लोक सोने आणि चांदी खरेदी करण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे त्यांच्या किमतींमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. इराण आणि ओमान दरम्यान स्थित होर्मुज सामुद्रधुनी जगातील सर्वात महत्त्वाचा तेल मार्ग आहे. भारत आपल्या गरजेपैकी ➩(पान २ वर)

## इराणनेही इस्त्रायल-दुबईवर 400 क्षेपणास्त्रे डागली

### इस्त्रायली हल्ल्यात इराणी संरक्षणमंत्र्यांच्या मृत्यूचा दावाः 10 शहरांवर हल्ले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** शनिवारी सकाळी इस्त्रायलने इराणची राजधानी तेहरानसह अनेक शहरांवर मोठा हल्ला केला. सूत्रांच्या हवाल्याने रायटर्सने दावा केला आहे की, इस्त्रायली हल्ल्यात इराणचे संरक्षण मंत्री अमीर नासिरजादेह आणि रिव्होल्यूशनरी गार्ड्स कमांडर मोहम्मद पाकपूर यांचा मृत्यू झाला.

यापूर्वी, इराणी वृत्तसंस्थांनी सांगितले की, दक्षिण इराणमधील एका शाळेत क्षेपणास्त्र पडल्याने ४० विद्यार्थिनींचा मृत्यू झाला आणि ४५ जण जखमी झाले.इस्त्रायलने अमेरिकेच्या सहकार्याने इस्त्रायलने १० इराणी शहरांवर हवाई हल्ले केले. हल्ल्यानंतर, ट्रम्प यांनी एक व्हिडिओ जारी केला ज्यामध्ये म्हटले आहे की इराणवरील हल्ला अमेरिकन नागरिकांच्या संरक्षणासाठी होता. प्रत्युत्तरादाखल, इराणने इस्त्रायलवर सुमारे ४०० क्षेपणास्त्रे डागली आणि कतार, कुवेत, जार्डन, बहरीन, सौदी अरेबिया आणि युएईमधील अमेरिकन तळांना लक्ष्य केले. शिवाय, इराणने युएईच्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या दुबईवरही हल्ला केला.

इस्त्रायलने इराणविरुद्धच्या आपल्या नवीन मोहिमेला ‘सिंहाची गर्जना’ असे नाव दिले आहे. अल जझीराने अमेरिकन अधिकाऱ्यांच्या हवाल्याने वृत्त दिले आहे की ही अमेरिका आणि इस्त्रायलमधील संयुक्त लष्करी कारवाई आहे.अणुशस्त्रांबाबत इराण आणि अमेरिकेत सुरू असलेल्या वाटाघाटी दरम्यान हा हल्ला झाला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर हल्ला करण्याची धमकी दिली आहे. त्यांनी सांगितले की या कारवाईचा उद्देश अमेरिका आणि तिच्या लोकांना धोक्यापासून वाचवणे आहे. ट्रम्प यांच्या मते, अमेरिकन सैन्य इराणचे क्षेपणास्त्र नष्ट करण्याचा आणि त्यांचा क्षेपणास्त्र कार्यक्रम उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करत आहे.










# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

▪ वाशीम, रविवार १ मार्च २०२६ ▪ मूल्य ४.०० ▪ पृष्ठ १०+४





# इस्त्रायल व अमेरिकेचा इराणवर मोठा हल्ला



## काहीतरी मोठे घडणार...? ‘आता अशी शस्त्रे काढू, जी तुम्ही कधी पाहिली नसतील!’

### इराणच्या ‘खूंखार’ कमांडरची अमेरिकेला धमकी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मध्यपूर्वेत जबरदस्त युद्ध पेटले आहे. वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, इस्त्रायल आणि अमेरिकेने संयुक्तपणे इराणवर मोठा हल्ला केला. यानंतर इराणनेही पलटवार करत अमेरिकेच्या काही ठिकाणांवर आणि इस्त्रायलवर क्षेपणास्त्रे डागली. दरम्यान, इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स (IRGC) चे मेजर जनरल इब्राहिम जबारी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना थेट धमकी दिली आहे. त्यांनी अशा शस्त्रांनी हल्ला करण्यासंदर्भात भाष्य केले आहे, जे अद्याप जगालाही माहीत नाहीत.

**‘अशी शस्त्रे काढू, जी तुम्ही कधी पाहिली नसतील’** -खरे तर, ही धमकी क्ष्डक्र्ब चे मेजर जनरल इब्राहिम जबारी यांनी दिली आहे. धमकी देताना ते म्हणाले, ट्रम्प यांना हे माहित असायला हवे की, आज आम्ही आमच्या जुन्या भांडारातील क्षेपणास्त्रे डागली. आणि आता लवकरच अशा शस्त्रांचे प्रदर्शन करून, जी अमेरिकेनं यापूर्वी कधीही बघितली नसतील. दरम्यान अमेरिका आणि इस्त्रायलच्या हल्ल्यानंतर इराणनेही इस्त्रायलवर अत्यंत भीषण प्रतिहल्ला केला. इराणने आतापर्यंत ७० हून अधिक बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे इस्त्रायलवर डागली. इस्त्रायली संरक्षण दलाने (IDF) या हल्ल्याची पुष्टीही केली. तसेच संपूर्ण देशात हाय-अलर्ट जारी केला. इस्त्रायलची ➪(पान २ वर)

## इराणच्या 51 शाळकरी मुलींचा मृत्यू

*इस्त्रायल-अमेरिकेने इराणमधील साधारण ३० विविध ठिकाणांना लक्ष्य करत भीषण हवाई हल्ले केले. या लष्करी कारवाईदरम्यान इराणमधील एका शाळेवर झालेल्या हल्ल्यात ५१ विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तसेच ६०हून अधिक मुली जखमी झाल्या आहेत. इराणच्या सरकारी माध्यमांनी याला दुजोरा दिला आहे.*







## युद्धामुळे भारताचे वाढले टेन्शन

### 50% तेल पुरवठ्यावर संकटः सोने-चांदी महाग होउ शकते होर्मुज मार्ग बंद झाल्यास 10% निर्यातही धोक्यात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराण आणि इस्त्रायल यांच्यात सुरू झालेल्या युद्धाचा परिणाम भारताच्या तेल, व्यापार, शेअर बाजार आणि सोने-चांदीच्या किमतींवर दिसू शकतो. जर दोन्ही देशांमधील युद्ध आणखी वाढले, तर होर्मुज सामुद्रधुनी बंद होउ शकते. यामुळे भारताला दरमहा होणाऱ्या तेल पुरवठ्याचा अर्धा भाग धोक्यात येईल. याव्यतिरिक्त, भारताची नॉन-ऑइल निर्यात देखील प्रभावित होउ शकते. याचा १०% पेक्षा जास्त भाग या प्रदेशातून पुरवला जातो. तज्ज्ञांचे मत आहे की, युद्ध वाढल्यास कच्च्या तेलाच्या (क्रूड ऑइल) किमती वेगाने वाढू शकतात. तेल महाग झाल्याने महागाई वाढते आणि याचा परिणाम शेअर बाजारावरही होईल. अशा परिस्थितीत बाजारात मोठी विक्री आणि घसरण दिसून येउ शकते. दुसरीकडे, जेव्हा जगात



तणाव वाढतो, तेव्हा गुंतवणूकदार सुरक्षित पर्यायांकडे वळतात. अशा वेळी लोक सोने आणि चांदी खरेदी करण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे त्यांच्या किमतींमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. इराण आणि ओमान दरम्यान स्थित होर्मुज सामुद्रधुनी जगातील सर्वात महत्त्वाचा तेल मार्ग आहे. भारत आपल्या गरजेपैकी ➪(पान २ वर)

## इराणनेही इस्त्रायल-दुबईवर 400 क्षेपणास्त्रे डागली

### इस्त्रायली हल्ल्यात इराणी संरक्षणमंत्र्यांच्या मृत्यूचा दावाः 10 शहरांवर हल्ले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** शनिवारी सकाळी इस्त्रायलने इराणची राजधानी तेहरानसह अनेक शहरांवर मोठा हल्ला केला. सूत्रांच्या हवाल्याने रायटर्सने दावा केला आहे की, इस्त्रायली हल्ल्यात इराणचे संरक्षण मंत्री अमीर नासिरजादेह आणि रिव्होल्यूशनरी गार्ड्स कमांडर मोहम्मद पाकपूर यांचा मृत्यू झाला.

यापूर्वी, इराणी वृत्तसंस्थांनी सांगितले की, दक्षिण इराणमधील एका शाळेत क्षेपणास्त्र पडल्याने ४० विद्यार्थिनींचा मृत्यू झाला आणि ४५ जण जखमी झाले.इस्त्रायलने अमेरिकेच्या सहकार्याने इस्त्रायलने १० इराणी शहरांवर हवाई हल्ले केले. हल्ल्यानंतर, ट्रम्प यांनी एक व्हिडिओ जारी केला ज्यामध्ये म्हटले आहे की इराणवरील हल्ला अमेरिकन नागरिकांच्या संरक्षणासाठी होता. प्रत्युत्तरादाखल, इराणने इस्त्रायलवर सुमारे ४०० क्षेपणास्त्रे डागली आणि कतार, कुवेत, जार्डन, बहरीन, सौदी अरेबिया आणि युएईमधील अमेरिकन तळांना लक्ष्य केले. शिवाय, इराणने युएईच्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या दुबईवरही हल्ला केला.

इस्त्रायलने इराणविरुद्धच्या आपल्या नवीन मोहिमेला ‘सिंहाची गर्जना’ असे नाव दिले आहे. अल जझीराने अमेरिकन अधिकाऱ्यांच्या हवाल्याने वृत्त दिले आहे की ही अमेरिका आणि इस्त्रायलमधील संयुक्त लष्करी कारवाई आहे.अणुशस्त्रांबाबत इराण आणि अमेरिकेत सुरू असलेल्या वाटाघाटी दरम्यान हा हल्ला झाला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर हल्ला करण्याची धमकी दिली आहे. त्यांनी सांगितले की या कारवाईचा उद्देश अमेरिका आणि तिच्या लोकांना धोक्यापासून वाचवणे आहे. ट्रम्प यांच्या मते, अमेरिकन सैन्य इराणचे क्षेपणास्त्र नष्ट करण्याचा आणि त्यांचा क्षेपणास्त्र कार्यक्रम उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करत आहे.










जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

▪ अमरावती, रविवार १ मार्च २०२६ ▪ मूल्य ४.०० ▪ पृष्ठ १०+४




# इस्त्रायल व अमेरिकेचा इराणवर मोठा हल्ला



## काहीतरी मोठे घडणार...? 'आता अशी शस्त्रे काढू, जी तुम्ही कधी पाहिली नसतील!'

### इराणच्या 'खूंखार' कमांडरची अमेरिकेला धमकी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मध्यपूर्वेत जबरदस्त युद्ध पेटले आहे. वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर, इस्त्रायल आणि अमेरिकेने संयुक्तपणे इराणवर मोठा हल्ला केला. यानंतर इराणनेही पलटवार करत अमेरिकेच्या काही ठिकाणांवर आणि इस्त्रायलवर क्षेपणास्त्रे डागली. दरम्यान, इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स (IRGC) चे मेजर जनरल इब्राहिम जबारी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना थेट धमकी दिली आहे. त्यांनी अशा शस्त्रांनी हल्ला करण्यासंदर्भात भाष्य केले आहे, जे अद्याप जगालाही माहीत नाहीत.

**'अशी शस्त्रे काढू, जी तुम्ही कधी पाहिली नसतील'** -खरे तर, ही धमकी क्ष्डक्रब चे मेजर जनरल इब्राहिम जबारी यांनी दिली आहे. धमकी देताना ते म्हणाले, ट्रम्प यांना हे माहित असायला हवे की, आज आम्ही आमच्या जुन्या भांडारातील क्षेपणास्त्रे डागली. आणि आता लवकरच अशा शस्त्रांचे प्रदर्शन करून, जी अमेरिकेनं यापूर्वी कधीही बघितली नसतील. दरम्यान अमेरिका आणि इस्त्रायलच्या हल्ल्यानंतर इराणनेही इस्त्रायलवर अत्यंत भीषण प्रतिहल्ला केला. इराणने आतापर्यंत ७० हून अधिक बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे इस्त्रायलवर डागली. इस्त्रायली संरक्षण दलाने (IDF) या हल्ल्याची पुष्टीही केली. तसेच संपूर्ण देशात हाय-अलर्ट जारी केला. इस्त्रायलची (पान २ वर)

## इराणच्या 51 शाळकरी मुलींचा मृत्यू

*इस्त्रायल-अमेरिकेने इराणमधील साधारण ३० विविध ठिकाणांना लक्ष्य करत भीषण हवाई हल्ले केले. या लष्करी कारवाईदरम्यान इराणमधील एका शाळेवर झालेल्या हल्ल्यात ५१ विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तसेच ६०हून अधिक मुली जखमी झाल्या आहेत. इराणच्या सरकारी माध्यमांनी याला दुजोरा दिला आहे.*







# युद्धामुळे भारताचे वाढले टेन्शन

## 50% तेल पुरवठ्यावर संकटः सोने-चांदी महाग होउ शकते होर्मुज मार्ग बंद झाल्यास 10% निर्यातही धोक्यात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इराण आणि इस्त्रायल यांच्यात सुरू झालेल्या युद्धाचा परिणाम भारताच्या तेल, व्यापार, शेअर बाजार आणि सोने-चांदीच्या किमतींवर दिसू शकतो. जर दोन्ही देशांमधील युद्ध आणखी वाढले, तर होर्मुज सामुद्रधुनी बंद होउ शकते. यामुळे भारताला दरमहा होणाऱ्या तेल पुरवठ्याचा अर्धा भाग धोक्यात येईल. याव्यतिरिक्त, भारताची नॉन-ऑइल निर्यात देखील प्रभावित होउ शकते. याचा १०% पेक्षा जास्त भाग या प्रदेशातून पुरवला जातो. तज्ञांचे मत आहे की, युद्ध वाढल्यास कच्च्या तेलाच्या (क्रूड ऑइल) किमती वेगाने वाढू शकतात. तेल महाग झाल्याने महागाई वाढते आणि याचा परिणाम शेअर बाजारावरही होईल. अशा परिस्थितीत बाजारात मोठी विक्री आणि घसरण दिसून येउ शकते. दुसरीकडे, जेव्हा जगात



तणाव वाढतो, तेव्हा गुंतवणूकदार सुरक्षित पर्यायांकडे वळतात. अशा वेळी लोक सोने आणि चांदी खरेदी करण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे त्यांच्या किमतींमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. इराण आणि ओमान दरम्यान स्थित होर्मुज सामुद्रधुनी जगातील सर्वात महत्त्वाचा तेल मार्ग आहे. भारत आपल्या गरजेपैकी (पान २ वर)

# इराणनेही इस्त्रायल-दुबईवर 400 क्षेपणास्त्रे डागली

## इस्त्रायली हल्ल्यात इराणी संरक्षणमंत्र्यांच्या मृत्यूचा दावाः 10 शहरांवर हल्ले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** शनिवारी सकाळी इस्त्रायलने इराणची राजधानी तेहरानसह अनेक शहरांवर मोठा हल्ला केला. सूत्रांच्या हवाल्याने रायटर्सने दावा केला आहे की, इस्त्रायली हल्ल्यात इराणचे संरक्षण मंत्री अमीर नासिरजादेह आणि रिव्होल्यूशनरी गार्ड्स कमांडर मोहम्मद पाकपूर यांचा मृत्यू झाला.

यापूर्वी, इराणी वृत्तसंस्थांनी सांगितले की, दक्षिण इराणमधील एका शाळेत क्षेपणास्त्र पडल्याने ४० विद्यार्थिनींचा मृत्यू झाला आणि ४५ जण जखमी झाले.इस्त्रायलने अमेरिकेच्या सहकार्याने इस्त्रायलने १० इराणी शहरांवर हवाई हल्ले केले. हल्ल्यानंतर, ट्रम्प यांनी एक व्हिडिओ जारी केला ज्यामध्ये म्हटले आहे की इराणवरील हल्ला अमेरिकन नागरिकांच्या संरक्षणासाठी होता. प्रत्युत्तरादाखल, इराणने इस्त्रायलवर सुमारे ४०० क्षेपणास्त्रे डागली आणि कतार, कुवेत, जार्डन, बहरीन, सौदी अरेबिया आणि युएईमधील अमेरिकन तळांना लक्ष्य केले. शिवाय, इराणने युएईच्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या दुबईवरही हल्ला केला.

इस्त्रायलने इराणविरुद्धच्या आपल्या नवीन मोहिमेला 'सिंहाची गर्जना' असे नाव दिले आहे. अल जझीराने अमेरिकन अधिकाऱ्यांच्या हवाल्याने वृत्त दिले आहे की ही अमेरिका आणि इस्त्रायलमधील संयुक्त लष्करी कारवाई आहे.अणुशस्त्रांबाबत इराण आणि अमेरिकेत सुरू असलेल्या वाटाघाटी दरम्यान हा हल्ला झाला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवर हल्ला करण्याची धमकी दिली आहे. त्यांनी सांगितले की या कारवाईचा उद्देश अमेरिका आणि तिच्या लोकांना धोक्यापासून वाचवणे आहे. ट्रम्प यांच्या मते, अमेरिकन सैन्य इराणचे क्षेपणास्त्र नष्ट करण्याचा आणि त्यांचा क्षेपणास्त्र कार्यक्रम उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करत आहे.






जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त भव्य शोभायात्रा ६ रोजी



**अमरावती/प्रतिनिधीः-** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार जयंती शुक्रवार ६ मार्च रोजी विविध कार्यक्रमाने साजरी करण्यात येणार आहे. या निमित्त दरवर्षी प्रमाणे या वर्षीही शिवसेना शिंदे गटाच्या वतीने भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. ६ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता बुधवारा येथील आझाद हिंद मंडळ परिसरातून ही शोभायात्रा निघणार आहे. १५ ते २० देखावे यामध्ये आकर्षणाचे केंद्र राहणार असल्याची माहिती आज शनिवार २८ फेब्रुवारी रोजी झालेल्या

## शिवसेना शिंदे गटाचे आयोजन

पत्रकार परिषदेमध्ये जिल्हाप्रमुख संतोष बद्रे यांनी दिली.

त्यांनी सांगितले की, बुधवारा मधून निघणारी ही शोभायात्रा सिताराम बिल्डिंग, अंबागेट, गांधी चौक, राजकमल चौक , जयस्तंभ चौक,प्रभात चौक ,जवाहर गेट ,सराफा बाजार, नीलकंठ चौक मार्गे होत बुधवारा येथे विसर्जित होणार आहे. शोभायात्रेमध्ये पंधरा ते वीस विविध देखावे आकर्षण ठरणार आहे. ढोल पथक, उज्जैन येथील सुप्रसिद्ध झांझ पथक शिव, जालना, बाभुळगाव येथील सुप्रसिद्ध संदल, डीजे शोभायात्रा मध्ये रंगत वाढवणार आहे. त्याचबरोबर उंट, घोडे व दिंडी शोभायात्राची रंगत वाढवणार आहेत. जागोजागी आतिश बाजी करण्यात येणार आहे. यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

पत्रकार परिषदेमध्ये संतोष बद्रे यांच्यासोबत अजय महल्ले, राम पाटील ,वेदांत तालन, संजय पळसोदकर, समीर कोरपे, पंकज मुळे, सुरेश चव्हाण, सुरज बर्डे, राजेश पाठक, सुनील राऊत, विवेक पवार, वर्षा भोयर, कोमल बद्रे आदि उपस्थित होते.

# अमरावती रेल्वे उड्डाणपुल निर्मितीसाठी बजेटमध्ये १२५.३७ कोटींची मागणी

**-राजकमल उड्डाणपुलाच्या पुर्नबांधणीचा मार्ग अधिक प्रशस्त**

## आ.सुलभा खोडके यांच्या मागणीला मुख्यमंत्र्यांनी दर्शविली संमती

**मुंबई/प्रतिनिधीः-** गेल्या सहा महिन्यापासून अमरावती मधील रेल्वे उड्डाणपुल सर्वच प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात आल्याने शहरात वाहतूक व रहदारीची मोठी कोंडी निर्माण झाल्याने नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

सदर उड्डाणपुलाच्या पुर्नबांधणीसाठी १२५.३७ कोटींचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. येत्या ६ मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर होणार असल्याने अमरावती रेल्वे उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीसाठी १२५.३७ कोटींच्या निधीची तरतूद करण्याची मागणी अमरावतीच्या आमदार सुलभा संजय खोडके यांनी मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. याबाबत मुख्यमंत्री महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने अमरावती शहरातील राजकमल चौक ते रेल्वे स्टेशन पर्यंत उड्डाणपुलाच्या पुर्नबांधणीचा मार्ग अधिक प्रशस्त झाला आहे.

अमरावती ते बडनेरा या रेल्वे लाईनवर सन १९६३ च्या सुमारास रेल्वे उड्डाणपुलाची निर्मिती करण्यात आली. या उड्डाणपुलावरून शहराच्या चार भागाची वाहतूक जोडली गेली असून अमरावती शहरातील राजकमल चौक, हमालपुरा, रेल्वे स्थानक आणि जयस्तंभ चौकासारख्या महत्त्वाच्या केंद्रांना हा रेल्वे पूल जोडला असल्याने शहरवासीयांना वाहतूक व रहदारीची चांगली सुविधा होत होती. दरम्यान या पुलाचे स्ट्रक्चर ऑडिट मध्ये हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक असल्याचे सांगण्यात आल्याने गेल्या २५ ऑगस्ट २०२५



पासून या पुलावरून सर्वच प्रकारची वाहतूक बंद करण्यात आली. त्यामुळे गेल्या सहा महिन्यापासून शहरात वाहतुकीची प्रचंड कोंडी निर्माण होऊन नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे सुद्धा आ. सुलभा खोडके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अवगत केले.

अमरावतीकरांची रहदारीची समस्या दूर करण्यासाठी आणि सार्वजनिक वाहतूक सुलभ करण्यासाठी शासनाने रेल्वे उड्डाणपुल निर्मिती प्रकल्पासाठी तात्काळ निधी देऊन विहित मुदतीत व गुणवत्तापूर्वक पद्धतीने उड्डाणपुलाचे पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे.


त्यामुळे जुन्या अस्तित्वातील रेल्वे उड्डाण पूलाच्या जागी नवीन रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकामासाठी १२५.३७ कोटींचा निधी लागणार असल्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. सदर रेल्वे उड्डाणपुलाच्या कामास गती देण्यासाठी शासनाने बजेटमध्ये निधी उपलब्ध करण्याची मागणी आ.खोडके यांनी मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे केली आहे.तसेच येत्या ६ मार्च रोजी सादर होणाऱ्या राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये अमरावती आरओबीसाठी १२५.३७ कोटींची तरतूद करण्याची घोषणा करावी,अशी विनंती सुद्धा करण्यात आली. याबाबत मुख्यमंत्रीमहोदयांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने अमरावती शहरातील राजकमल चौक ते रेल्वे स्टेशन पर्यंत उड्डाणपुलाच्या पुर्नबांधणीचा मार्ग अधिक प्रशस्त झाला आहे.

दरम्यान झालेल्या चर्चेमध्ये आमदार सुलभा खोडके यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना सांगितले कि,या संदर्भात आपण मागील डिंसेबर २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात सुद्धा लक्षवेधी लावून धरली होती. तसेच अमरावती महानगर पालिका निवडणुकीच्या अनुषंगाने स्व.अजितदादा पवार हे गेल्या ९ जानेवारी रोजी अमरावती येथे आले असता दादांनी सुद्धा आपल्या भाषणामध्ये अमरावती रेल्वे उड्डाणपुल पुर्नबांधणी प्रकल्पासाठी आगामी मार्च २०२६ च्या बजेट मध्ये निधी देण्याचे आश्वासित केले होते. तेव्हा पासून आपला यासंदर्भात शासनाकडे पाठपुरावा करत आल्याने हे काम आता राज्याधिमंडळाच्या अर्थसंकल्पिय अधिवेशनापर्यंत पोहोचले असल्याचे आमदार महोदयांनी सांगितले. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संमती दर्शविली.

# रंगोत्सवासाठी दर्यापूर शहर सज्ज

## विविध प्रकारचे रंग, पिचकारी आणि आकर्षक साहित्याने बाजारपेठ सजली

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरात रंगपंचमी सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मुख्य बाजारपेठेसह विविध चौकांमधील दुकाने रंगीबेरंगी सजावटीने नटली असल्याने ग्राहकांची गर्दी वाढू लागली आहे.लहान मुलांपासून तरुणांपर्यंत सर्वांसाठी विविध प्रकारचे रंग, गुलाल, हर्बल रंग, आकर्षक पिचकारी, फुगे तसेच रंग उधळण्यासाठी लागणारे साहित्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले आहे. यंदा पर्यावरणपूरक आणि त्वचेला सुरक्षित असलेल्या हर्बल रंगांना विशेष मागणी असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.दुकानदारांनी ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विशेष सवलती जाहीर केल्या असून पारंपारिक प्रतिष्ठानालाच सर्वाधिक पसंती मिळत आहे. बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. रंगपंचमीच्या दिवशी कोणताही अपप्रकार घडू नये यासाठी नागरिकांनी सुरक्षिततेचे नियम पाळावेत, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



एकूणच, रंगपंचमी निमित्त दर्यापूर शहर रंग, आनंद आणि उत्साहाने न्हाऊन निघाले असून सणाच्या स्वागतासाठी सर्वत्र तयारी पूर्ण झाली आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### इस्त्रायल व अमेरिकेचा इराणवर

येरुशलेम, हाइफा आणि शेफेल्लाह यांसारखी मोठी शहरे इराणच्या निशाण्यावर आहेत. येरुशलेममध्ये सायरनच्या आवाजासह नागरिकांना तातडीने 'बॉम्ब शेल्टर'मध्ये जाण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

**हूती आणि हिजबुल्ला युद्धाच्या मैदानात -** या युद्धाचे स्वरूप आता अधिक व्यापक होत चालले आहे. इराणच्या समर्थनार्थ येमेनमधून हूती बंडखोरांनी लाल समुद्रात आणि इस्त्रायलवर बॅलिस्टिक मिसाइल्स डागली आहेत. तसेच लेबन ?नमधून हिजबुल्लानेही हल्ले सुरू केले आहेत.

### युद्धामुळे भारताचे वाढले

बहुतेक कच्चे तेल सौदी अरेबिया, इराक आणि यूएई सारख्या देशांकडून मागवतो, ज्याचा मोठा भाग याच मार्गाने येतो.

आकडेवारीनुसार, भारताला दरमहा मिळणा-या तेल पुरवठ्यापैकी सुमारे ५०% याच मार्गाने येतो. जर इस्त्रायलने इराणच्या तेल ठिकाणांवर हल्ला केला किंवा इराणने हा मार्ग बंद केला, तर पुरवठा साखळी पूर्णपणे थांबेल.

**भारताच्या १०% नॉन-ऑईल निर्यातीवरही संकट-**फक्ततेलच नाही, भारताचा व्यापारही इराण आणि इस्त्रायलमधील युद्धामुळे संकटात आहे. एका अहवालानुसार, भारताच्या एकूण नॉन-ऑईल निर्यातीपैकी १०% पेक्षा जास्त भाग होर्मुजच्या सामुद्रधुनीतूनच जातो. यात बासमती तांदूळ, चहा, मसाले, ताजी फळे, भाज्या आणि अभियांत्रिकी वस्तूंचाही समावेश आहे. पश्चिम आशियातील देशांना (जीसीसी देशांना) होणारी बहुतेक निर्यात याच मार्गाने होते. मार्ग बंद झाल्यास किंवा मालवाहतूक महाग झाल्यास भारतीय निर्यातदारांचा खर्च वाढेल आणि जागतिक बाजारात भारतीय वस्तू महाग होतील. भारताने अलीकडेच होर्मुझच्या सामुद्रधुनीशी जोडलेल्या सागरी मार्गांवर अवलंबून असलेल्या आखाती देशांना सुमारे ४७.६ अब्ज डॉलर किमतीच्या नॉन-ऑईल वस्तू निर्यात केल्या आहेत. हे भारताच्या एकूण ३६०.२ अब्ज डॉलरच्या नॉन-ऑईल निर्यातीपैकी सुमारे १३.२% आहे. हे आकडे दर्शवतात की जर या मार्गांद्वारे होणा-या पुरवठ्यात कोणताही अडथळा आला, तर भारताच्या व्यापारावर किती मोठा परिणाम होउ शकतो.

**कच्च्या तेलाच्या किमती वाढल्यास भारतीय शेअर बाजार कोसळू शकतो.**

भारतीय शेअर बाजारासाठी क्रूड ऑइल म्हणजेच कच्चे तेल नेहमीच एक संवेदनशील घटक राहिले आहे. जर इराण-इस्त्रायल तणावामुळे ब्रेंट क्रूडच्या किमती ८०-८५ डॉलर प्रति बॅरलच्या पुढे गेल्या, तर भारताच्या शेअर बाजारात मोठी विक्री दिसून येउ शकते. शुक्रवारी ब्रेंट क्रूड ऑइलची किंमत २.८७% वाढून ७२.८७ डॉलर प्रति बॅरलवर पोहोचली होती. पेंट, टायर, एव्हिएशन आणि लॉजिस्टिक यांसारख्या क्षेत्रांवर, जे कच्च्या तेलावर अवलंबून आहेत, त्यांच्या मार्जिनवर थेट परिणाम होईल. फॉरेन इन्स्टिट्यूशनल इन्व्हेस्टर्स (FIIs) आधीच भारतीय बाजारातून पैसे काढत आहेत, अशा परिस्थितीत हे युद्ध भू-राजकीय तणाव आणखी वाढवू शकते.

**सोने-चांदीच्या किमतीतही वाढ होउ शकते.**अनिश्चिततेच्या काळात गुंतवणूकदार इक्विटी मार्केटमधून पैसे काढून सोने आणि चांदीसारख्या सुरक्षित गुंतवणुकीकडे वळतात. कमोडिटी तज्ञांचे मत आहे की इराण-इस्त्राईल युद्धामुळे सोने-चांदीच्या किमती नवीन ऊच्चांक गाठू शकतात. जर अमेरिका या युद्धात थेट सहभागी झाला, तर डॉलरच्या तुलनेत सोन्याची मागणी आणखी वाढेल. चांदीची औद्योगिक आणि गुंतवणुकीची मागणी दोन्ही वाढण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे आगामी काळात ती गुंतवणूकदारांसाठी चांगल्या परताव्याचे साधन बनू शकते.

### परतवाडा-धारणी मार्गावर

एका अज्ञात वाहनाने अत्यंत भीषण धडक दिली. ही धडक इतकी जोरदार होती की शोभेलाल तोटे यांचा जागीच मृत्यू झाला, तर रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या बबलू तोटे यांनी रुग्णालयात नेताना वाटेतच अखेरचा श्वास घेतला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक समाजसेवक शुभम खेरडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि रुग्णवाहिका बोलावून जखमींना मदत करण्याचा प्रयत्न केला. मात्र नियतीला काही वेगळेच मान्य होते. आदिवासी बांधवांमध्ये होळीचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. रोजगारासाठी बाहेरगावी गेलेले मजूरही या सणासाठी गावाकडे परतत असतानाच, तोटे कुटुंबावर ओढवलेल्या या संकटामुळे गावात आनंदाऐवजी दुःखाचे वातावरण पसरले आहे. पोलिसांनी याप्रकरणी घटनास्थळाचा रीतसर पंचनामा केला असून धडक देऊन पळून गेलेल्या अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.पुढीत तपास पोलिस करत आहेत.

### पत्नीला सिगारेटचे चटके

त्रास देणे सुरूच ठेवले. तसेच पतीचे दुसऱ्या महिलेशी प्रेमसंबंध असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी पतीसह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

### आयआयएमसीचे क्षेत्रीय

असल्याचे निरीक्षण न्यायालयाने दिले.

उपलब्ध पुराव्यांच्या आधारे गुन्ह्याचे घटक सिद्ध होत नसल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने संबंधित चार्जशीट आणि खटला रद्द केला. त्यामुळे प्रादेशिक संचालक डॉ. अनिल कुमार सौमित्र यांना न्यायालयाकडून पूर्णतः निर्दोष मुक्तता मिळाली.

या निर्णयातून 'कायदा सर्वांसाठी समान आहे' हा घटनात्मक सिद्धांत अधोरेखित झाला आहे. भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाच्या हक्कांचे रक्षण करते आणि सत्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहते, याची पुनःप्रचिती या निकालातून मिळाली आहे.

### महापालिकेच्या आमसभेत

अधिकारी देऊ शकले नाही. यामुळे स्वच्छता अधिका-याला निलंबित करून कंत्राट रद्द करण्याचा सूर आम सभेमध्ये ऐकायला मिळायला. सभेमध्ये नगरसेवक धीरज हिवसे यांनी जुन्या कंत्राटदारासह वर्तमान कोणार्क कंपनीच्या वतीने साफसफाई साठी दिलेल्या नियमांचे उल्लंघन केल्याचे म्हटले. नियमानुसार मनुष्यबळ व मशिनरी उपलब्ध नाही झाली. यामुळे कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. तसेच एक महिन्यापूर्वी निर्वाचित झालेल्या नगरसेवकांना अजून पर्यंत साफसफाई संदर्भात कोणताही रिपोर्ट देण्यात आलेला नाही. यासाठी अधिकारी डॉ.अजय जाधव जबाबदार आहे. त्यांना निलंबित करून स्वच्छता कंत्रदारासोबत झालेला करार रद्द करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली. नगरसेवक बबलू शेखावत यांनी सुद्धा या मुद्द्यावर प्रशासनाला धारेवर धरले आणि प्रशासनाच्या दोगल्या नीतीवर आरोप केले. विरोधी पक्षनेता विलास इंगोले, बबलू शेखावत, मिलिंद चिमोटे, अनिल अग्रवाल, एमआयएमचे सलाउद्दीन, स्नेहा लुल्लासह अनेक नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील स्वच्छते संदर्भातील वस्तू स्थिती सर्वांसमोर मांडली. प्रशासकीय अधिकारी कोणत्या कंत्रटदाराला वाचवण्याचा प्रयत्न करत आहे हा प्रश्नही उपस्थित करण्यात आला. सत्ताधारी पक्षातील नगरसेवक सुरेखा लुंगारे, आशीष अतकरे, मनीष बजाज, महेश मुलचंदानी सह इतरांनी स्वच्छतेच्या मुद्द्यावर नाराजी जाहीर केली. नगरसेवक मिलिंद बाबंल, लवीना हर्षे यांनी सुद्धा प्रभागामध्ये पूर्वी ५५ कर्मचारी कार्यरत होते. ते आता ४० वर पोहोचले हा मुद्दा उचलला. मनुष्यबळ कमी झाल्यामुळे प्रभागातील कामकाजावर परिणाम होत असल्याचेही ते म्हणाले. स्वच्छतेच्या मुद्द्यावर आमसभेमध्ये चांगलाच हंगामा झाला. मिलिंद चिमोटे यांनी सुद्धा अधिकाऱ्यांना चांगलेच फटकारले.

पहिल्या बैठकीत स्वीकृत नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी स्वच्छतेच्या मुद्द्यावर अधिकाऱ्यांना धारेवर धरले. ते म्हणाले की स्वच्छतेची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रभाग निहाय पद्धतीच्या जागी झोन निहाय पद्धतीवर जोर दिला जात आहे. तरीपण शहरात स्वच्छतेची परिस्थिती सुधारण्याचे नाव घेत नाही. मनपा प्रशासनाने संयुक्त कंत्राटासाठी घाई केल्याचे त्यांनी म्हटले. कोणार्क कंपनीला कचरा घरातून संकलित करणे आणि कचरा डेपोपर्यंत पोहोचविण्याचा कंत्राट देण्यात आलेला आहे. पण कचऱ्याचे कंटेनर कंपोस्ट डेपो पर्यंत पोहोचत आहे का, याचे लिखित उत्तर त्यांनी अधिकाऱ्यांकडून मागितले आहे.

### मेळघाटातील सुविधा,

पोलीस अधिकारी महादेव गरुड, तहसीलदार प्रदीप शेवाळे, पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण, सहाय्यक पोलीस निरीक्षक संध्या चव्हाण, गटविकास अधिकारी विजय गायकवाड, गटशिक्षणाधिकारी वैभव लादे आदी उपस्थित होते.

डॉ. भोयर पुढे म्हणाले, बऱ्याच वर्षांनंतर या आदिवासी बहुल भागाचा दौरा करण्याची संधी मिळाली आहे. तसेच या भागातील कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती पाहण्यासाठी धारणी पोलीस स्टेशनला भेट देण्यात आल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी पोलीस प्रशासनाच्या कामकाजाचा आढावा घेतला आणि स्थानिक नागरिकांच्या समस्या तसेच त्यांच्या अपेक्षा जाणून घेतल्या.

स्थानिक आमदार आणि लोकप्रतिनिधी यांच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांसाठी नवीन अभ्यासिका इमारत बांधण्यात आली आहे. या शैक्षणिक सुविधेबद्दल स्थानिक लोकप्रतिनिधींचे कौतुक करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी उपयुक्त ठरणारी पुस्तके वाटप केली. दुर्गम भागातील नागरिकांना आवश्यक असणाऱ्या पायाभूत सोयी-सुविधा पुरवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येणार आहे. मेळघाटचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली योजना राबविण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ.भोयर यांनी धारणी पोलीस स्टेशन येथील पाणपोईचे लोकार्पण केले. तसेच गुन्हे तपास प्रक्रियेला गती देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या फॉरेन्सिक वाहनाचे उद्घाटन केले.

### जिल्हा रुग्णालयातून महिलांचे

असता त्यातील लहान पर्स गायब असल्याचे लक्षात आले.

सदर पर्समध्ये साडेचार ग्रॅम वजनाची सोन्याची 'चावल चेन' (किंमत अंदाजे ६० हजार रुपये) व २ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ६२ हजार रुपयांचा ऐवज होता. घटनेनंतर महिलेने सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### आसेगाव येथे रेतीचा ट्रक

यापुढे ही अशीच कठोर कारवाई सुरू राहील. असा इशारा महसूल विभागाने रेती तस्करांना दिला आहे. या कारवाईमुळे अवैध रेती तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

घटनास्थळी ट्रक आणि त्यातील साहित्याचा रितसर पंचनामा करण्यात येईल.तसेच अवैध रेती व वाहन जप्त करण्यात येईल. गौण खनिज अधिनियमानुसार, जप्त केलेल्या मालाच्या पाचपट दंड आकारला जाऊ शकतो. अवैध उत्खनन असल्यास पोलीसात फौजदारी गुन्हा देखील दाखल केला जाऊ शकतो,असा इशारा देण्यात आला.

### फ्रेजरपुरात हातभट्टीवर पोलिसांचा

फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (क)(फ)(ड) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### नागपुरी गेट हद्दीत ५२ पत्त्यांचा

शाखेचे पथक पोलिस आयुक्तालय हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, नागपुरी गेट पोलीस स्टेशन हद्दीतील गुलिस्ता नगर येथे सार्वजनिक ठिकाणी सोनू पठाण हा आपल्या घराजवळ पत्त्यांचा जुगार खेळवत आहे. माहितीची खातरजमा करून पोलीस पथकाने पंचांसह छापा टाकला असता, आठ जण पत्त्यांचा जुगार खेळताना आढळून आले. आरोपींमध्ये शेख जुनेद शेख नासिर (वय ३३, रा. यास्मिन नगर, अमरावती), मोहम्मद रजिक मोहम्मद कासम (वय ४४, रा. गुलिस्ता नगर, अमरावती), रिझवान खान रहीम खान (वय २९, रा. लालखडी), मोहसीन खान हबीब खान (वय २३, रा. यास्मिन नगर, अमरावती), शेख सोहेल परवेज अब्दुल हाफिज (वय २६, रा. रहमत नगर, अमरावती), काझी फयाजुद्दीन उर्फ बाबा एजाजुद्दीन (वय २८, रा. यास्मिन नगर, अमरावती), आजम खान अजीज खान (वय ३५, रा. रहमत नगर, अमरावती), सोनू खान अहमद खान (वय ३४, रा. गुलिस्ता नगर, अमरावती) यांचा समावेश आहे. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून ९,९४० रुपये रोख रक्कम, अंदाजे ३५,००० रुपये किमतीचे पाच मोबाईल फोन आणि १०० रुपये किमतीचे ताश पत्ते असा एकूण ४५,०४५ रुपयांचा जुगार मुद्देमाल पंचासमोर जप्त केला.

या प्रकरणी नागपुरी गेट पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### रासेगाव घरफोडीचा लागला

असताना १४ ऑगस्ट २०२५ ते २३ फेब्रुवारी २०२६ दरम्यान अज्ञातांनी त्यांच्या बंद घराचे कुलूप तोडून कपाटातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण १२,४४,५०० रुपयांचा ऐवज चोरला होता. या प्रकरणी पथ्रोट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेने तपासाची सूत्रे वेगाने हलवली. गोपनीय माहितीच्या आधारे दर्यापूर बसस्थानक परिसरातून एका संशयित अल्पवयीनाला ताब्यात घेण्यात आले. पालकांसमक्ष चौकशीत त्याने दोन साथीदारांसह गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर उर्वरित दोघांनाही पकडण्यात आले. तपासादरम्यान तिघांच्या ताब्यातून चोरीस गेलेले सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले असून उर्वरित मुद्देमालाच्या शोधासाठी तपास सुरू आहे. ग्रामीण भागातील घरफोड्यांवर अंकुश ठेवण्यासाठी कारवाई अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### परतवाड्यात घरफोडी टोळीचा

सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे सापळा रचला. या तपासात मुन्ना उर्फ संजय कवडे आणि शेखर उईके (रा. कांडली) यांना ताब्यात घेण्यात आले. सुरुवातीला गुन्हा नाकारत असलेल्या आरोपींनी अखेर सखोल चौकशीत गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्या कबुलीजबाबातून व्यंकटेश नगर येथील आणखी एक घरफोडी आणि रहीमापूर हद्दीतून चोरलेली मोटारसायकल याच टोळीची कारस्थाने असल्याचे उघड झाले. आरोपींकडून दागिने, आयफोन आणि चोरीस गेलेली मोटारसायकल असा एकूण १.३० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे तीन वेगवेगळ्या गुन्ह्यांचा एकाच वेळी छडा लागला. पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार व डीबी पथकाने केलेल्या या कारवाईमुळे परतवाडा परिसरात दिलासा निर्माण झाला.

### हरवलेली ३० ग्रॅम सोन्याची

ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने सोन्याची पोत सापडल्याची कबुली दिली. त्याच्या घरातून संबंधित दागिना जप्त करण्यात आला. मिसिंग नोंद करून जप्त केलेली सोन्याची पोत वरिष्ठांच्या उपस्थितीत तक्रारदारांना परत देण्यात आली. तक्रार मिळताच जलद कारवाई करून हरवलेला मुद्देमाल शोधून काढल्याने नागरिकांकडून पोलिसांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

### १५ वर्षीय विद्यार्थिनीला

करून जीवे मारण्याची धमकी दिल्याने शहरात संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणी राजापेठ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून, वंश नरेंद्र मोहोड (वय २१, रा. माया नगर) आणि राहुल सुनील मेश्राम (वय २१, रा. आदर्श नगर) या दोघांना पोलिसांनी अटक केली आहे.

२७ फेब्रुवारी रोजी परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थिनी शाळेसमोर उभी असताना आरोपी वंश मोहोड तिच्याजवळ आला. त्याने हात पकडत अश्लील शिवीगाळ केली व मारहाण केल्याची तक्रार आहे. धास्तावलेल्या मुलीने तेथून निघून घरी जात असताना दोन्ही आरोपींनी तिचा पाठलाग केला.

तक्रारीनुसार, 'तु माझ्या मित्रासोबत लग्न कर, नाहीतर तुझे हाल वाईट होतील,' अशी धमकी राहुल मेश्रामने दिली. त्यानंतर वंश मोहोडने मुलीचा दुपट्टा पकडून 'तु माझी नाही झाली तर तुला कोणाचीही होऊ देणार नाही, जाळून टाकेन,' अशी धमकी दिल्याचे नमूद आहे. या घटनेमुळे घाबरलेल्या विद्यार्थिनीने कुटुंबीयांना माहिती दिल्यानंतर तक्रार नोंदविण्यात आली.

पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या तरतुदींसह पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे आरोपींना तातडीने अटक केली.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला व सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या नेतृत्वाखालील पथकाने झटपट कारवाई करत आरोपींना गजाआड केले. या घटनेनंतर अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, पालक व नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

### खाकीही असुरक्षित! महिला पोलिसाचा

शिपाई म्हणून कार्यरत आहे. ती २०२२ ते २०२५ या कालावधीत आरोपीच्या घराच्या दुसऱ्या मजल्यावर भाड्याने राहत होती. आरोपी खालच्या मजल्यावर कुटुंबासह राहत असतानाही त्याने मर्यादा ओलांडत थेट घरात घुसून अश्लील वक्तव्य केले. 'तू मला खूप आवडतेस, मी तुझ्यावर प्रेम करतो,' असे म्हणत रात्री भेटण्याची मागणी केली. संतप्त झालेल्या महिलेने त्याला चपराक लगावली; मात्र तरीही त्याची हिम्मत कमी झाली नाही. यानंतर २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ड्युटी संपवून महिला घरी जात असताना ऑक्सिजन पार्कजवळ आरोपीने रिक्षा आडवी लावून तिचा मार्ग अडवला. तिचा हात पकडून पुन्हा अश्लील बोलण्याचा प्रयत्न केला. महिलेने जोरदार प्रतिकार करत आरडाओरडा केल्यावरच आरोपी पळून गेला. खाकी वर्दीतील महिला सुरक्षित नसेल, तर सामान्य महिलांची काय अवस्था, असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे. पोलिसांनी आरोपीविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, १ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# नवनिर्वाचित पुलाचा भाग कोसळला : थातूरमातूर काम उघड

## पहाडसिंगी-डोणगाव मार्गावरील प्रकाराने खळबळ; लाखो रुपयांच्या निधीवर डल्ल्याचा आरोप

**खेट्री :** पातूर तालुक्यातील पहाडसिंगी–डोणगाव मुख्य मार्गावरील नव्याने उभारण्यात येत असलेल्या पुलाचा एक भाग काम सुरू असतानाच कोसळल्याने प्रशासनाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर आणि तांत्रिक देखरेखीचा अभाव यामुळे हा प्रकार घडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, संपूर्ण काम 'थातूरमातूर' पद्धतीने सुरू असल्याचे उघड झाले आहे.



या पुलासाठी शासनाकडून लाखो रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी संबंधित अभियंता अनुपस्थित राहत असून संपूर्ण जबाबदारी सुपरवायझरवर सोपवण्यात आल्याचा आरोप आहे. पुलाच्या बांधकामात लोखंडाचे अत्यल्प प्रमाणात वापर, निकृष्ट दर्जाचे सिमेंट आणि इतर साहित्य वापरून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार होत असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

काम सुरू असतानाच पुलाचा काही भाग कोसळल्याने भविष्यात मोठी दुर्घटना घडू शकली असती, असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला. 'निधी खर्च होत असताना देखरेख शून्य आहे. अभियंता फिरकतच नसल्याने शासनाच्या पैशांची उधळपट्टी सुरू आहे,' असा आरोप ग्रामस्थांनी केला.

सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर व राहुल गवई यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी शनिवारी कामाच्या ठिकाणी जाऊन निषेध व्यक्त केला. संबंधित अभियंता, कंत्राटदार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाईची मागणी त्यांनी केली. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणी प्रशासनाकडून उच्चस्तरीय चौकशी समिती गठित करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### अभियंता फिरकेना; वरिष्ठांचे दुर्लक्ष ?

अकोला जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील गावांना बुलढाणा जिल्ह्याशी जोडण्यासाठी हा पूल महत्त्वाचा दुवा ठरणार होता. मात्र, अभियंत्याच्या गैरहजेरीमुळे आणि वरिष्ठांच्या दुर्लक्षामुळे संपूर्ण कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शासनाच्या लाखो रुपयांचा निधी खर्च होऊनही दर्जाहीन कामामुळे पुलाचा भाग कोसळल्याने प्रशासनाची जबाबदारी ठळकपणे पुढे आली आहे.

### 'चौकशी करून कठोर कारवाई करा'

'पहाडसिंगी परिसरात पुलाचे काम सुरू असतानाच त्याचा भाग कोसळणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. ठेकेदार व अभियंता यांची मिलीभगत असल्याचा संशय आहे. चौकशी समिती गठित करून ठेकेदाराचा परवाना रद्द करावा व संबंधित अभियंत्यावर निलंबनाची कारवाई करावी; अन्यथा आंदोलन छेडले जाईल,' अशी भूमिका सामाजिक कार्यकर्ते निलेश कापकर (आलेगाव) यांनी मांडली.

# मुंबईत सोमवारी मोदी हटाव देश बचाव आंदोलन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

'वंचित बहुजनआघाडी' आणि 'राम विचार संघटना' यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २ मार्च रोजी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. मोदी हटाव, देश बचाव या घोषणेखाली होणाऱ्या या आंदोलनात वाशीम जिल्ह्यातून हजारो कार्यकर्त्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा सचिव संतोष सरकटे यांनी केले आहे.

एफस्टीन फाईल संदर्भात पंतप्रधान व काही मंत्र्याचे काही नावे समोर आले आहेत.त्यामुळे संबंधीतांनी तत्काळ राजीनामा देण्यात यावा, या मागणीसाठी सदर आंदोलन करण्यात येणार आहे. याबाबत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार बाळासाहेब आंबेडकर या आंदोलनाची भूमिका घेतली असून विविध समविचार पक्ष संघटनांनी व कार्यकर्त्यांनी २

### हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे जिल्हा सचिव संतोष सरकटे यांचे आवाहन



मार्चच्या आंदोलनासाठी मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल मुंबई येथे सहभागी व्हावे, असे आवाहन पक्षाचे जिल्हा निरीक्षक नतिकोद्दिन खतीब, भास्करराव भोजने, वाशीम जिल्हा सचिव संतोषराव सरकटे, सारनाथ अवचार, अमोल पखाले, गोविंद वर्मा, आशिष सावंत, राहुल अवचार व सर्व तालुका अध्यक्ष व जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी केले आहे.


# NCMC स्मार्ट कार्ड पॉईंटचे थाटामाटात उद्घाटन

■ प्रतिनिधी | रिसोड ■

सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत डिजिटल परिवर्तनाला चालना देणाऱ्या NCMC – नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड स्मार्ट कार्ड पॉईंटचे उद्घाटन गुरुवारी रिसोड बसस्थानक येथे . आगार व्यवस्थापक निलेश बोदडे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.यावेळी वाहतूक निरीक्षक आश्रू काळे व कार्यशाळा अधीक्षक सतीश वाहतूक नियंत्रक ज्ञानेश्वर टोंचर उपस्थित होते.

हा उपक्रम एमएसआरटीसी मार्फत राबविण्यात येत असून प्रवाशांना एकाच कार्डद्वारे तिकीट खरेदी, पेमेंट तसेच शासनमान्य सवलतींचा लाभ घेणे सुलभ होणार आहे. कार्यक्रमास डॉ. रवींद्र मोरे पाटील, आरोग्य व शिक्षण सभापती संतोष भाऊ चराटे, बबन पाटील गारडे, कपिल पाटील कदम, प्रशांत पाटील खराटे, आदींची उपस्थिती लाभली.

# 'मराठी गौरव दिन' उत्साहात साजरा



■ प्रतिनिधी | कारंजा ■

पोहा येथील वेदांत पब्लीक स्कुल मध्ये 'मराठी गौरव दिन' अत्यंत उत्साहात, दिमाखात आणि अभिमानाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक विजय अशोक मालवे होते.

कार्यक्रमाची सुरुवात मराठी भाषेच्या पूजनाने करण्यात आली. मराठी विषयाचे शिक्षक श्री. शिल्पकार तायडे सर व सौ. स्नेहल येवतकर यांनी मराठी भाषेचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व प्रभावी शब्दांत विद्यार्थ्यांसमोर मांडले. 'मराठी ही केवळ भाषा नसून आपल्या संस्कृतीची ओळख आहे,' असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात मराठीचा अभिमानाने व जास्तीत जास्त वापर करण्याचे आवाहन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेवरील प्रभावी भाषणे, ओजस्वी कविता सादरीकरण, अभंगगायन तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत प्राप्त झाली.

कार्यक्रमानिमित्त आयोजित 'किल्ले प्रदर्शन' (इर्दें पेंग्गदह) स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी साकारलेल्या ऐतिहासिक किल्ल्यांच्या देखाव्याने सर्वांची वाहवा मिळवली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयीची आवड, जिज्ञासा आणि संशोधन वृत्ती विकसित होत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनी संजना कोलपे व पल्लवी एकनार यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन करून कार्यक्रमाची सूत्रे समर्थपणे हाताळली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# ३० विद्यार्थी NMMS शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्य शासनाच्या वतीने आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील हुशार विद्यार्थी ना शिष्यवृत्ती देण्यासाठी NMMS ही शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते.शिष्यवृत्ती साठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना दरवर्षी १२००० रु शिष्यवृत्ती ४ वर्ष मिळते . या वर्षी झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत श्री बाकलीवाल विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय वाशिम येथील एकुण तब्बल ३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे मार्फत २८ डिसेंबर २०२५ रोजी Nmms परीक्षा घेण्यात आली होती ,संस्थेचे अध्यक्ष अँड सुरेंद्रकुमार जी बाकलीवाल साहेब यांनी सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शाळेचे प्राचार्य बबनराव बिल्लारी व उपप्राचार्य सुनील दांभिवाल ज्येष्ठ शिक्षक किशोर राठोड यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

# प्रयोगसिद्ध लोककलांचे शाहीर प्रशिक्षण शिबिरात शाहीर रमेश गिरी यांचे प्रभावी व अभ्यासपूर्ण मार्गदर्शन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

दि. २३ फेब्रुवारी रोजी सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबई द्वारा आयोजित प्रयोगसिद्ध लोककलांचे शाहीर प्रशिक्षण शिबिर अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडले. या दिवशी प्रमुख व्याख्याते म्हणून ज्येष्ठ व अनुभवी शाहीर रमेश गिरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीमुळे शिबिरात विशेष उर्जा आणि उत्साह निर्माण झाला.

कार्यक्रमाची सुरुवात शाहीर रमेश गीरी यांनी शिबिर संचालक शाहीर संतोष खडसे छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे कर्मयोगी गाडगेबाबा प्रतीमेचे पूजन करून करण्यात आली. पारंपरिक पद्धतीने पुष्पगुच्छ देऊन शाहीर रमेश गिरी तसेच इतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.



उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. सूत्रसंचालनाद्वारे कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट करण्यात आली आणि सत्रास औपचारिक प्रारंभ झाला.

प्रारंभी शाहीर रमेश गिरी यांनी शाहिरी कलेचे स्वरूप स्पष्ट केले. शाहिरी ही केवळ गायनकला नसून ती समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे, असे त्यांनी सांगितले. शाहीर हा अभ्यासू, संवेदनशील, विचारशील आणि जबाबदार व्यक्तिमत्त्व असला पाहिजे, यावर त्यांनी विशेष भर दिला. समाजातील घडामोडींचा अभ्यास, इतिहासाची जाण, शब्दांची ताकद आणि सादरीकरणातील आत्मविश्वास या गुणांमुळेच खरा शाहीर घडतो, असे त्यांनी नमूद केले. रंगमंचावरील सादरीकरणाबाबत त्यांनी अत्यंत सविस्तर मार्गदर्शन केले. मंचावर उभे राहण्याची पद्धत, देहबोली, चेहऱ्यावरील भाव, श्रोत्यांशी नजरेचा संपर्क, आत्मविश्वासपूर्ण उभरणी यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवले. माईक कसा धरावा, किती अंतर ठेवावे, आवाजातील चढ-उतार कसे नियंत्रित करावे, ओळींमध्ये योग्य ठिकाणी थांबा कसा घ्यावा.

# अखेर आय टी आय कॉलेजला सेवालाल महाराजांचे नामकरण



■ प्रतिनिधी | मानोरा ■

येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला क्रांतिकारी संत सेवालाल महाराज यांचे नाव देण्याचे शासनाचा आदेश पारित होऊन वर्षभराचा कालावधी उलटूनही प्रवेशद्वार,बिल्डिंग व मुख्य प्रवेशद्वारावर औद्योगिक प्रशिक्षण संस्था असेच नाव ठेवण्यात आले होते . मात्र येथील कामकाजासाठी वापरण्यात येणाऱ्या कागदपत्रे व सिक्क्यांवर औद्योगिक प्रशिक्षण संस्था याच नावाने कार्यभार चालू असल्यामुळे येथील परिवर्तन शेतकरी संघटना, गोरसेना सह विविध संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दि २० फेब्रुवारी रोजी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला भेट देऊन शाळेचे नामकरण करण्यासाठी आक्रमक भूमिका घेत दोन दिवसात प्रशासित प्रशासकीय कामकाजात वापरण्यात येणारे कागदपत्रावर क्रांतिकारी संत सेवालाल महाराज व शाळेच्या इमारतीस महाराजांचे नाव न दिल्यास आम्ही नामकरण करणार असल्याची भूमिका घेत निवेदन देताच संस्था प्रशासन खडबडून जागे होत मुख्य प्रवेशद्वारावर नामकरण १६ करत प्रवेशद्वार व इमारतीस येत्या चार दिवसात नामकरण करण्यात येईल व कामकाजातही महाराजांच्या नावाचा उल्लेख करणार असल्याचे पत्र परिवर्तन शेतकरी संघटनेचे मनोहर राठोड यांना दिल्याने पुढील आंदोलन स्थगित करत नामकरण १६ केल्या बाबत समाधान व्यक्त केले.

बहुजनांची काशी म्हणून पोरा देवीच्या विकास होत असल्याने येथील नंगारा भवन हे पर्यटनाचा केंद्रबिंदू बनले असून ही वास्तू व समाजाचा आहे ऐतिहासिक वारसा पाहण्यासाठी देशभरातील पर्यटकाची रेलचेल वाढत असून आता पोहरादेवी वरून रेल्वे मार्गही थोड्या दिवसात सुरू होणार असल्याने जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळत असताना येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या मागील वर्षी शासनाच्या वतीने आदेश पारित करून देवठाणा रस्त्यावरील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला संत सेवालाल महाराजांचे नाव देण्याचे परिपत्रक काढत तसा आदेश पारित केला संस्थेत नामकरण सोहळा ही संपन्न झाला .

# मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**कोळी कारंजा :** गुरुकुल विद्यालय कोळी कारंजा येथे मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी तपोवन गावातून मराठी भाषा जनजागृती रॅली काढून मातृभाषेच्या जतन व संवर्धनाचा संदेश दिला.

रॅलीदरम्यान 'मराठी माझी शान', 'मातृभाषा जपूया', 'मराठीचा अभिमान बाळगूया' अशा विविध घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. मराठी भाषेचा वापर दैनंदिन जीवनात सर्वत्र करावा, असे आवाहन विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांना केले.

यावेळी विद्यालयाने एक आगळावेगळा उपक्रम राबवित पालखीचे आयोजन केले. पालखीत मराठी भाषेतील पौराणिक ग्रंथ ठेवण्यात आले होते.

# खेलो होली, इको फ्रेंडली' उपक्रमाअंतर्गत रंगनिर्मिती कार्यशाळा

## पर्यावरण पूरक होळी साजरी करण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | मानोरा ■

भारतीय संस्कृतीत होळी व धुळवडीस अनन्यसाधारण महत्त्व आहे. यावर्षी २ मार्च सोमवार रोजी होळी तर दि. ३ मार्च मंगळवार रोजी धुळवड साजरी होणार आहे. त्याअनुषंगाने, छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय, म्हसणी येथे दि.२७ फेब्रुवारी रोजी सामाजिक वनीकरण विभाग व हरित सेनेच्या संयुक्त विद्यमाने 'खेलो होली, इको फ्रेंडली' उपक्रमाअंतर्गत रंगनिर्मिती कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी पर्यावरण पूरक होळी साजरी करण्याचे आवाहन करण्यात आले.



होळी साजरी करणाऱ्या तरुणांनी, नागरिकांनी इको फ्रेंडली रंग वापरून पर्यावरणपूरक होळी साजरी करावी या अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय म्हसणी ता.मानोरा येथे शाळा व सामाजिक वनीकरण विभाग ता.मानोरा यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा आयोजित करून 'खेलो होली इको फ्रेंडली' या उपक्रमा अंतर्गत म्हसणी छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयात पर्यावरणपूरक कलर निर्मिती बाबत मार्गदर्शन करून रंग निर्मिती करिता हिरव्या पालेभाज्याचा वापर करावा असे आवाहन करण्यात आले.यावेळी मार्केटमध्ये मिळणारे रंग खरेदी करण्यापेक्षा मुलांनी घरच्या घरी नैसगिक रंगाने पर्यावरणपूरक होळी साजरी करावी हा त्यामागचा उद्देश होता. 'खेलो होली इको फ्रेंडली' या उपक्रमांतर्गत नैसर्गिक रंग निर्मितीचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध नैसर्गिक रंग तयार केलेत.या वेळी हरित सेना शिक्षक शिक्षक राजेश पाटील, वनरक्षक पूजा राठोड, वैशाली राठोड व मुख्याध्यापक प्रविण ठाकरे यांनी मार्गदर्शन केले. होळीसाठी वृक्षतोड केल्याने पर्यावरणावर परिणाम होत असतो, धुळवडीसाठी कृत्रिम रंग वापरल्याने शरीराला विविध प्रकारच्या व्याधी जडतात.

**असे बनवा नेसर्गिक रंग...**

हिरवा रंग- मेहंदीच्या पानांची भुकटी कोणत्याही पिठात मिसळावी दोन चमचे मेहंदी एक लिटर पाण्यात टाकल्यास हिरवा रंग होईल. पालक कोथिंबीर पुदिनाच्यापासून यांच्या पानापासून हिरवा रंग करता येईल.पिवळा रंग - दोन चमचे हळद तेवढ्याच बेसन पिठात मिसळावी किंवा ओला रंग करण्यासाठी दोन लिटर पाण्यात एक चमचा हळद टाकावी.

# विद्याभारती शाळेत विज्ञान दिन उत्साहात



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम येथील विद्याभारती शाळेत २८ फेब्रुवारी विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. भारतात दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिवस चंद्रशेखर वेंकट रमन यांच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. विज्ञान विषयाबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान परिषद तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत हा विज्ञान दिवस साजरा करण्यात येतो.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब लाव्हरे तर प्रमुख पाहुणे म्हणून संचालक सुमित सुरेशराव मिटकरी, मुख्याध्यापक नितेश मिटकरी, पर्यवेक्षक विजय गोटे यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते माता सरस्वती तसेच डॉ.सी.व्ही. रमन यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. यानंतर मान्यवरांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले.त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी विज्ञान दिनानिमित्त आयोजित केलेल्या विज्ञान प्रदर्शनीचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेचे तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष दादासाहेब लाव्हरे यांनी विद्यार्थ्यांना विज्ञानातील प्रयोगांविषयीचे महत्व पटवून दिले.

# चार महिने मोजमाप ठप्प; आमदारांच्या पत्रानंतरच तेल्हारा पं.स.ला जाग!

## कार्ला बु. येथील सिमेंट रस्त्याच्या कामाचे मूल्यांकन रखडले; ठेकेदार-ग्रामस्थांमध्ये संताप

■ प्रतिनिधी | अकोला ■

तेल्हारा पंचायत समिती येथील कारभार पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. मौजे कार्ला बु. येथे वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम पूर्ण होऊन तब्बल चार महिने उलटले, तरी अधिकृत मोजमाप व मूल्यांकन झाले नसल्याने ठेकेदारांसह ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

अधिराज कंस्ट्रक्शनच्या वतीने प्रो. प्रा. सायली जायले यांनी गटविकास अधिकारी, तेल्हारा यांच्याकडे लेखी तक्रार देत गंभीर आरोप केले आहेत. संबंधित कनिष्ठ अभियंत्याकडे वारंवार फोन व संदेश करूनही कोणतीही दखल घेतली गेली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. 'काम पूर्ण असूनही मूल्यांकन होत नसल्याने देयके रखडली आहेत. याचा थेट परिणाम विकासकामांच्या गतीवर होत आहे,' असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, या प्रकरणाला आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या हस्तक्षेपानंतर वेगळे वळण मिळाले आहे. अकोट मतदारसंघाचे आमदार भारसाकळे यांनी २७ जानेवारी २०२६ रोजी पत्र देत संबंधित कामांचे मोजमाप व मूल्यांकन तात्काळ करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर गटविकास अधिकाऱ्यांनी शाखा अभियंता शिला तायडे व कनिष्ठ अभियंता कपिल पवार यांना समन्वयाने काम पूर्ण करण्याचे आदेश काढले.

मात्र, प्रश्न असा उपस्थित होत आहे की, लोकप्रतिनिधींचे पत्र येईपर्यंत प्रशासन झोपेत होते का? विकासकामे वेळेत पूर्ण व्हावीत, निधी अडकू नये आणि ठेकेदारांना आर्थिक फटका बसू नये, ही जबाबदारी संबंधित विभागाची नाही का? चार महिने मूल्यांकन न होणे हा केवळ प्रशासकीय सुस्तपणा की जाणीवपूर्वक विलंब, असा ज्वलंत प्रश्न ग्रामस्थ विचारत आहेत. या संदर्भातील पत्राची प्रत जिल्हा परिषद अकोला चे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनाही पाठविण्यात आली आहे. 'कामात कोणतीही तक्रार निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी,' असे आदेश पत्रात नमूद असले तरी प्रत्यक्षात काम रखडल्याने तक्रारींचा पाऊस सुरू झाल्याचे चित्र आहे. कार्ला बु. येथील रस्त्याचे मूल्यांकन तातडीने होणार की पुन्हा कागदोपत्री आश्वासनेच मिळणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. तेल्हारा पंचायत समितीचा हा कारभार केवळ प्रशासकीय हलगर्जीपणा आहे की यामागे अन्य काही 'अर्थपूर्ण' कारणे दडली आहेत, याची सखोल चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# अजित पवारांचे विमान कोसळण्यापूर्वी झाडाला धडकले

## 'ब्लॅक बॉक्स' आणि 'FDR' खराब, AAIB चा प्राथमिक चौकशी अहवाल समोर

**मुंबई/प्रतिनिधी :** माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताला आता एक महिना पूर्ण झाला असून, या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र अजूनही सुन्न आहे. या भीषण अपघाताच्या कारणांचा शोध घेणा-या विमान अपघात तपास ब्युरोने (AAIB) आपला २२ पानांचा प्राथमिक अहवाल आता प्रसिद्ध केला आहे. या अहवालातून अपघाताच्या वेळची परिस्थिती आणि तांत्रिक त्रुटींबाबत अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत.

**विमान अपघात तपास ब्युरोचा सविस्तर अहवाल-** अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत AAIB ने सादर केलेल्या या २२ पानांच्या अहवालात अपघाताच्या नेमक्या क्षणांचे वर्णन करण्यात आले आहे. अहवालानुसार, अपघातग्रस्त विमान जमिनीवर कोसळण्यापूर्वी एका झाडावर जोरात धडकले होते. या धडकेनंतर विमानाचा ताबा सुटला आणि ते धावपट्टीपासून काही अंतरावर कोसळले.

या अपघातात विमानाचे कॉकपिट आणि केबिन पूर्णपणे नष्ट झाले असून केवळ शेपटीचा भाग सुरक्षित राहिला आहे. दुर्घटनेनंतर विमानाने पेट घेतल्याने मोठी हानी झाली, ज्यामुळे फ्लाईट डाटा रेकॉर्डर देखील उष्णतेमुळे खराब झाला आहे. मात्र, तपासासाठी त्यातील रॉ डाटा डाउनलोड करण्यात तपास यंत्रणेला यश आले आहे.

**दृश्यमानतेचा मोठा अडथळा-** अपघाताच्या वेळी बारामती येथील हवामान आणि दृश्यमानता कशी होती, याची माहिती अहवालात देण्यात आली आहे. व्हिज्युअल फ्लाईट नियमांनुसार (VFR) विमान उतरवण्यासाठी किमान ५ किमी दृश्यमानता असणे आवश्यक असते. मात्र, ज्यावेळी हा अपघात झाला, तेव्हा बारामतीमध्ये दृश्यमानता केवळ ३ किमी इतकीच होती. पुण्याच्या हवामान विभागाने (METAR) तर त्या वेळी केवळ २ किमी दृश्यमानतेची नोंद केली होती. बारामती परिसरात त्या दिवशी धुक्याचे प्रमाण अधिक होते, ज्यामुळे वैमानिकाला धावपट्टीचा अंदाज येण्यात अडचणी आल्या असण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.



**बारामती विमानतळावरील अपु-या सुविधा-** अहवालात बारामती विमानतळावरील सोयीसुविधांबाबत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. बारामती हे एक अनियंत्रित हवाई क्षेत्र असून तेथे अधिकृत हवामान केंद्र (MET facility) उपलब्ध नाही. येथील धावपट्टीच्या खुणा फिकट झाल्या होत्या आणि लँडिंगसाठी आवश्यक असणारी आधुनिक उपकरणे देखील तिथे उपलब्ध नव्हती. विमानतळावर केवळ एका बाजूला विंडसॉक्स होता आणि तिथे अग्निशमन दलाचे युनिट किंवा सीमाभिंत यांसारख्या मूलभूत सुरक्षा यंत्रणांचाही अभाव असल्याचे निष्कर्षात म्हटले आहे.

अहवालातील माहितीनुसार, रनवे ११ च्या ५० मीटर डाव्या बाजूला विमानाचा शेवटचा आघात झाला. हे विमान धावपट्टीवर उतरण्याऐवजी बाजूला असलेल्या झाडांना धडकले आणि त्यानंतर भीषण आग लागली. धावपट्टीवर पसरलेली सैल रेती आणि लँडिंग एड्सची कमतरता यामुळे ही परिस्थिती ओढवली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. प्रशिक्षण अकादमीच्या कर्मचा-यांनी केलेल्या दृश्यमानतेच्या मूल्यांकनावरच विमानाचे लँडिंग अवलंबून होते, जे तांत्रिकदृष्ट्या अपुरे ठरले.

## बँकेतील नोटा घेउन जाणारे विमान कोसळले; 15 ठार

**बोलिव्हिया/वृत्तसंस्था :** बोलिव्हियाच्या राजधानीजवळ शुक्रवारी पैसे घेउन जाणारे एक मालवाहू विमान कोसळले. त्यामुळे महामार्गावरील सुमारे १२ वाहनांचे नुकसान झाले. विमान कोसळल्यानंतर नोटा जमिनीवर विखुरल्या गेल्या होत्या. या अपघातात १५जणांचा मृत्यू झाला. यात अनेकजण जखमी झाले आहेत. रायटर्सच्या वृत्तानुसार, शुक्रवारी संध्याकाळी बोलिव्हियाची राजधानी ला पाझजवळील एल अल्टो शहरात खराब हवामानामुळे एक विमान कोसळले. देशाच्या मध्यवर्ती बँकेतून नवीन नोटा घेउन जाणारे बोलिव्हियन एअर फोर्स हर्क्युलस विमान एका वर्दळीच्या रस्त्यावर कोसळल्याने पंधरा जणांचा मृत्यू झाला. यात किमान ३० जण जखमी झाले आहेत.सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हीडीओनुसार, विमानाने ला पाझला लागून असलेल्या एल अल्टो शहरात वाहनांना धडक दिली आणि नंतर ते एका शेतात कोसळले. विमान कोसळले तेव्हा ते उड्डाण करत होते की लँडिंग करत होते याबद्दल परस्परविरोधी वृत्त आहे.



**कोसळल्यानंतर विमानाला लागली आग-** विमानातील सामान, गाड्यांचा झालेला चुराडा आणि मृतदेह रस्त्यावर पडले होते. किमान १२ वाहने या विमानाखाली दबली गेली. विमानाला लागलेली आग विझविण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. बोलिव्हियन हवाई दलाचे हे विमान सेंट्रल बँकेतून इतर शहरांमध्ये नवीन नोटा घेउन जात होते. अपघातस्थळी मोठ्या प्रमाणात नोटा जमिनीवर विखुरल्या होत्या. समोर आलेल्या व्हीडीओनुसार, विमान कोसळल्यानंतर घटनास्थळी नोटांचा खच साचला होता. या नोटा गोळा करण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. मात्र, घटनास्थळी पोलिसांनी कडक सुरक्षा तैनात केली आहे.

## माध्यम प्रतिनिधींना तातडीच्या प्रसंगी वैद्यकीय मदतीसाठी 2 रुग्णवाहिका समर्पित

**मुंबई/प्रतिनिधी :**समाज आणि देशाच्या व्यापक हितासाठी पत्रकार सातत्याने संवेदनशील, आव्हानात्मक आणि अनेकदा धोकादायक परिस्थितीत काम करत असतात. नैसर्गिक आपत्ती, अपघात, दंगली किंवा इतर संवेदनशील भागात वार्तांकन करताना कधी कधी तातडीच्या वैद्यकीय मदतीची आवश्यकता भासू शकते. अशा प्रसंगी त्वरित आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी यासाठी माध्यम प्रतिनिधींसाठी समर्पित रुग्णवाहिका सेवा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मात्र कोणत्याही पत्रकार अथवा प्रतिनिधींवर ही रुग्णवाहिका वापरण्याची वेळ येउ नये, अशी अपेक्षा अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. विधान भवन प्रांगणात महाराष्ट्र टीव्ही जर्नलिस्ट असोसिएशन यांच्यासाठी दोन सुसज्ज अम्बुलन्सचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, आर बी जी फाउंडेशनच्या अध्यक्षा मधुरा गेठे तसेच असोसिएशनचे अध्यक्ष उदय जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या रुग्णवाहिका केवळ पत्रकारांसाठीच नव्हे तर गरज पडल्यास इतर रुग्णांनाही उपयोगी पडतील. त्यामुळे सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव अधिक दृढ होईल. समाजासाठी आरोग्यसेवेच्या क्षेत्रात उचललेले हे पाउल निश्चितच कौतुकास्पद असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. दैनंदिन घडामोडींचे वार्तांकन करणारे पत्रकार आणि कॅमेरामन यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आर बी जी फाउंडेशन यांच्या पुढाकारातून आणि लालबागचा राजा गणेशोत्सव मंडळ यांच्या सहकार्याने या ॲम्बुलन्स सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.यावेळी असोसिएशनचे महासचिव पंकज दळवी, कार्यकारिणी सदस्य मनश्री पाठक, मनाली गायकवाड, राजेश साफळे, अनिल सौंदडे तसेच विधान भवनातील मीडिया प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे पत्रकारांच्या सुरक्षिततेस आणि आरोग्य संरक्षणास बळकटी मिळणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## राज्यातील विमानतळांची विकासकामे कालबद्ध गतीने पूर्ण करावी- मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** आशियातील सर्वात मोठे प्रस्तावित वाढवण बंदर राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी निर्णायक ठरणार आहे. या बंदराला रस्ता, रेल्वे आणि वायुमार्गाने प्रभावीपणे जोडण्यासाठी समन्वयित पावले उचलली जात आहेत. वाढवण व विरार परिसरात नवीन ग्रीनफिल्ड विमानतळ विकसित करण्यासाठी तातडीने जागा निश्चिती करण्यात यावी, तसेच राज्यातील विविध विमानतळांच्या विकासकामांना कालबद्ध गती देण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले.

विधिमंडळातील समिती कक्षात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणच्या संचालक मंडळाची ९३ वी बैठक पार पडली. बैठकीस महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, प्राधिकरणाच्या व्यवस्थापकीय संचालक तथा उपाध्यक्ष स्वाती पांडेय, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डा. विजय सिंघल तसेच मिहानचे सहव्यवस्थापकीय संचालक डा. विपीन विटणकर उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,



गडचिरोली जिल्हा देशातील महत्त्वपूर्ण स्टील उद्योग केंद्र म्हणून विकसित होत असून, या औद्योगिक वाढीला चालना देण्यासाठी तेथे लवकरच ग्रीनफिल्ड विमानतळ उभारण्यात येणार आहे. औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे वाढती वाहतूक आणि लाजिस्टिक गरजा लक्षात घेता आधुनिक विमानतळ सुविधा आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. बैठकीत नांदेड, सिंधुदुर्ग आणि नागपूर येथील कार्यरत विमानतळांच्या सुविधा विस्तार व आधुनिकीकरणाचा आढावा घेण्यात आला. प्राधिकरणाच्या वतीने राज्यातील नउ विमानतळांच्या विकासकामांबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले.

**मिहान विकासासाठी ५९७ कोटींची मंजुरी; २९७ कोटी वितरित**

मिहान येथे अनेक उद्योग व प्रकल्प कार्यान्वित झाले असून, पतंजली आयुर्वेदचाही प्रकल्प सुरू झाला आहे. तसेच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट नागपूर, कमर्शियल काम्प्लेक्स, महाराष्ट्र ॲग्रो डेव्हलपमेंट कंपनी, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर, सेझबाह्य क्षेत्रातील हेल्थकेअर सुविधा, कार्गो हब आणि इलेक्ट्रिक वाहनांसाठी ई-व्ही चार्जिंग स्टेशन यांसारख्या प्रकल्पांची माहिती यावेळी देण्यात आली. मिहानच्या सर्वांगीण विकासासाठी ५९७ कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली असून, त्यापैकी २९७ कोटी रुपये उपलब्ध करून देण्यात आले आहेत. १२ कोटी ३८ लाख रुपये खर्चाचा ३९ एमएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया (एसटीपी) प्रकल्प उभारण्यात येत आहे. शिवणगाव आणि वित्तुबाबानगर परिसरातील पायाभूत सुविधांसाठी ९९ कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

## फटाक्यांच्या फॅक्ट्रीत प्रचंड स्फोट; 18 जणांचा मृत्यू

**बंगळुरु/वृत्तसंस्था :**आंध्र प्रदेशच्या काकीनाडा जिल्ह्यातून एक अत्यंत हृदयद्रावक बातमी समोर येत आहे. काकीनाडा जिल्ह्यातील वेत्लापलेम गावात असलेल्या एका फटाक्याच्या कारखान्यात शनिवारी भीषण स्फोट झाला. या स्फोटात आतापर्यंत १८ जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण गंभीर जखमी झाल्याचे समजते. दरम्यान, मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती, आंध्र प्रदेशच्या गृहमंत्री वंगालापुडी अनीता यांनी या घटनेची माहिती देताना व्यक्त केली.



**'स्फोटातील जखमींपैकी अनेकांची प्रकृती अत्यंत गंभीर'** - गृहमंत्री अनीता यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'आम्हाला मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार १८ जणांचा मृत्यू झाला आहे, तर सहा जण गंभीररीत्या भाजले आहेत. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.' तसेच, जिल्हा दंडाधिकारी सगीली शान मोहन यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्फोटातील जखमींपैकी अनेकांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे समजते. अधिकृत माहितीनुसार, स्फोट झाला, तेव्हा कारखान्यात सुमारे २० जण काम करत होते.

**मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी व्यक्तकेला शोक, दिले महत्वाचे नर्देश...** - दरम्यान, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी या घटनेवर तीव्र दुःख व्यक्तकेले. सोशल मीडिया प्लॅटफार्म 'X' वर पोस्ट करत ते म्हणाले, 'वेत्लापलेम गावातील फटाका कारखान्यात झालेली ही दुर्घटना अत्यंत दुर्दैवी आहे.' त्यांनी तत्काळ जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधून बचावकार्याचा आढावा घेतला आणि पीडितांना सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्र्यांनी वरिष्ठ अधिकारी आणि मंत्र्यांना घटनास्थळी भेट देण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच, सरकार प्रभावित कुटुंबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचा विश्वासही त्यांनी दिला आहे.

## देशव्यापी राष्ट्रव्यापी एचपीव्ही लसीकरण मोहीमेचा प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते शुभारंभ

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथून दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थिती

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताच्या 'नारी शक्ती' ला सबळ करण्यासाठी आणि माता व मुलींच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. महिलांच्या आरोग्य आणि सन्मानाबाबत सरकारची संवेदनशील भूमिका असून संवेदनशीलतेची संस्कृती निर्माण करण्याच्या दिशेने हे पाउल असल्याचे गौरवोद्गगार प्रधानमंत्री नरेंद्र मोदीं यांनी काढले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अजमेर येथून देशव्यापी एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ केला. या समारंभासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुंबई येथून दूरदृष्यप्रणालीदवारे उपस्थित होते. यावेळी 'वर्षा' निवासस्थानी वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड अशिष जयस्वाल, अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी उपस्थित होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, कुटुंबात आई आजारी पडली तर संपूर्ण घर विस्कळीत होते. आई निरोगी असेल तर कुटुंब कोणत्याही संकटाला सामोरे जाउ शकते. या भावनेतून सरकारने महिलांना आधार देण्यासाठी अनेक योजना राबवत आहे ऊज्ज्वला गॅस योजना, सॅनिटरी पॅड उपलब्धता आणि शौचालय उभारणी यांसारख्या मिशन मोड उपक्रमांचा उल्लेख करुन ते म्हणाले, सुरक्षित मातृत्व योजनेअंतर्गत गर्भावस्थेदरम्यान पौष्टिक आहारासाठी महिलांच्या खात्यात ५,००० रुपये जमा केले जात आहेत.



**१७ हजार कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन-**या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वीज, पाणी, रस्ते, आरोग्य आणि शिक्षण यासह सुमारे १७,००० कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली. पायाभूत सुविधांबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, रस्ते, रेल्वे आणि हवाई संपर्काद्वारे आधुनिक जोडणीमुळे राजस्थानचे भवितव्य बदलत आहे. दिल्ली-मुंबई औद्योगिक कारिडारच्या परिसरात उभारल्या जाणा-या पायाभूत सुविधांमुळे राजस्थान जागतिक गुंतवणुकीसाठी संधींची भूमी बनत आहे असे प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितले. राजस्थानमध्ये सूर्यप्रकाशापासून समृद्धी मिळविण्याची क्षमता त्यांनी अधोरेखित केली. पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजनेअंतर्गत, सरकार छतावरील सौर पॅनेल बसवण्यासाठी ७८,००० रूपयांची मदत देते, असेही त्यांनी सांगितले. प्रत्येक कुटुंबाला समृद्ध जीवन मिळेल अशा 'विकसित राजस्थानपासून विकसित भारत' या मंत्राचा पुनरुच्चार करून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राजस्थानच्या विकास प्रवासातील या प्रदेशाच्या सांस्कृतिक आणि शौर्यपूर्ण वारशाबद्दल गौरवोद्गार काढले.

## अवकाळीचे संकट टळले, उन्हाची तीव्रता वाढली

**मुंबई /प्रतिनिधी-**मागच्या काही दिवसांपासून राज्यातील हवामानात सतत बदल होताना दिसत आहे. कधी पाउस, कधी उकाडा अशी स्थिती आहे. मागच्या चार ते पाच दिवसांपासून अवकाळी पाउस राज्यात धुमाकूळ घालताना दिसला. सतत पाउस सुरू होता. गारपिटीमुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले. आता राज्यावरील अवकाळीचे संकट दूर झाले असून उन्हाचा कडाका वाढला आहे. आजही तापमानात सतत चढ-उतार बघायला मिळत आहेत.जानेवारीमध्ये राज्यात पाउस झाला. त्यानंतर राज्यातील थंडी गायब झाली. फेब्रुवारी महिन्यात राज्यात हवामानात मोठा बदल होताना दिसला. थंडी, पाउस आणि उकाडा असे तिन्ही हंगाम अनुभवता आले.



राज्यात उकाडा वाढू लागला आहे. दुपारच्या वेळी घराबाहेर पडणेही कठीण झाले आहे. उन्हाचा चटका अधिक तीव्र होण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. पंजाबच्या भटिंडा येथे देशातील नीचांकी तापमानाची नोंद झाली. भटिंडा येथे १० अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.धुळ्यात राज्यातील नीचांकी तापमानाची नोंद झाली. धुळ्यात १२.२अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. अकोला येथे राज्यातील उच्चांकी तापमानाची नोंद झाली. अकोला येथे ३६.३ सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. शहरासह पुणे जिल्ह्यात मागील दोन दिवसांपासून सातत्याने घटत असलेल्या किमान तापमानात शुक्रवारी दोन ते तीन अंशाने वाढ झाली. परिणामी पहाटेचा गारवा कमी झाला असून दिवसभरात कमाल तापमानातही वाढ झाल्यामुळे दुपारचा उन्हाचा चटका चांगलाच वाढला होता. लोहगाव येथे सर्वाधिक ३५अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. मागील आठवड्यात शहरासह जिल्ह्यात उन, ढगाळ वातावरण आणि गारवा असा हवामानाचा लपंडाव सुरू आहे. दोन दिवसांपासून पहाटे जाणवणारी थंडी गायब झाली आहे.

## आखाती देशातील भारतीय नागरिकांना मार्गदर्शक सूचना

**मुंबई/प्रतिनिधी :** इराण-इस्रायल युद्धाच्या पार्श्वभूमीवर, संयुक्त अरब अमिराती (यूएई) मधील सर्व भारतीय नागरिकांना विनाकारण प्रवास टाळण्याचा, आवश्यक ती काळजी घेण्याचा, सतर्क राहण्याचा तसेच यूएईच्या अधिका-यांकडून आणि दूतावासाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या सुरक्षा मार्गदर्शक सूचना व सल्ल्यांचे पालन करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. अबू धाबी येथील भारतीय दूतावास आणि दुबई येथील वाणिज्य दूतावास नेहमीप्रमाणे कार्यरत असून कोणत्याही आपत्कालीन चौकशीसाठी यूएईमधील भारतीय नागरिकांनी पुढील क्रमांकांवर संपर्क साधावा: टोल-फ्री क्रमांक: ८००-४६३४२, व्हाट्सॲप: +971543090571, ईमेल: pbsk.dubai@mea.gov.in आणि ca.abudhabi@mea.gov.in

**तेल अवीव-** सुरक्षा परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, इस्रायलमधील सर्व भारतीय नागरिकांना अत्यंत सावधगिरी बाळगण्याचा आणि सर्व वेळ सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. इस्रायलमधील भारतीय नागरिकांनी इस्रायली अधिका-यांकडून आणि होम फ्रंट कमांडकडून जारी करण्यात आलेल्या सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांचे आणि सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असा कडक सल्ला देण्यात आला असून अद्ययावत सूचना खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत: https://www.oref.org.il/eng. सर्व भारतीय नागरिकांनी नियुक्त आश्रयस्थळांच्या जवळ राहावे तसेच आपल्या निवासस्थान किंवा कार्यस्थळाजवळील संरक्षित जागांची माहिती करून घ्यावी. पुढील सूचना मिळेपर्यंत इस्रायलमधील सर्व अनावश्यक व गैर-आवश्यक प्रवास टाळावा, असा सल्ला देण्यात आला आहे. संपर्क साधावा: दूरध्वनी: +972-54-7520711;+972-54-2428378,ई-मेल: cons1.telaviv@mea.gov.in

**दोहा-**कतारमधील सर्व भारतीय नागरिकांना आवश्यक ती काळजी घेण्याचा तसेच दूतावास आणि स्थानिक प्रशासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणा-या बातम्या व सल्ल्यांचे पालन करण्याचा सल्ला देण्यात आला असून दूतावास नेहमीप्रमाणे कार्यरत आहे. दूतावासाचा २४X७ हेल्पलाईन क्रमांक: ००९७४-५५६४७५०२ असून, कोणत्याही चौकशीसाठी ईमेल: cons.doha@mea.gov.in वर संपर्क साधावा.

**तेहरान-**इराणमधील सर्व भारतीय नागरिकांना अत्यंत सावधगिरी बाळगण्याचा, अनावश्यक हालचाली टाळण्याचा आणि शक्य तितक्या घरातच राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. भारतीय नागरिकांनी बातम्यांवर लक्ष ठेवावे, परिस्थितीचीबाबत जागरुक रहावे. भारतीय दूतावासाकडून येणा-या पुढील सूचनांची प्रतीक्षा करावी. दूतावासाचे आपत्कालीन संपर्क तपशील पुढीलप्रमाणे +989128109115 +989128109109

**रियाध-**सौदी अरेबियाच्या राज्यात सध्या वास्तव्यास असलेल्या सर्व भारतीय नागरिकांना सतर्क राहण्याचा, सौदी अरेबियामध्ये प्रचलित असलेल्या सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करण्याचा तसेच स्थानिक प्रशासन आणि दूतावासाकडून जारी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रियाध येथील भारतीय दूतावास आणि जेद्दा येथील वाणिज्य दूतावास नेहमीप्रमाणे कार्यरत आहेत आणि आवश्यकतेनुसार पुढील अद्यतने व सल्ले जारी करतील. रियाध येथील भारतीय दूतावासाचे २४न७ आपत्कालीन हेल्पलाईन क्रमांक खालीलप्रमाणे: ००-९६६-११-४८८४६९७, ००-९६६-५४२१२६७४८ (फक्तव्हाट्सॲप), ८०० २४७ १२३४ (टोल-फ्री), ईमेल: cw.riyadh@mea.gov.in

## इराण-इस्रायल युद्धामुळे एअर इंडियाचे विमान मुंबईला परतले

### दिल्लीहून इस्रायलला जात होते विमान; एअर इंडिया-इंडिगोची उड्डाणे रद्द

**मुंबई/प्रतिनिधी :** इस्रायल आणि अमेरिकेने इराणवर केलेल्या हल्ल्यादरम्यान, दुबईतील प्रसिद्ध आणि जगातील सर्वात उंच इमारत असलेल्या बुर्ज खलिफाजवळ ड्रोन हल्ला झाला. या ठिकाणी स्फोटांचे आवाज ऐकू आले. दरम्यान, बुर्ज खलिफा आधीच रिकामी करण्यात आली होती. हल्ल्यानंतर, दुबईचे सर्व विमानतळ बंद करण्यात आले आहेत. दुबईला जाणारे आणि येणारे सर्व उड्डाणे अनिश्चित काळासाठी रद्द करण्यात आली आहेत.हल्ल्यानंतर एअर इंडिया आणि इंडिगोने मध्य पूर्वेला जाणारे त्यांचे उड्डाण ऑपरेशन देखील स्थगित केले आहेत. अधिक माहितीसाठी एअर इंडियाने अ९१ ११६९३२९३३३ आणि अ९१११६९३२९९९९ हे क्रमांक देखील जारी केले आहेत. हवाई क्षेत्र बंद असल्याने, एअर इंडियाने त्यांची दिल्ली-तेल अवीव विमान उड्डाणे मुंबईकडे वळवली. दरम्यान, इंडिगोची तिरुचिरापल्ली-दुबई विमान उड्डाणे परतली आहेत. खरं तर, इस्रायलने इराणची राजधानी तेहरानसह अनेक शहरांवर हल्ला केला आहे. भारतीय वेळेनुसार, शनिवारी सकाळी तेहरानसह अनेक शहरांमध्ये स्फोटांचे आवाज ऐकू आले आणि हवाई हल्ल्यांचे सायरन वाजत आहेत. इराणनेही इस्रायलवर प्रतिहल्ले सुरू केले आहेत. मीडिया रिपोर्टनुसार, इराणने प्रत्युत्तर म्हणून सुमारे ४०० क्षेपणास्त्रे डागली आहेत. एअर इंडियाने सांगितले की, आम्ही आमच्या विमान उड्डाणांच्या सुरक्षिततेच्या वातावरणाचे मूल्यांकन करत राहू आणि गरजेनुसार ऑपरेशनमध्ये आधीच बदल करू. फ्लाइट ट्रॅकिंग वेबसाइट Flightradar24.com वर उपलब्ध माहितीनुसार, बोइंग ७७७ विमानाने चालवलेले हे उड्डाण पाच तासांपेक्षा जास्त काळ हवेत होते आणि एअरलाइनने सौदी अरेबियाच्या हवाई हद्दीत प्रवेश केल्यावर परत फिरण्याचा निर्णय घेतला. एअर इंडियाने या अचानक उद्भवलेल्या परिस्थितीमुळे प्रवाशांना झालेल्या त्रासाबद्दल खेद व्यक्त केला. दरम्यान, इंडिगोने सांगितले की, ते इराण आणि त्याच्या हवाई हद्दीशी संबंधित प्रादेशिक घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.




## लिफ्ट बंद, धुराचे लोट आम्हाला वाचवा

### भारतीयाची मोदींना आर्त विनंती; स्फोटांनी हादरले बहरीन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**अमेरिका आणि इस्रायलने इराणवर हल्ला केल्यानंतर तेहरानने आखाती देशांतील अमेरिकन मालमत्तांना लक्ष्य करत प्रत्युत्तर दिले. त्या पार्श्वभूमीवर तेथे राहणा-या भारतीयांशी व्हिडिओ संवाद साधण्यात आला. हरियाणाचा रहिवासी असलेला युनुसने बहरीनमधील वाढत्या सुरक्षा परिस्थितीचे धक्कादायक तपशील आणि प्रत्यक्ष अनुभव सांगितले. इंडिया टुडेशी बोलताना त्याने ही माहिती दिली. सकाळी ११.३० वाजता मंत्रालयाकडून सर्वांनी सुरक्षित आश्रयस्थानी जावे, असा इशारा मिळाला, असे गेल्या तीन वर्षांपासून बहरीनमध्ये राहणा-या या आयटी व्यावसायिकाने सांगितले. सुमारे १०-१५ मिनिटांतच मोठा स्फोट ऐकू आला आणि



परिसरात घबराट पसरली. त्यांच्या इमारतीतील लिफ्ट बंद पडल्याने परिस्थिती अधिकच गोंधळाची झाली, असे त्याने सांगितले. लिफ्ट थांबल्या. आम्हाला पाय-यांचा वापर करून तात्काळ इमारत खाली करण्यास सांगण्यात आले. त्यानंतर आणखी काही स्फोटांचे आवाज ऐकू आले, असंही तो म्हणाला. त्यावेळी आकाशात धुराचे मोठे लोट उठताना दिसत होते.

### भारतात येण्यासाठी विमान नाही

रस्त्यांवर चिंताग्रस्त नागरिकांची वर्दळ वाढली होती. हजारो लोक विमानतळाकडे रवाना झाले; परंतु बहरीनसह मध्य पूर्वेतील अनेक देशांनी आपले हवाई क्षेत्र तात्पुरते बंद केले आहे. सध्या भारतात परतण्यासाठी कोणतीही उड्डाणे उपलब्ध नाहीत. परिस्थिती स्थिर झाल्यावर भारतात परतण्याची माझी योजना आहे, असे तो म्हणाला. बहरीनमध्ये सुमारे ३.५ लाख भारतीय नागरिक राहतात, ज्यामुळे तेथील भारतीय समुदाय हा सर्वात मोठा प्रवासी समुदाय आहे. युनुस यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारला परत येउ इच्छिणा-या भारतीयांना सुरक्षितपणे बाहेर काढण्याची विनंती केली. सरकारने आम्हाला बाहेर काढावे. अनेक भारतीयांना आश्रयस्थाने कुठे आहेत, याची माहिती नाही, अशी त्यांची मागणी आहे.

## अवैध प्रवासी वाहतूक रोखा मोहीम आजपासून

### कठोर अंमलबजावणी मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

**मुंबई :** राज्यभरात वाढत चाललेल्या अवैध प्रवासी वाहतुकीमुळे सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून कायदेशीर वाहतूक व्यवस्थेलाही मोठा फटका बसत आहे. परवाना, फिटनेस प्रमाणपत्र, विमा किंवा नियमानुसार परवानगी नसताना प्रवासी ने-आण करणा-या वाहनांमुळे अपघातांचा धोका वाढत असून प्रवाशांचे जीव धोक्यात येत आहेत. अशा अवैध प्रवासी वाहतूकीवर निर्बंध आणावेत त्यासाठी १ मार्चपासून राज्यभर प्रभावी मोहीम राबवावी असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोटार परिवहन विभागाला दिले. ते या अनुषंगाने विधानभवनात बोलावलेल्या बैठकीत बोलत होते. मंत्री सरनाईक म्हणाले क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी घेणे, वाहनांची नियमित तपासणी न करणे आणि सुरक्षाविषयक नियमांकडे दुर्लक्ष करणे या प्रकारांमुळे अपघातांच्या घटना वाढण्याची शक्यता अधिक असते. अशा वाहनांना वैध विमा नसल्यास अपघातानंतर प्रवाशांना नुकसानभरपाई मिळवणे कठीण होते. अनेक वेळा वाहनमालक किंवा चालक जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करतात, ज्यामुळे पीडितांना न्याय मिळण्यात विलंब होतो. दरम्यान, ऑनलाइन आणि पारदर्शक परवाना प्रक्रियेच्या माध्यमातून कायदेशीर वाहतूक सुलभ करणे, तसेच प्रवाशांनीही परवानाधारक सेवांचा वापर करण्याची जबाबदारी स्वीकारणे, ही काळाची गरज आहे. अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई आणि जनसहभाग या दोनच मार्गांनी सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह वाहतूक व्यवस्था निर्माण होउ शकते, असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. अवैध वाहतुकीमुळे शासनाच्या महसुलालाही मोठे नुकसान सहन करावे लागते. नियम पाळणा-या एसटी महामंडळासारख्या कायदेशीर वाहतूकदारांवर अन्यायकारक स्पर्धेचे ओझे येते. दरकपात आणि अनियमित बाजारपेठेमुळे अधिकृत सेवा आर्थिक अडचणीत सापडतात. एसटी सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील प्रवासीसंख्या घटल्याने नियोजित मार्ग व वेळापत्रकावरही त्याचा परिणाम होतो.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# नक्षलमुक्तीकडे वाटचाल

देशभरातून नक्षलवादाचे जलदगतीने उच्चाटन होत असून, ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद संपणार, असा ठाम विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दोन वर्षांपूर्वीच व्यक्त केला होता. नक्षलवादाने सर्वाधिक प्रभावित असलेल्या जिल्ह्यांची संख्या कमी होऊन, आता ती फक्त तीनवर आली आहे. देशातील केवळ ११ जिल्ह्यांमध्येच नक्षलवादाचा किंचित प्रभाव उरला आहे. एकेकाळी दहा राज्यांमधील १२६ जिल्हे नक्षलप्रभावित होते. गेल्या ऑक्टोबरात गडचिरोलीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत तब्बल ६० नक्षलवाद्यांनी शस्त्रे खाली ठेवली. त्यात महाराष्ट्र आणि छत्तीसगडच्या सीमेवर सक्रिय असलेला कुख्यात नक्षलवादी आणि नक्षल्यांच्या पॉलिट ब्यूरोचा सदस्य सोनू ऊर्फ भूपती याचाही समावेश होता. अनेक नक्षलवादी नेत्यांना घडवण्यात त्याची मोठी भूमिका होती.भूपतीने इतर साथीदारांसह आत्मसमर्पणाचा निर्णय घेतला होता. भूपतीच्या आत्मसमर्पणानंतर नक्षलमुक्त महाराष्ट्राच्या मोहिमेला मोठे बळ मिळाले. आता चळवळीची धुरा सांभाळणाऱ्या सीपीआय माओवादी या बंदी असलेल्या संघटनेचा सरचिटणीस थिप्पिरी तिरुपती ऊर्फ देवजी तसेच संग्राम हे १६ साथीदारांसह तेलंगणा पोलिसांसमोर शरण आले. यात केंद्रीय समिती सदस्य मल्लाराजी रेड्डीचाही समावेश आहे. यामुळे नक्षलवाद्यांचा कणाच मोडला गेल्याचे अधोरेखित झाले आहे. मूळचा करीमनगरचा रहिवासी असलेल्या देवजीवर महाराष्ट्र व तेलंगणासह विविध राज्यांत एकूण दहा कोटी रुपयांचे बक्षीस होते. आठ महिन्यांपूर्वीच त्याची संघटनेच्या सरचिटणीसपदी नियुक्ती झाली होती. दहा महिन्यांपूर्वी सुरक्षा दलांनी बसवराजूला चकमकीत ठार केल्यानंतर देवजीकडे संघटनेचे नेतृत्व आले होते. त्याच्या बरोबर तेलंगणाचा केंद्रीय समिती सदस्य मल्लाराजी याने १५ ते २० सदस्यांसह आपली शस्त्रे खाली ठेवली, ही दिलासादायक बाब म्हणावी लागेल. गनिमी काव्याने धमाके घडवण्यात तरबेज असलेल्या आणि हिडमासारखे कट्टर नेते तयार करणाऱ्या देवजीला 'संजीव' किंवा 'पल्लव' या टोपण नावांनीही ओळखले जाते. तो ६२ वर्षांचा आहे.देवजीची शरणागती महाराष्ट्रासाठी यासाठी महत्त्वाची की, गडचिरोली हिंसाग्रस्त करण्यात त्याचा वाटा होता. ३५ वर्षांपूर्वी अहेरीचे आमदार धर्मरावबाबा अत्राम यांचे त्यानेच अपहरण केले होते. २००८ मधील दंतेवाडा येथील ७६ जवानांच्या भीषण मृत्युकांडास देवजीच कारणीभूत होता. अशी अनेक भीषण कृत्ये त्याने घडवून आणली. देवजीनंतर नक्षल चळवळीत आता केवळ मुप्पाला लक्ष्मण राव ऊर्फ गणपती आणि मिशिर बेसरा हे दोन नेतेच शिल्लक आहेत. गणपती याची तब्येत बिघडली असून, तो भूमिगत आहे. १९७०च्या दशकात सामाजिक शोषणाच्या विरोधात नक्षलवादी चळवळ सुरू झाली. १९४६ ते १९५१ या काळातील तेलंगणा सशस्त्र लढ्याची शिदोरीदेखील या नक्षलवाद्यांबरोबर होती. आमचा लढा पोलिसांबरोबर नसून, तो व्यवस्थेच्या विरोधात आहे, अशी या मंडळींची भूमिका होती; मात्र हा आदर्शवाद पुढे राहिला नाही. उलट धरणे, कालवे, रस्ते, पूल, इस्पितळे, शाळा यांच्यावर हल्ले केले गेले. मुख्यतः आदिवासी भागात राहून काम करणारे नक्षलवादी क्रांती करून त्यांच्या जीवनात विकासाचा प्रकाश आणण्याच्या गोष्टी करत असत.प्रत्यक्षात सरकारने जेव्हा आदिवासींच्या प्रगतीसाठी वेगवेगळी विकासाची कामे हाती घेतली, तेव्हा त्या वाटेवर सुरुंग पेरण्याचे अथवा बॉम्ब हल्ले करण्याचे काम नक्षलवाद्यांनी केले. आदिवासी वस्त्यांत आश्रयाला जायचे, त्यांच्याकडून दाणापाणी घ्यायचे आणि त्यांचीच उन्नती होऊ नये, म्हणून आटोकाट प्रयत्न करायचे, हे या नक्षलवाद्यांचे वर्तन. गोरगरीब आदिवासी भयाच्या सावटाखाली काही बोलू शकत नव्हते. बाहेर देशांतून येणारा पैसा ऐषोरामासाठी खर्च करण्याच्यादेखील घटना समोर आल्या. मुळात क्रांतीची फसवी स्वप्ने दाखवून आणि अशा फसव्या क्रांतीच्या मागे लागून अनेक तरुण-तरुणांनी शस्त्रे हातात घेतली. निरपराध नागरिकांचे प्राण घेतले. सरकारी यंत्रणेला वेठीस धरले. अगदी लहान वयातही मुलामुलींच्या हातात शस्त्रे देऊन त्यांना शिक्षण व प्रगतीपासून वंचित ठेवले. वर्षानुवर्षे जंगलात राहून, कुटुंबापासून दूर राहून होणारी परवड असंख्य नक्षल्यांना असह्य होऊ लागली, हेही वास्तव आहे. २०१३ पासून गडचिरोलीत वा तेलंगणात संघटनेत नवीन भरती होत नव्हती. नक्षलवादी नेते जनतेपासून लांब गेले होते. जेव्हा संघटना जनतेपासून तुटते, तेव्हा तिचा अंत निश्चित असतो. नोव्हेंबर २०२४ मध्ये आता शस्त्रांसह काम करणे अशक्य आहे, असे मत भूपती याने गणपती, बसवराजू, देवजी प्रभृती संघटनेच्या नेत्यांसमोर मांडले होते. अनेकांनी त्याला चुकीचे ठरवले; परंतु देशातील परिस्थितीचा विचार करूनच भूपतीने सशस्त्र क्रांतीचा मार्ग सोडण्याचा विचार मांडून दाखवला होता. एप्रिल २०२५ मध्ये बसवराजूदेखील मुख्य प्रवाहात येण्यास तयार होता; पण नंतर त्याने निर्णय बदलला आणि तो चकमकीत ठार झाला. संघटनेत दबदबा असलेला हिडमा समाजमाध्यमांमुळे तरुण पिढीत लोकप्रिय झाला होता.शेकडो सुरक्षा जवान आणि नागरिकांच्या मृत्यूला जबाबदार असलेला पीपल्स लिबरेशन गुरिला आर्मीचा प्रमुख माडवी हिडमा आणि त्याची पत्नी यांना ठार करण्यात गेल्या नोव्हेंबरात सुरक्षा दलांना यश आले होते. महाराष्ट्र, छत्तीसगड व तेलंगणा पोलिसांनी समन्वय ठेवून आखलेले डावपेच, धाडसी कारवाया आणि टप्प्याटप्प्याने माओवाद्यांना घेरून त्यांचा केलेला खात्मा यामुळे ही चळवळ आता आचके देत आहे. चंद्रपूर, गडचिरोलीत तर आता अब्जावधींची गुंतवणूक होत आहे. तेथे नवे उद्योग उभारले जात आहेत. छत्तीसगड व तेलंगणातही तरुण-तरुणींना शिक्षण व रोजगार मिळू लागला आहे; मात्र बेसावध राहून चालणार नाही. शिवाय केवळ खनिजांवर आधारित मोठे उद्योग आणून सर्वंकष विकास होईल, असे नाही. आदिवासी पट्ट्यातील विकास निसर्गपूरक असणे आवश्यक आहे. मुख्यतः तेथे शिक्षण व आरोग्यसेवांचा अगदी दुर्गम भागांपर्यंत विस्तार होणे आवश्यक आहे. आदिवासींच्या मनात सरकार, समाज आणि व्यवस्थेबद्दल विश्वास निर्माण झाला, तर कोणीही हातात बंदूक घेणार नाही.

# नेपाळच्या निवडणुकीत तरुण आघाडीवर

**नेपाळमध्ये सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या जेन-झी आंदोलनाने तेथील के. पी. शर्मा ओली यांच्या नेतृत्वाखालील सरकार उलथवून टाकले. त्यानंतर आता ५ मार्चला होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत याच जेन-झी पिढीचे नेते आघाडीवर असलेले दिसतात..**

बांगलादेशातील निवडणुका पार पडल्यानंतर आता सर्वांचे लक्ष नेपाळ येथे ५ मार्चला होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीकडे आहे. तिथे सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या जेन-झी आंदोलनात पोलिसांच्या गोळीबारात सुमारे ७७ लोक मृत्युमुखी पडली होते. या आंदोलनामुळे तेव्हाचे पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांना राजीनामा द्यावा लागला होता. त्या ऐतिहासिक घटनेनंतर सहा महिन्यांत होणारी ही निवडणूक अनेक अर्थांनी महत्त्वाची आहे. त्या आंदोलनात तरुणांनी मोठ्या प्रमाणात डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करून लोकांना एकत्र आणले होते. त्यामुळे अनेक जण रस्त्यांवर उतरले होते. आता प्रस्थापित पक्षांच्या ज्येष्ठ नेतृत्वाला तरुणांनी आव्हान दिले आहे. यात त्यांना कितपत यश मिळेल, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

नेपाळच्या लोकसंख्येतील ४०.६८ टक्के लोक १६ ते ४० वर्षांचे आहेत. तरुणांमध्ये काही तरी नवीन करून दाखवण्याची इच्छाशक्ती असते. नेपाळी काँग्रेस, कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ (यूएमएल), कम्युनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ (माओइस्ट सेंटर), काही मधेशी पक्ष, राष्ट्रीय प्रजातांत्रिक पार्टीसारखा जुना पक्ष इत्यादी पक्ष निवडणुकीच्या मैदानात आहेत. त्यांना राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीसारख्या नवीन पक्षाने आव्हान दिले आहे. या पक्षाचे नेतृत्व तरुणांच्या हाती आहे.

नेपाळात निवडणुकीनंतर विविध पक्ष एकत्र येऊन सरकार स्थापन केले जाण्याची शक्यता आहे. या निवडणुकीत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे, ते झापा मतदारसंघाने. पंतप्रधानपदाचे दोन उमेदवार येथून एकमेकांविरोधात लढत आहेत.

एक कोटी ९० लाख मतदार तीन हजार ४०० हून अधिक उमेदवारांचे भवितव्य ठरवणार आहेत. आठ लाखांहून अधिक मतदार प्रथमच मतदान करतील. संसदेच्या कनिष्ठ सभागृहातील एकूण २७५ जागांपैकी १६५ जागांसाठी सरळ मतदान होणार. कुठल्या पक्षाला किती मतदान झाले त्याआधारे त्यांच्यात ११० इतर जागा वाटल्या जातील. त्यासाठी त्या पक्षाला किमान तीन टक्के मतदान होणे आवश्यक आहे. तरुणांचे आंदोलन झाले नसते तर पुढच्या वर्षी सार्वत्रिक निवडणुका होणार होत्या.

अचानक आंदोलन सुरू होण्याचे तात्कालिक कारण होते नेपाळ सरकारने अनेक समाजमाध्यमी मंचांवर घातलेली बंदी. सरकारकडून आपल्या अभिव्यक्तिस्वातंत्र्यावर केलेला हा हल्ला असल्याचे तरुणांचे म्हणणे होते. आंदोलन लगेच देशभर पसरले. तरुणांसमोर भ्रष्टाचार, रोजगार, महागाई, ढासळती अर्थव्यवस्था आणि अतिश्रीमंत वर्गाच्या जीवनशैलीचा मुद्दा होता. लाखो तरुण रस्त्यांवर उतरले होते. त्यांच्यावर हिंसक कारवाया करण्यात आल्या. त्यामुळे आंदोलन अधिक चिघळले. पंतप्रधानांना राजीनामा द्यावा लागला. सर्वोच्च न्यायालयाच्या माजी सरन्यायाधीश सुशीला कारकी (७६) यांच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार स्थापन करण्यात आले.

### नेपाळी काँग्रेस

नेपाळमध्ये नेपाळी काँग्रेस (एनसी) हा सर्वांत जुना पक्ष आहे. त्याची औपचारिक स्थापना १९५० च्या एप्रिलमध्ये नेपाळी नॅशनल काँग्रेस आणि नेपाळ डेमॉक्रॅटिक काँग्रेस या दोघांच्या विलीनीकरणातून झाली. त्यात बी. पी. कोईराला यांची महत्त्वाची भूमिका होती. राणांची हुकूमशाही संपवून लोकशाही स्थापन करणे हा त्यांचा उद्देश होता.

ज्येष्ठ विरुद्ध तरुण या वादाचे परिणाम सर्वांत जुन्या एनसीतही दिसले. जानेवारी महिन्यात एनसीने ४९ वर्षांच्या गगन थापा यांना पक्षाचे अध्यक्ष केले. त्यामुळे पाच वेळा पंतप्रधान झालेले शेर बहादूर देऊबा (७९) यांचे महत्त्व कमी करण्यात आल्याची भावना निर्माण झाली. पक्षातील तरुणांचे महत्त्व वाढू लागले आणि हे 'जेन झी'चे परिणाम असल्याचा मतप्रवाह निर्माण झाला. संपूर्ण देशात एनसीला व्यापक जनाधार आहे. २०२२ मध्ये झालेल्या निवडणुकीत सर्वांत जास्त म्हणजे ८९ जागा एनसीला मिळाल्या होत्या.

'यूएमएल'ला ७८, 'माओइस्ट'ला ३२ आणि राजेशाही समर्थक 'राष्ट्रीय प्रजासत्ताक पार्टी'च्या पारड्यात १४ जागा पडल्या होत्या. प्रचंड यांनी एनसीशी झालेली युती तोडली आणि यूएमएलबरोबर सरकार स्थापन केले. ते स्वत: पंतप्रधान झाले. नंतर २०२४ मध्ये यूएमएलच्या ओली यांनी नेपाळी काँग्रेसशी आघाडी केली आणि स्वत: पंतप्रधान झाले. एनसी आणि भारताचा जुना संबंध आहे. राणा राजवटीच्या विरोधात लढताना नेपाळी काँग्रेसचे नेते भारतात येऊन राहत. गगन थापा बिहारला लागून असलेल्या मधेशी प्रांतातील सरलाही-४ येथून निवडणूक लढत आहेत. सर्व १६५ जागांवर या पक्षाने उमेदवार उभे केले आहेत. या निवडणुकीत एनसीला बऱ्यापैकी जागा मिळण्याची शक्यता आहे.

### सीपीएन (यूएमएल)

ओली या पक्षाचे महत्त्वाचे नेते आहेत. त्यांनी एकूण चारदा पंतप्रधानपद भूषवले आहे. या वेळीही ते त्यांच्या झापा मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत. बहुपक्षीय लोकशाहीची पुनर्स्थापना करण्यात आल्यानंतर १९९१ मध्ये झालेल्या निवडणुकीत सीपीएन (यूमएल) मोठा विरोधी पक्ष होता. १९९४ च्या निवडणुकीनंतर या पक्षाच्या मनमोहन अधिकारी यांचे बहुमत नसलेले सरकार सत्तेत आले. या पक्षाने विविध पक्षांशी युती करून अनेकदा सत्ता स्वत:कडे ठेवली. २०२२ च्या निवडणुकीनंतर सुरुवातीला यूएमएल व माओइस्ट एकत्र आले. नंतर २०२३ मध्ये यूमएल आणि नेपाळी काँग्रेस एकत्र आले.

### पुष्प कमल दहल प्रचंड

पुष्प कमल दहल प्रचंड एकूण तीनदा नेपाळचे पंतप्रधान झाले आहेत. त्यांनी आणि त्यांच्या पक्षाने १९९६ ते २००६ दरम्यान राजेशाहीच्या विरोधात मोठा सशस्त्र लढा दिला. दहा वर्षांच्या लढ्यानंतर नेपाळची प्रजासत्ताकाची लोकशाहीकडे वाटचाल सुरू झाली. राजेशाही नष्ट करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. २००८ मध्ये राजेशाही संपुष्ट आल्यानंतर ते पहिले माओवादी पंतप्रधान झाले. मध्यंतरी ते अनेक वादात सापडले आणि आता त्यांचा प्रभाव कमी झाला आहे.

### राष्ट्रीय प्रजासत्ताक पार्टी

१९९० मध्ये स्थापन झालेला हा पक्ष राजेशाही समर्थक आहे. या वेळच्या निवडणूक जाहीरनाम्यात राजेशाहीची पुनर्स्थापना आणि नेपाळला हिंदू राष्ट्र जाहीर करण्यासारखे त्यांचे मुद्दे आहेत. गेल्या निवडणुकीत त्यांना १४ जागा मळणे आश्चर्यकारक होते.



### राष्ट्रीय स्वतंत्र पार्टी (आरएसपी)

पूर्वाश्रमीचे पत्रकार असून आता राजकीय नेते झालेल्या रवी लामछिने (५०) यांनी २०२२ च्या जून महिन्यात हा पक्ष स्थापन केला. प्रस्थापित पक्षांकडून भ्रमनिरास झालेल्या तरुणांनी रवी यांना मोठ्या प्रमाणात पाठिंबा दिला. पहिल्याच निवडणुकीत पक्षाला २० जागा मिळाल्या. ते युती सरकारात सहभागी झाले आणि उप-पंतप्रधान व गृहमंत्रीपदाची जबाबदारी त्यांच्यावर आली. पण नागरिकतेच्या मुद्द्यावरून सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्याविरोधात निकाल दिल्याने त्यांना राजीनामा द्यावा लागला. पुढे नागरिकतेचा प्रश्न मिटल्यावर ते पुन्हा चितवान येथून २०२३ मध्ये निवडून आले. आताही ते तिथूनच निवडणूक लढवणार आहेत.

दुसरीकडे, २०२२ मध्ये संगीकार बालेन शाह (३५) यांनी राजधानी काठमांडूच्या महापौरपदाची अपक्ष म्हणून निवडणूक लढवली. एनसी आणि यूएमएलच्या उमेदवारांचा त्यांनी पराभव केला. जेन झी आंदोलनात त्यांनी तरुणांना मदत केली. जानेवारीत त्यांनी महापौरपदाचा राजीनामा दिला आणि आरएसपीत सामील झाले. आता झापा येथून ओली यांच्याविरोधात बालेन निवडणूक लढवत आहेत. ते पक्षाचे पंतप्रधानपदाचे उमेदवार आहेत.

नेपाळात हा मतदारसंघ सर्वाधिक महत्त्वाचा झाला आहे. काठमांडू हा त्यांचा बालेकिल्ला असून बालेन यांनी माजी पंतप्रधानांच्या मतदारसंघातून निवडणूक लढण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. ओली यांना त्यांनी मतदारसंघात अडकवून ठेवले आहे. त्यांचा खरा जनाधार शहरी भागांत आहे. ओलींच्या विरोधात निवडणुकीच्या रिंगणात उतरून बालेन यांनी संपूर्ण देशाचे लक्ष स्वत:कडे आकर्षित करून घेतले आहे. एनसीनेदेखील तरुण गगन थापा यांना आपला पंतप्रधानपदाचा उमेदवार म्हणून जाहीर केले आहे. नेपाळच्या निवडणुकीत तरुणांच्या मोठ्या प्रमाणात सहभागामुळे नेपाळला तरुण पंतप्रधान लाभण्याची शक्यता दिसते.

**जतिन देसाई**

## माझेही मत

# साहित्यिक यांचे निवासस्थानी निलफलक..

अमरावती महानगरपालिका यांनी २० फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव क्रमांक २५ नुसार शहरातील सांस्कृतिक व साहित्य परंपरा यांचे जतन करण्याचे दृष्टीने महानगर पालिका सदस्य असलेल्या प्रीती बनारसे-रेवणे यांनी जो प्रस्ताव सभागृहात मांडला आहे.त्याला अमरावती महानगरपालिका यांनी मंजुरी दिली असे वृत्त वाचले.हे वाचून आनंद झाला.त्यामुळे मी एक साहित्यिक व सामाजिक बांधिलकी म्हणून महानगरपालिका व प्रीती रेवणे यांचे अभिनंदन करतो.

अमरावती हा जिल्हा लेखक, कवी, साहित्यिक व कलावंत यांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो हे वेगळे सांगण्याची गरज नाही. येथील साहित्यिक तसेच संगीत, नाट्य क्षेत्रातील मान्यवर कलावंत यांचे मोलाचे योगदान लाभले आहे.साहित्य क्षेत्रातील सुरेश भट, मधुकर केचे, उद्धव शेळके, दादासाहेब खापर्डे,वीर वामनराव जोशी, वसंत आबाजी डहाके,प्रभा गणोरकर, बाबासाहेब मोहोड यांच्या सोबतीनेच शरदचंद्र सिन्हा, भाऊसाहेब मांडवकर, मनोहर तल्हार,सुशीला पाटील, नाट्य क्षेत्रातील किशोर दिघेकर, राजाभाऊ मोरे, तुळशीरामजी काजे, कमलताई भोंडे अशा प्रकारच्या अनेक मान्यवर साहित्यिक कलावंत आहेत. या माध्यमातून महानगरपालिका महापौर यांना विनंती करतो की,जे कलावंत ६५ वर्षे वयाचे पुर्ण झाले असतील, परंतु त्यांना कोणत्याही प्रकारे शासकीय स्तरावर पेन्शन मिळत नसेल किंवा ज्यांची आर्थिक स्थिती चांगली नसेल अशा कलावंत यांना तसेच जे अंध, अपंग व्यक्ती असतील यांची पुर्णपणे खात्री करून प्रत्येक क्षेत्रातील कलावंत यांना दरमहा काही रक्कम देता आल्यास आनंदच होईल. ज्यांना मानधन मिळत आहे त्यांना वगळता येईल.

यासाठी महापालिका प्रशासनाने अमरावती शहरातील नागरिक यांचे करामध्ये अर्धा टक्का वाढ करुन आर्थिक तरतूद करता येईल असे वाटते.आज पावेतो या दृष्टिकोनातून महानगर पालिका यांनी कधीच विचार केला नव्हता. शहरात कितीही गगनचुंबी इमारती उभ्या राहिल्या तरीही ते गाव ते शहर तेथील कलावंत, लेखक कवी साहित्यिक, नाटककार, संगीतकार यांचे मुळेच ओळखले जाते असे वाटते.अमरावती हे गाव सुरेश भट यांचे मुळे महाराष्ट्रात मराठी गझल मधुकर केचे यांच्या सशक्त अभंग रचनेमुळे अजरामर झाले आहे हे मात्र खरे आहे.

**विष्णू सोळंके**
मो.७०२०३००८२४

# खेड्यांतील आरोग्य परिस्थिती सुधारेल?

नुकत्याच जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीतून मागील अडीज वर्षांत राज्यात झालेल्या ३४,३२५ बालमृत्युंची संख्या ही ग्रामीण आणि आदिवासी भागातील असून त्यात, जंतुसंसर्ग, न्युमोनिया, अल्पवजनी जन्मलेली बालके, श्वासनविकार यांमुळे झालेले मृत्यू प्रगत म्हणविणाऱ्या महाराष्ट्रातील गावाखेड्यांतील आहे असे सांगताना आरोग्य यंत्रणा आणि सरकारी उदासिनता, लोकांच्या आरोग्याची काळजी घेण्यातील कूचकामी यंत्रणा यातून सरकारी पैशांची उधळपट्टी, गैरवापर होत असल्याचे स्पष्ट होते. हे त्या यंत्रणेतील कार्यांच्या अंमलबजावणीमध्ये होत असलेल्या त्रुटींमुळे होतात हे समजून सुद्धा त्यांच्या अंमलबजावणीत सुधारणा करण्याचे प्रयत्न केले जात नाहीत. पदांची कमतरता असल्याचे सांगण्यात येते पण शहरी आणि ग्राहकांशी निगडित खात्यांमध्ये भरमसाठ नोकरभरती केलेली आढळते. अशा प्रकारे निर्ढावलेली परिस्थिती ओढावून घेतलेल्यांवर कोणतीही शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत नाही. सध्याच्या काळात नवनवीन सुधारणा, औषध सोयी सुविधा उपलब्ध होत असतांना त्यांची प्रामाणिकपणे उपयुक्तता करून घेण्याची अंमलबजावणी सरकारी यंत्रणेकडून केली जात असल्याचे आढळून येत नाही, परिणामी ग्रामीण भागातील आदिवासी खेड्यांतील कुपोषित आजारी बालके ऐन वेळी औषधोपचारांविना नाहक बळी पडतात. या युगात नवनवीन उपचार, औषधे उपलब्ध होत असातांना बालकांची हेळसांड ही मनुष्यवधाची, निष्पाप बालकांची निष्काळजीपणाने केलेली हत्याच आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**स्नेहा राज**

## संवाद

# भोंदू साधूच असतात का?

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची एक जाहिरात नुकतीच पाहण्यात आली.'स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवा. भोंदूगिरीवर नाही'असा संदेश या जाहिरातीतून देण्यात आला आहे. या जाहिरातीत एका साधुचे व्यंगचित्र रेखाटण्यात आले आहे.सरकारी जाहिरातीवर भोंदू म्हणून साधूचे व्यंगचित्र दाखवणे म्हणजे सरसकट सर्वच साधूंना भोंदू म्हणून हिणवण्याचा प्रकार नव्हे का? आज भोंदूगिरी केवळ हिंदू धर्मातच आहे का? आजही अनेक दर्ग्यांमध्ये भूतबाधा काढण्याच्या नावाखाली लोकांना साखळदंडाने बांधले जाते, त्यांना धुरी दिली जाते, वेताच्या काठीने मारहाण केली जाते, चटके दिले जातात. लोकांच्या गरिबीचा आणि असहायतेचा फायदा घेऊन काही पैशांच्या, अन्नाच्या किंवा वैद्यकीय सुविधांच्या बदल्यात त्यांचे धर्मांतरण करणारी आणि हजारोंच्या उपस्थितीत स्टेजवर एडस्, कॅन्सर सारखे असाध्य रोग आम्ही बरे करतो असे छातीठोकपणे सांगणारी सुटाबुटातील भोंदूगिरी सरकारला दिसत नाही की त्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष केले जात आहे. हिंदू हा सहिष्णू आहे. त्याला धर्माचे ज्ञान आणि अभिमान दोन्ही नसल्याने त्याला नेहमीच गृहीत धरले जाते. परिणामी साधू संत म्हणजे हल्ली टिंगलटवाळीचा विषय ठरू लागला आहे. सिनेमा, वेब सिरीज, नाटके, जाहिराती यांमध्ये त्यांची नेहमीच अवहेलना केली जाते. काही वर्षांपूर्वी पालघर परिसरात अशाच प्रकारे संशयाने साधूंची मारहाण करून हत्या करण्यात आली होती.समाजातील अंधश्रद्धा दूर करण्यासाठी सरकार करत असलेले प्रयत्न नक्कीच कौतुकास्पद आहेत मात्र हे करत असताना ज्यांनी आपल्याला निवडून दिले आणि सरकार स्थापनेची संधी दिली त्या हिंदू समाजाच्या श्रद्धेला या जाहिरातीमुळे तडा गेला आहे त्यामुळे सरकारने हिंदूंच्या भावनांची दखल घेत या जाहिरातींवरील साधूंचे चित्र हटवावे.

**जगन घाणेकर**

# 'अमूल'च्या धर्तीवर 'भारत टॅक्सी'ची नवी क्रांती..

देशातील प्रमुख शहरातील दिल्ली, मुंबई, पुणे,बंगळुरू येथील शहरांतर्गत होणाऱ्या खाजगी वाहतूक सेवेवर ज्या मध्ये टॅक्सी, ऑटो येतात त्यावर ओला, उबर या खाजगी कंपन्यांची पकड असल्याने या दोन खाजगी टॅक्सी कंपन्यांनी गेली काही वर्षे ग्राहकास अक्षरशः जेरीस आणले आहे. या सर्वाचा त्रास शेवटी सर्व सामान्य ग्राहकांना होतो. पण आता, हे चित्र हळूहळू बदलू शकते कारण, देशाचे गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी दिल्ली मधील नोएडा येथून सहकारी तत्त्वावर 'भारत टॅक्सी' ची सुरुवात केली आहे.

भारतातील सहकार चळवळीने ग्रामीण अर्थव्यवस्थेचा चेहरामोहरा बदलला आहे.याचे ज्वलंत उदाहरण गुजरात राज्यातील 'अमूल' ही जगातील सर्वात मोठी सहकारी संस्था आहे. अमूल मध्ये जसे दूध उत्पादक शेतकरीच संस्थेचे मालक आहेत, तसाच एक क्रांतिकारी प्रयोग आता वाहतूक क्षेत्रात आकाराला येत आहे. दिल्ली-नोएडा परिसरातून सुरू झालेली 'भारत टॅक्सी' ही संस्था आता 'वाहतूक क्षेत्रातील अमूल' म्हणून ओळखली जाणार आहे. ज्या तत्त्वावर अमूल चालते, अगदी त्याच धर्तीवर भारत टॅक्सीची रचना करण्यात आली आहे.

अमूल मध्ये शेतकरी दूध संकलन केंद्रात जमा करतात आणि ते संस्थेचे भागधारक असतात. तसेच, भारत टॅक्सी मध्ये प्रत्येक टॅक्सी चालक हा 'भागधारक' असेल केवळ ५०० रुपयांचे शेअर्स खरेदी करून कोणताही चालक या संस्थेचा भागीदार बनू शकतो. उत्पन्नाचे वाटप हे (८०:२० सूत्र) प्रमाणे ठरले आहे. ८०३ हिस्सा चालकाने केलेल्या एकूण कमाई पैकी त्याच्याकडे राहते किंवा त्याला दिली जाते. उर्वरित २०% रक्कम 'सहकारी फंड' म्हणून कापली जाते. ही रक्कम संस्थेच्या प्रशासकीय कामासाठी आणि चालकांच्या सामाजिक सुरक्षेसाठी वापरली जाते. जसे अमूलने




दूध धंद्यातील दलालांना हटवले, तसे भारत टॅक्सी खाजगी क्षेत्रातील ओला आणि उबर सारख्या मोठ्या खाजगी कंपन्यांना पर्याय देत आहे.

भारत टॅक्सीची प्रमुख वैशिष्ट्ये पाऊस किंवा गर्दीच्या वेळी ग्राहकांकडून जादा भाडे आकारले जाणार नाही, तसेच मध्यस्त नसल्याने ज्यामुळे ही सेवा ग्राहकांसाठी २०-३०३ स्वस्त पडणार कापून घेतलेल्या २०% फंडातून चालकांचा अपघात विमा, मुलांचे शिक्षण आणि निवृत्तीनंतरची पेन्शन योजना या साठी वापरली जाणार. सर्व व्यवहार अॅपच्या माध्यमातून होत असल्यामुळे फसवणुकीला वाव राहत नाही. यात केवळ टॅक्सीच नाही, तर रिक्षा, बाईक टॅक्सी आणि 'महिला चालक' (पिंक टॅक्सी) यांचाही समावेश आहे.

भारत टॅक्सीचे उद्दिष्ट देशातील १५ कोटी चालकांना या सहकारी छत्राखाली आणण्याचे आहे. नोएडा पासून सुरू झालेली ही चळवळ आता पहिल्यांदा गुजराथ, महाराष्ट्रासह इतर राज्यांतही विस्तारत जाणार आहे. 'सहकारातून समृद्धी' हे ब्रीदवाक्य खऱ्या अर्थाने वाहतूक क्षेत्रात अमलात आणण्याचे काम ही संस्था करणार आहे.देशात अमूलने ज्याप्रमाणे भारतातील धवल क्रांती घडवून आणली, त्याचप्रमाणे भारत टॅक्सी ही वाहतूक क्षेत्रात 'चालक क्रांती' घडवून आणणार आहे असे बोलले जाते. यामुळे चालकांना हक्काची मालकी आणि ग्राहकांना विश्वासार्ह सेवा मिळणार आहे.

**अविनाश देशपांडे**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखा

### तेजस्विनी सोसायटीवर गंभीर आरोप, नागपूर सायबरकडून गुन्ह्याची चौकशी

# ज्यादा व्याजाच्या आमिषाने कोट्यवधींचा घोळ?



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - तेजस्विनी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट वूमन सोसायटी लिमिटेड या संस्थे विरोधात सध्या गंभीर आरोपांची मालिका समोर येत असून ज्यादा व्याजदराचे आमिष दाखवून अनेक महिलांकडून सोने व इतर महागड्या वस्तू गहाण ठेवून एफडी स्वरूपात रक्कम स्वीकारल्याची चर्चा शहरभर रंगली आहे. या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची संपत्ती फस्त केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

प्रत्यक्षात किती आर्थिक घोळ झाला आहे. याचे चित्र अद्याप स्पष्ट नसले तरी "आणखी किती घबाड पुढे येणार?" असा प्रश्न उपस्थित होत आहे.दरम्यान, नागपूर सायबर सेल यांनी लाखो रुपयांचे व्यवहार कथित फ्रॉड खात्यांमधून झाल्याची प्राथमिक माहिती दिल्याचे समजते. नागपूर येथे गुन्हा नोंदवून पथकाने यवतमाळ शाखेत चौकशीसाठी भेट दिली. मात्र या चौकशीत नेमके काय निष्पन्न झाले, याबाबत अधिकृत माहिती अद्याप गुलदस्त्यात आहे. संस्थेत बोगस पदभरती, अधिकृत नियुक्तीपत्र शिवाय कर्मचाऱ्यांची नेमणूक, आर्थिक अनियमितता आणि पारदर्शकतेचा अभाव यांसारख्या बाबींचीही चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. सभासद व एफडी खातेधारकांमध्ये तीव्र असंतोष उसळला असताना काही खातेदार मात्र अद्याप मौन बाळगत असल्याचे चित्र आहे. अध्यक्ष व संचालक मंडळाची नियुक्ती कोणत्या निकषांवर झाली? एकूण सभासद संख्या किती? आणि नेमका आर्थिक व्यवहार किती? या मूलभूत प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत. अध्यक्ष शिंदे यांच्याशी संपर्क होत नसल्याने आणि कथित प्रकार संशयास्पद वाटत असल्याने कर्मचारी व काही सभासदांनी कार्यालयाला कुलूप लावून सूचना पत्र लावले. मात्र त्यावरील संपर्क क्रमांकही बंद असल्याने ठेवीदारांची चिंता अधिकच वाढली आहे.

#### डीडीआर देखरेखीची कसोटी

या दोन वर्षांच्या कार्यकाळात नियमित लेखापरीक्षण झाले का? सहकार विभागाच्या नियंत्रण यंत्रणेने वेळोवेळी तपासणी केली का? जिल्हा उपनिबंधक (DDR) कार्यालयाकडून आवश्यक ती देखरेख व ऑडिट पार पडले की नाही, याची सखोल चौकशी होणे गरजेचे असल्याची मागणी होत आहे. सहकार क्षेत्रात विश्वास आणि पारदर्शकता हाच पाया असतो तोच डळमळीत झाल्यास सर्वसामान्यांच्या कष्टाच्या पैशांवर गदा येते.सद्यस्थितीत सर्वात महत्त्वाचे म्हणजे संपूर्ण आर्थिक लेखापरीक्षण, संचालक मंडळाची जबाबदारी निश्चिती, दोषींवर फौजदारी कारवाई आणि ठेवीदारांच्या पैशांच्या सुरक्षिततेबाबत स्पष्ट हमी. अन्यथा ज्यादा व्याजाचे आमिष आणि शासकीय देखरेखीतील त्रुटी यांचा संगनमताने सामान्य महिलांची फसवणूक अशीच होत राहील अशी शक्यता नाकारता येत नाही.

## वणीतील कोळसा हेराफेरी प्रकरणाचा तपास एलसीबीकडे द्या

### नागरिकांची मागणी, ट्रक चालकांवर गुन्हा, पण सूत्रधार कोण?

**जनमाध्यम प्रतिनिधी**



वणी - वेकोली उकणी कोळसा खाणीतून रेल्वे साइडिंगसाठी रवाना झालेल्या दोन ट्रकमधील कोळसा हेराफेरी प्रकरणाचा तपास स्थानिक पातळीवर न ठेवता तो थेट एलसीबी (लोकल क्राईम ब्रँच) पथकाकडे सोपवावा, अशी ठाम मागणी नागरिक व सामाजिक संघटनांकडून होत आहे.या गंभीर प्रकरणात मोठे मासे सहभागी असल्याची चर्चा रंगत असल्याने पोलीस अधीक्षकांनी स्वतः हस्तक्षेप करून तपास एलसीबीकडे द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

घटनेनुसार, (वेकोली) उकणी खाणीतून भरलेला मूळ कोळसा यवतमाळ मार्गावरील रामदेवबाबा मंदिराजवळील खासगी कोळसा प्लॉटवर उतरवण्यात आल्याचे समोर आले आहे.त्यानंतर कोल वॉशरी परिसरातील दुसऱ्या प्लॉटवरून बेड मटेरियल भरून संबंधित ट्रक रेल्वे साइडिंगवर नेण्यात आल्याचा आरोप आहे. घटना उघडकीस आल्यानंतर तब्बल ४८ तासांनी वणी पोलीस ठाण्यात दोन्ही ट्रक चालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.मात्र या विलंबामुळे आणि संपूर्ण प्रकरणातील संशयास्पद हालचालींमुळे तपासाच्या पारदर्शकतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सुरक्षा देखरेखीखाली असतानाही दोन्ही चालक रात्रीच्या वेळी फरार झाल्याने प्रकरण अधिकच गूढ बनले आहे. या संपूर्ण प्रकारामुळे कोळसा पुरवठा व्यवस्थेतील संभाव्य गैरव्यवहार,प्रशासनिक जबाबदारी आणि राजकीय हस्तक्षेप याबाबत चर्चा रंगत आहे.त्यामुळे या प्रकरणाची सखोल,निष्पक्ष आणि दबावमुक्त चौकशी होणे अत्यावश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दरम्यान,जिल्हा पोलीस प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तपासाची सूत्रे एलसीबी पथकाकडे सोपवावीत, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## सत्ताधारी भाजपाची असहिष्णुता चिंतेचा विषय : माजी मंत्री वसंतराव पुरके



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - देशात लोकशाही मूल्यांचा स्वीकार झाला असला तरी सत्ताधारी पक्षातील वाढती असहिष्णुता ही चिंतेची बाब असल्याची खंत माजी शिक्षण मंत्री वसंतराव पुरके यांनी व्यक्त केली. ते यवतमाळ येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

भारत जगातील सर्वात मोठी लोकशाही असल्याचा अभिमान बाळगला जातो. मात्र न्याय, नीती आणि नैतिकतेचा गवगवा करणाऱ्या सत्ताधाऱ्यांच्या वर्तनातून विरोधकांना दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

राज्यात खून, मारामाऱ्या, धर्मांधता आणि जातीयवाद वाढत असून समाजविरोधी घटनांविरोधात आवाज उठविणाऱ्यांवर हल्ले होत असल्याचे त्यांनी सांगितले. असीम सरोदे, विश्वंभर चौधरी आणि निखिल वागळे यांच्यासह अनेकांवर झालेल्या हल्ल्यांचा त्यांनी उल्लेख केला. तसेच नरेंद्र दाभोलकर, गोविंद पानसरे यांच्या हत्याप्रकरणी अद्यापही समाधानकारक कारवाई न झाल्याची खंत व्यक्त केली. विरोधी पक्षाला सभागृहात बोलू न देणे, टीकाकारांना राष्ट्रद्रोही ठरविणे आणि गुन्हेगारांचे गौरवीकरण करणे ही प्रवृत्ती लोकशाहीसाठी घातक असल्याचे पुरके म्हणाले. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी सशक्त विरोधी पक्ष आवश्यक असून न्यायव्यवस्था तरी सुरक्षित राहावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, जेफ्री एफस्टीन प्रकरणाचा संदर्भ देत काही भारतीय नेत्यांची नावे समोर येत असल्यास त्याची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली.

नरेंद्र मोदी यांनी नैतिकतेच्या आधारावर संबंधितांवर कठोर कारवाई करावी, असेही ते म्हणाले. यापूर्वी शिवराज पाटील आणि अशोक चव्हाण यांनी आरोपांनंतर राजीनामे दिल्याची आठवण करून देत, नैतिक जबाबदारीची परंपरा जपली जावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### रंभा, पुसद येथील राजहंस वाढे यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित



पुसद - शिवजयंती दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी पुणे येथे आयोजित भव्य पुरस्कार सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी व सह्याद्री फिल्म प्रोडक्शनचे डायरेक्ट राजूरकर सर यांच्या हस्ते सोहळ्यात राजहंस वाढे या.रंभा ता.पुसद यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले स्वराज्य फिल्म प्रोडक्शन आणि आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा पार पडला आहे. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले आहे. दादासाहेब फाळके युनियनचे विदर्भ अध्यक्ष सामाजिक महाराष्ट्र राज्यांचे उपक्रम समाजापर्यंत प्रत्येक अडचणीला त्यांच्यापर्यंत पोहोचणारे पोलीस मित्र अपराध नियंत्रण मानवाधिकार संघटनेचे महाराष्ट्र अध्यक्ष राजहंस वाढे यांना दादासाहेब फाळके पुरस्कार सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना महाराष्ट्र राज्यातुन अनेक कार्यकर्ते कडून शुभेच्छा देण्यात येत आहे.

## • वेचक



### वनाधिकार कायद्याच्या अंमलबजावणीसाठी केळापूरमध्ये धरणे आंदोलन

पांढरकवडा - भारताचा कम्युनिस्ट पक्ष व अखिल भारतीय किसान सभा यांच्या संयुक्त विद्यमाने केळापूर उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. नायब तहसीलदार यांच्या हस्ते जिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. वनाधिकार कायद्यानुसार वनजमीन अतिक्रमणधारकांना त्वरित पट्टे देण्यात यावेत, कलम १३ नुसार कोणत्याही दोन पुराव्यांच्या आधारे दावे मंजूर करावेत, गैरआदिवासी धारकांवरील तीन पिढ्यांची अट रद्द करावी तसेच कसत असलेल्या जमिनीची जीपीएसद्वारे मोजणी करून नकाशा द्यावा, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या. यावेळी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ. चंद्रशेखर सीडाम यांच्यासह अनेक पदाधिकारी व शेकडो महिला-पुरुष कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते.

### विद्यार्थी विकास विभागाच्या शिष्यवृत्तीत शिवरामजी मोघे महाविद्यालयाचा दबदबा


पांढरकवडा - येथील शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत विद्यार्थी विकास विभागामार्फत शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी जाहीर झालेल्या विविध शिष्यवृत्तींमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या कला शाखेतील ३४ विद्यार्थ्यांपैकी १९ विद्यार्थ्यांना प्रत्येकी १५०० रुपयांची शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. तसेच पदव्युत्तर वाणिज्य विभागातील एम.कॉम. भाग-१ च्या एका विद्यार्थिनीला २००० रुपयांची शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे. याशिवाय एम.ए.च्या विविध विषयांतील २४ विद्यार्थ्यांपैकी १४ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. विशेष म्हणजे, विद्यापीठाच्या एकूण शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांपैकी सुमारे ६० टक्के विद्यार्थी हे शिवरामजी मोघे महाविद्यालयातील असल्याची माहिती देण्यात आली. ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या मागास घटकांतील विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीमुळे मोठा दिलासा मिळाला आहे. विद्यार्थी विकास विभागाचे समन्वयक डॉ. नितीन वासनिक यांनी प्रवेशावेळीच सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज भरून विद्यापीठाकडे सादर केले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हे यश शक्य झाले. प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्था सचिव श्री. विजयराव मोघे तसेच विद्यापीठाचे सिनेट सदस्य यांनी केले आहे.

### हनीन फातिमाने आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला



उमरखेड - उर्दु दैनिक मुन्सिफ व दैनिक यकीनचे उमरखेड तालुका प्रतिनिधी पत्रकार सलमान अशहरखान यांची कन्या हनीन फातिमा हिने, शुक्रवारच्या दिवशी रमजान महिन्यात, पाच वर्षांपेक्षा कमी वयातच आयुष्यातील पहिला रोजा ठेवून या महत्त्वाच्या कर्तव्याचे पालन करण्याचा सन्मान मिळवला. याबद्दल कुटुंबीय, मित्रपरिवार व नातेवाईकांनी तिचे मनापासून कौतुक व प्रोत्साहन केले. विशेषतः काका-काकू तसेच आजोबा-आजी यांनी भरभरून स्तुती केली.

### कला वाणिज्य महाविद्यालय राळेगाव येथे मराठी भाषा गौरव दिन



राळेगाव - स्थानिक कला, वाणिज्य महाविद्यालय राळेगाव येथे मराठी भाषा गौरव दिन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्करराव सावरकर यांचे मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. यानिमित्ताने महाविद्यालयात निबंध लेखन स्पर्धा, शुद्धलेखन स्पर्धा, व सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. सुरेश फुलकर होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. शालिनी हटवार तसेच इंग्रजी विषयाचे प्रा. धीरज गोबरे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. अनिल दौलतकार यांनी केले. त्यांनी कवी श्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या जीवनावर प्रकाश टाकला.मराठी आपली मातृभाषा आहे.

## चिमुकल्या विद्यार्थ्यांची पोलीस स्टेशनला भेट, कायद्यांसह विविध बाबीची माहिती

**जनमाध्यम प्रतिनिधी**

आर्णी - 28 फेब्रुवारीला इरो किड्स इंग्लिश मीडियम स्कूल स्थानिकचे विद्यार्थी आणि विद्यार्थीनी यांना पोलीस स्टेशन आर्णी येथे पाचारण करुन पोलीस स्टेशन मधील कामकाज कशाप्रकारे चालते CCTNS प्रणाली, VHF प्रणाली, आपले सरकार पोर्टल, एफ.आय.आर नोंदवणे स्टेशन डायरी अंमलदार यांची जबाबदारी, नवीन कायदे, सायबर क्राईम व सोशल मीडिया, लैगिक छळ, ट्रॅफिकचे नियम, गोपनीय कामकाज- (आपले सरकार पोर्टलवर देण्यात येणाऱ्या सेवा बाबत माहिती, ऑनलाईन कॅरेक्टर, पासपोर्ट)आणि महिला विषयी नवीन कायद्यासंबंधाने मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी गुन्हे हाताळण्याच्या पद्धती, महिला अत्याचार व बालकांवर होणारे अत्याचार संबंधाने मदत कक्ष, ऑनलाइन फ्रॉड, मोबाईल चोरीयाबाबत सायबर रिसोर्स पर्सन याची कर्तव्ये, डायल 112 प्रणाली कशाप्रकारे काम करते याबाबत माहिती देण्यात आली. तसेच पोलीस स्टेशन ला असलेले शस्त्र व त्यांचा कशाप्रकारे वापर होतो, याबाबत थोडक्यात माहिती देण्यात



आली. सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपण एक सुजाण नागरिक म्हणून पोलिसांना आपल्या आसपास होत असलेल्या अनपेक्षित घटनांबाबत वेळोवेळी माहिती देऊन अशा कोणत्याही कृत्यामुळे सार्वजनिक शांतता भंग होणार नाही, याबाबत पोलिसांना सहकार्य करावे असे आवाहन ठाणेदार निलेश सुरडकर यांनी केले. सदर कार्यक्रमाकरिता पोलीस स्टेशन आर्णी येथील पोलीस नाईक गजानन हरणे, पोलीस कॉन्स्टेबल रवींद्र चव्हाण,पोलीस कॉन्स्टेबल राजन राठोड, महिला पोलीस कॉन्स्टेबल अश्विनी उघडे, गीता मुंडे तसेच सदर इंग्लिश मीडियम स्कूल आर्णी चे मुख्याध्यापक सोनाली बागेश्वर, सहाय्यक शिक्षक प्रीती क्षीरसागर, शिक्षक लावण्या चव्हाण, कल्याणी जगताप, अंजली चिंतावार, शारदा क्षीरसागर, नंदा मंडलवार सह विद्यार्थी आदी उपस्थित होते.


## देशी कट्टा घेऊन फिरणाऱ्या आरोपीवर पोलीस स्टेशन पुसद शहरकडुन कारवाई

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - २७ फेब्रुवारी रोजी स.पो.नि. प्रेमकुमार केदार, पो.स्टे. पुसद (शहर), पो.ना. दिनेश सोळंके, पो.कॉ. शुध्दोधन भगत, पो.हे.कॉ. मंदाकीनी भगत, पो.कॉ. इंदु पवार असे पो.स्टे. हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना रात्री अंदाजे ०८.१५ वाजताच्या सुमारास त्यांना मुखबीर कडुन खात्रीलायक गोपनिय माहीती मिळाली की, ईसम नामे राज गणेश कदम, वय-२२ वर्षे, जात-बौध्द, रा. संभाजीनगर पुसद, ता. पुसद, जि. यवतमाळ हा भिमवाडी परिसरातील सखाराम नगरी पुसद येथे विनापरवाना देशी कट्टा अग्निशस्त्र सोबत बाळगुन फिरत आहे अशी माहीती मिळाली.

वरुन डि.बी. पथकाने सदर ईसम राज गणेश कदम, वय-२२ वर्षे, जात-बौध्द, रा. संभाजीनगर पुसद याला शिताफीने घेराव घालुन जागीच पकडले व त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे जवळ शर्टाचे आतुन कमरेला पॅन्टमध्ये खोसुन असलेला एक लोखंडी धातुचा देशी कट्टा अग्निशस्त्र ज्याला लाकडी मुठ स्कुने फिट असलेली, सदर देशी बनावट कट्ट्याच्या खालच्या बाजुस ट्रिगर, वरच्या बाजुस चाप व बॅरल लॉक असलेली, ज्याचे बॅरलची लांबी १५ से.मि., मुठीची लांबी ३१ से.मि. असा जुना वापरता देशी कट्टा किंमत अंदाजे १०,०००/- रुपयाचा मिळुन आला. तसेच सदर ईसमाचे पॅन्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ०१ पिवळ्या धातुचे जिवंत कारतुस असुन कारतुसचे मागच्या पेंद्याजवळ BMM KF सारखे बारीक वर्णाक्षर असुन समोरुन निमुळते लांबी सदर कारतुसची लांबी ७.५ से.मि. असा कारतुस किंमत अंदाजे १०,०००/- रु. असा एकुण ११,०००/- रुपयाचा मुद्देमाल अवैधरीत्या बाळगतांना मिळुन आला. वरुन सदर ईसम याचेवर आर्म ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक यवतमाळ कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात,सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी पुसद हर्षवर्धन बि.जे. यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे, ठाणेदार पोलीस स्टेशन पुसद शहर यांचे निर्देशाप्रमाणे डि.बी. पथक स.पो.नि. प्रेमकुमार केदार, पो.स्टे. पुसद (शहर), पो.ना. दिनेश सोळंके, पो.कॉ. शुध्दोधन भगत, पो.हे.कॉ. मंदाकीनी भगत, पो.कॉ. इंदु पवार यांचे कडुन करण्यात आली.



### मातोश्री माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी N M M S परीक्षेत उत्तीर्ण

महागाव - महाराष्ट्र शासन व शालेय शिक्षण विभाग द्वारा आयोजित राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकाच्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा दरवर्षी घेतली जाते त्यामध्ये वर्ग आठवा मधून विद्यार्थी शोधून त्यांच्या शिक्षणाची पूर्णपणे हमी शासनामार्फत घेतली जाते सदर परीक्षेत मातोश्री विद्यालय आपल्या यशाचा ठप्पा पाडण्यास सरस पुढे आहे त्यामध्ये सिद्धी देशमुख, श्रीतेज राठोड, प्रणव राठोड ,केतकी केदार, सृष्टी चवरे ,जनार्दन येनकर, अजिंक्य आडे, श्रुती जाधव या विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले व प्रज्ञावंत म्हणून आपलं स्थान निश्चित केलं. उत्तीर्ण विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे संस्थापक दिगंबर जगताप यांनी शुभेच्छा देऊन पुढील कार्यास सदिच्छा व्यक्त केल्या व प्राचार्य व समस्त कर्मचारी वृंद व पालक वर्ग यांनी शुभेच्छा दिल्या व पुढील शैक्षणिक कार्यासाठी व वाटचालीस सदिच्छा व्यक्त केल्या.

## ऊस टंचाई निर्माण केली तरच अपेक्षित दर मिळेल : गोविंदराव देशमुख (सवनेकर)

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - सध्या यावर्षीचा गाळप हंगाम अंतिम टप्प्यात आला आसुन बरेच कारखाने उसाच्या उपलब्धते अभावी बंद झाले आहेत. यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे हेक्टरी वीस ते पंचवीस टणाने उत्पादन घटले त्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी आर्थिकदृष्ट्या अडचणीत आले आहेत. भरीस भर शासनाने मागील दोन हंगामापासुन गाळप सुरु करण्यासाठी नोव्हेंबर महीण्याची अट घालुन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आडचणीत लोटण्यासाठी व कारखाणदारांच्या सोयीचा निर्णय घेतला आसल्याने आक्टोबंर नोव्हेंबर पुर्वहंगामी ऊस गाळपासाठी उत्पादकांना पंधरा महीने प्रतीक्षा करावी लागत आहे.



ऊस हे हमी आणि नगदीचे पिक असल्याने महाराष्ट्रात शेतकरी या पिकाकडे वळले आहेत परंतु सताधारी आणि विरोधक हे बहुतांश कारखानदार (खाजगी व सहकारी) सभागृहात असल्याने आपल्या सोयीचे निर्णय घेत आहेत. मागीलवर्षी निवडणूक डोळ्यासमोर ठेवून मागणी नसताना तोडणी वाहतूक ठेकेदारांना खुष करण्यासाठी तब्बल प्रतीटन १३० रूपये भरीव अशी वाढ केली त्याचा फटका ऊस उत्पादक शेतकऱ्यांना बसला आणि यावर्षी अतिवृष्टीमुळे हेक्टरी उत्पादन घटल्याने हा सुध्दा आर्थिक ताण शेतकऱ्यांना सोसावा लागतो अशावेळी शासनाने विशेष तरतुद करुन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मदत करायला पाहिजे परंतु तसे होत नाही आणि सभागृहात याविषयी सताधारी किवां विरोधी पक्ष तोंड ऊघडत नाही. यावरुण ही मीलीभगत ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी लक्षात घ्यायला पाहिजे आज रोजी राज्यात खाजगी व सहकारी दोनशेच्यावर साखर कारखाने चालत आहेत यांना पुरेसा ऊस उत्पादक जीवाचे रान करुन पिकवत आहे याचा कोणी विचार करण्यास तयार नसल्याने आता ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ऊसाला पर्यायी पिकाची निवड करायला पाहिजे मका, चियासीड, हळद या पिकाकडे वळले पाहिजे अब्जावधी गुंतवणुक आसलेले कारखाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून कोट्यावधी रुपयांची उलाढाल करीत आहेत.

## सुसंस्कार विद्या मंदिरच्या विज्ञान प्रदर्शनीत विद्यार्थ्यांची सर्जनशीलता उजळली

### चिमुकल्यांच्या अभिनव प्रयोगांनी वेधले सर्वांचे लक्ष

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - स्थानिक सुसंस्कार विद्या मंदिर येथे आयोजित विज्ञान प्रदर्शनी उत्साहात पार पडली. विज्ञान दिनाचे औचित्य साधून वर्ग ४ ते ९ च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित या प्रदर्शनीत चिमुकल्या विद्यार्थ्यांनी कल्पकता आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा सुंदर मिलाफ सादर केला. विज्ञान युगात विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढावी, संकल्पना प्रत्यक्ष प्रयोगातून समजाव्यात आणि वैज्ञानिक दृष्टिकोन रुजावा, या उद्देशाने शाळेत दरवर्षी हा उपक्रम राबविला जातो.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव संजय कोचे होते. प्रमुख पाहुणे व परीक्षक म्हणून जगदंबा विज्ञान महाविद्यालयचे प्राचार्य संजय हजारे, प्रा. विशाखा ठोसर, लोकनायक बापूजी अणे विद्यालयच्या सेवानिवृत्त मुख्याध्यापिका छाया पांडे तसेच मेघा ट्युशन्सच्या संचालिका मेघा भास्करवार उपस्थित होत्या. मुख्याध्यापिका उषा कोचे यांच्या उपस्थितीत फित कापून प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी नूतनीकरणक्षम ऊर्जा, पवन व सौर ऊर्जा, रेन हार्वेस्टिंग, जल शुद्धीकरण, कचरा व्यवस्थापन, हायड्रॉलिक लिफ्ट, टेस्ला कॉईल, मानवी हृदयाची प्रतिकृती, जलविद्युत केंद्र, रेल्वे अपघात नियंत्रण, पर्यावरण स्नेही प्लास्टिक आदी विषयांवरील प्रतिकृती सादर केल्या. प्रत्येक मॉडेलमागील वैज्ञानिक तत्त्वे विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने समजावून सांगितली. परीक्षकांनी निरीक्षणानंतर उत्कृष्ट प्रतिकृतींना प्रमाणपत्र देऊन गौरविले. पाहुण्यांनी मार्गदर्शन करताना सातत्य, जिज्ञासा आणि परिश्रम यांच्या बळावर यशाचे शिखर गाठण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राखी नाहाते यांनी केले. शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सहकार्याने प्रदर्शनी यशस्वी ठरली.

## चिमुकल्यांनी ठेवला रमजान महिन्यातील पहिला रोजा



**जनमाध्यम प्रतिनिधी**

बाभुळगाव - मुस्लिम धर्माचा रमजान महिन्याची 19 फेब्रुवारी पासुन सुरुवात झाली. मुस्लिम धार्मियांच्या अंत्यत पवित्र महिना मानला जातो. लहाना पासून तर वृद्धा पर्यंत कडक उपवास करतात आज रोज्याचा तिसरा दिवस आहे.यात सात चिमूल्यांनी पहिला रोजा ठेवून पूर्ण केला आहे. या मुलांचे गावात कौतुक होत आहे.

बाभुळगाव येथील रहिवासी हुज़ेफ इरफान खान, अलिज़ा राजिक खान, नमिरा सलिम शेख, सिदरा शेख इरशाद, समैरा अज़मत मुल्ला, मिटणापुर येथील निजाम खान याने आज आपला पहिला रोजा (उपवास) वयाच्या 7 व्या वर्षी आज आपला पाहिला रोजा पूर्ण केला आहे. रोजाची सुरुवात इस्लामिक कॅलेंडरमधील पवित्र रमजान महिन्यात चंद्रदर्शनानंतर होते. रमजान हा नववा महिना असून, हा महिना २९ किंवा ३० दिवसांचा असतो. दररोज पहाटे (सूर्योदयापूर्वी) 'सहरी' करून रोजा सुरू होतो आणि संध्याकाळी (सूर्यास्तानंतर) 'इफ्तार' करून रोजा सोडला जातो. रोजा म्हणजे केवळ उपाशी राहणे नव्हे, तर वाईट पाहणे, वाईट ऐकणे आणि वाईट बोलण्यापासून दूर राहून स्वतःवर ताबा मिळवणे होय. सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत अन्न आणि पाणी न घेता रोजा पाळला जातो असे कठीण उपवास चिमुकल्याने ठेवलेले उपवासाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## रमजान महिन्यात लोडशेडिंग बंद करा भारत मुक्ती मोर्चाने दिले निवेदन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

नेर - सध्या रमजान चा पवित्र महिना सुरू आहे व या रमजान महिन्यात सर्व मुस्लिम बांधव रोजा ठेवत असतात, हा रोजा फार कठीण पद्धतीने केला जातो, यामध्ये, शेतकरी, शेतमजूर, कामगार वर्ग व लहान मुले सुद्धा हा कठीण रोजा करत असतात, रितीरिवाज, कार्यपद्धती व त्याची वेळ याचा समतोल राखावा लागतो, हा रमजान महिना फेब्रुवारी उन्हाळ्याचा असताना व अशातच हा रमजान महिना येत असल्याकारणाने व त्यांच्या दिनचर्येत विद्युत प्रवाह गेल्यास मुस्लिम बांधवांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागतो, हे होऊ नये म्हणून भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चा, मराठा सेवा संघ व विविध सामाजिक संघटनेच्या वतीने सहाय्यक अभियंता विद्युत वितरण कंपनी नेर यांना निवेदना द्वारे विनंती करण्यात



आली आहे की विद्युत वितरण कंपनीने या रमजान महिन्यात लोडशेडिंग करणे थांबवावे.

यावेळी भारत मुक्ती मोर्चा जिल्हाध्यक्ष सुनील गवई, मराठा सेवा संघात तालुकाध्यक्ष प्रा.मनोहरराव देशमुख, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चाचे रजा शेख, राष्ट्रीय किसान मोर्चाचे अरविंद पाटील, भारतीय बेरोजगार मोर्चाचे जिल्हा संयोजक गायकवाड, भारत मुक्ती मोर्चाचे संघटक सचिव राजीव डफाडे, मिलिंद जामनकर, मोहम्मद रेहान, इलियास, मोहम्मद शोएब खान, इमरान खान, मोहम्मद उबेद, रहेमान इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

### मधुकर नगर येथील आलम नशरा या दहा वर्षीय चिमुकलीने ठेवला रमजान निमित्त पहिला रोजा




पुसद - सध्या विश्वभरात रमजानचा पवित्र महिना सुरू असून त्यानिमित्ताने ज्येष्ठ नागरिक असो की तरुण वर्ग यामध्ये उत्सुकता वाढल्याचे पहावयास मिळते त्यासह लहान चिमुकले सुध्दा मागे राहिले नाही, ग्रामपंचायत मधुकर नगर येथील दहा वर्षीय आलम नशरा मोहम्मद अजीम हिने पवित्र रमजान महिन्यानिमित्त दिनांक २८ फरवरी २०२६ रोजी १०वा रमजान आपल्या जीवनातील पहिला रोजा पूर्ण करून कुटुंबियांसह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण केले आहे. एवढ्या लहान वयात रोजा ठेवण्याचा तिचा निर्धार पाहून परिसरातील नागरिकांनी तिचे कौतुक केले. सध्या पवित्र रमजान महिन्याची सुरुवात होताच संपूर्ण देशभरात, तसेच पुसद शहरातही भक्तीमय वातावरण पाहायला मिळत आहे. ज्येष्ठ नागरिकांपासून तरुणाईपर्यंत सर्वांमध्ये धार्मिक उत्साह ओसंडून वाहत आहे. मशिदींमध्ये नमाज अदा करण्यासाठी मोठी गर्दी होत असून इफ्तारच्या वेळी समाजातील बांधव एकत्र येऊन उपवास सोडतांना बंधुभावाचे दर्शन घडत आहे. इस्लाम धर्मानुसार रमजानचा रोजा हा केवळ उपवास नसून आत्मशुद्धी, संयम आणि इतरांच्या भुकेची व तहानेची जाणीव करून देणारा पवित्र उपक्रम आहे. लहान वयातच या मूल्यांची जपणूक करत आलम नशरा मोहम्मद अजीम हिने पहिला रोजा पूर्ण केला. तिच्या या प्रयत्नामुळे इतर चिमुकल्यांनाही प्रेरणा मिळत असल्याचे नागरिकांनी सांगितले आहे. रमजान महिन्यामुळे शहरात धार्मिक व सामाजिक एकोपा अधिक दृढ होत असून सर्वत्र शांतता, बंधुभाव आणि सेवाभावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त

### प्लास्टिक प्रदूषण पर्यावरण व मानवी आरोग्यासाठी हानिकारक

**अमरावती**- केंद्रीय आयएपीच्या पर्यावरण समूहाद्वारे आयएपी अमरावती शाखा आणि रोटरी क्लब ऑफ अमरावती मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध अंबादेवी मंदिर परिसरात 'प्लास्टिक-मुक्त दिन' आयोजित केल्या गेले. याप्रसंगी पर्यावरण समुहाचे राष्ट्रीय



अध्यक्ष डॉ सतीश अग्रवाल यांनी प्लास्टिक प्रदूषणानी पर्यावरण व मानवी आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती दिली. रोटरी क्लबचे अध्यक्ष रो आशिष मोंगा यांनी अशा सर्व जनोपयोगी मोहिमांमध्ये क्लबच्या सहभागितेची हमी दाखविली. आयएपी अमरावती शाखेच्या अध्यक्षा डॉ प्रतिभा काळे यांनी सार्वजनिक ठिकाणी वाढत्या प्लास्टिक प्रदूषणाबद्दल चिंता व्यक्त केली. अंबादेवी संस्थानचे सचिव डॉ जयंत पंढरीकर यांनी सर्वांना ही मोहीम यशस्वी करण्याचे आवाहन केले. संचालन आशिष गताडेंनी केले व डॉ मनमोहन सोनी यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमात दुकानदार आणि भक्तगणांना प्लास्टिकचे वापर कमी करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यावरण समूहाचे जिल्हा समन्वयक डॉ नितीन बरडिया, डॉ सुरज बंसोड यांच्यासह सर्वांनी परिश्रम घेतले. यावेळी प्रमोद पुरोहित, जयंत गगलानी, राहुल शर्मा, अधि राजेंद्र पांडे, विजया गुढे, आप्पाजी कोल्हे, प्रवीण दांगे, अंदुरकर, कराळे, दीपक डांगे यांच्यासह मोठ्या संख्येत उपस्थित होते.

### थॅलेसिमिया व सिकलसेल बालरुग्णांसाठी शिबीर

**अमरावती**-इंडियन अकॅडमी ऑफ पेडियाट्रिक्स अमरावती, बालरोग विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती तसेच अरुणोदय हार्ट अॅण्ड हेमॅटोलॉजी हॉस्पिटल, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने थॅलेसिमिया आणि सिकलसेल



बालरुग्णांसाठी मोफत तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन डॉक्टर पंजाबराव देशमुख रुग्णालय येथे करण्यात आले होते.उद्घाटन महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी आपल्या मनोगतात अशा प्रकारच्या जनजागृतीपर आणि रुग्णहिताच्या उपक्रमांचे महत्व अधोरेखित करत थॅलेसिमिया व सिकल सेल या आजारांविषयी संक्षिप्त माहिती दिली.डॉ. प्रतिभा काळे यांनी प्रस्ताविक भाषण करून शिबिराच्या उद्दिष्टांविषयी माहिती दिली.डॉ. नरेश तायडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत नियमित तपासणी, योग्य उपचार व समुपदेशनाचे महत्व स्पष्ट केले.अरुणोदय हार्ट अॅण्ड हेमॅटोलॉजी हॉस्पिटल, नागपूर येथील हेमॅटोलॉजी तज्ज्ञ डॉ. रिया बाल्लीकर यांनी थॅलेसिमिया व सिकल सेल आजाराच्या अद्ययावत उपचारपद्धती, रक्तसंक्रमण व्यवस्थापन व बोनमॅरो ट्रान्सप्लांटविषयी माहिती दिली.पालकांच्या शंकांचे निरसन करून दीर्घकालीन काळजी, आहार व नियमित फॉलोअपचे महत्त्वही त्यांनी अधोरेखित केले.शिबिराला बालरुग्ण व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

### शिष्यवृत्ती परीक्षेत कुऱ्हा हायस्कुलचे सुयश



**कुऱ्हा**-स्थानकि अशोक शिक्षण संस्था, अशोकनगर द्वारा संचालित कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय कुऱ्हा येथील विदयार्थ्यांनी(एन.एम.एम.एस.) राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे या परीक्षेमध्ये विद्यालयाचे एकूण २९ विद्यार्थी बसले होते त्यापैकी शर्वरी सुने,अक्षरा सम्भे,ईश्वरी दारोकार,श्रावणी राऊत,पूर्वा गभणे,,अंतरा कुऱ्हेकर,यश तायडे या विद्यार्थ्यांनी या परीक्षेमध्ये उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले आहे.याबद्दल कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्या तथा मुख्याध्यापिका ए.बी.चांबटकर ,एस.आर.ईसळ ,व्ही.आर. इंगोले,एन.डी.राठोड,मार्गदर्शक शिक्षिका, एस.व्ही. चौधरी,के.एन.ढगे,एस.एन.दवाळे,जे.पी. निमकर,व्ही. जी. बेठेकर,एस.ए.पारवे,एस. एस. चव्हाण,एच.बी. जाधव,एस.एस इरपाते,पी. एम. राऊत, प्रा.,एच. एन. बोके,प्रा.एस.पी.ढोले,एन. एस.घुणारे,प्रा.एम.एच. वाळके सर, प्रा.एस. आर.जीरापुरे,प्रा.एम. एस.शिरभाते,प्रा. एस.पी. रवाळे,आर. ए. गुल्हाने यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांचा सत्कार करण्यात आला आहे.

### विद्यार्थी काव्य संमेलनात मराठी भाषा गौरव दिन



**नांदगाव खंडेश्वर** - एकलव्य गुरुकुल नांदगाव खंडेश्वर येथे संस्थेचे मार्गदर्शक शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त सदानंद जाधव यांचे अध्यक्षतेखाली मराठी भाषा गौरव दिन झाला. या वेळी मंचावर शाळेचे मुख्याध्यापक विलास मारोटकर, व्यवस्थापक अनुप काकडे, डॉ. गजानन काकडे, प्रा. अमर डांगे, प्रा. निशिगंधा सोनोने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण करतांना डॉ काकडे यांनी मराठी भाषेला मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा या बाबीचे वर्णन करून आजतगायत मराठी भाषेची व्याप्ती विषद केली. शाळेतील विद्यार्थ्यांनी काव्याचे, पद्य रचनेचे लयबद्द सादरीकरण केले. प्रा निशिगंधा सोनोने यांनी काव्यशैलीतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तर प्रा डांगे यांनी काव्य परंपरा मांडली. अध्यक्षीय भाषण करतांना सदानंद जाधव यांनी मराठीतुन शिक्षण घेऊन उच्च स्तर गाठता येते हे मार्मिक शब्दात सांगितले. कार्यक्रमाचे संचालन विद्यार्थिनी सेजल ढवस हिने तर आभार प्रदर्शन विद्यार्थिनी युक्ता शिनगारे हिने केले. पसायदाने कार्यक्रम सांगता करण्यात आली.

# 'निपुण चाचणी' तील अडचणींमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यात अडचणी

**अमरावती/का.प्र.**

निपुण महाराष्ट्र अंतर्गत सुरू असलेल्या ऑनलाईन चाचणीत येणाऱ्या अडचणी व अडथळ्यांमुळे दैनंदिन शैक्षणिक कार्य होत असल्याने सदर चाचणी प्रक्रिया सुलभ करावी अन्यथा ती बंद करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख एका लेखी निवेदनाद्वारे जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य व शिक्षणाधिकारी प्राथमिक यांच्याकडे यांच्याकडे करणार आहे.

निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत इयत्ता दुसरी ते पाचवीच्या विद्यार्थ्यांची दरमहा ऑनलाईन चाचणी घेतल्या जाते. फेब्रुवारी महिन्याची चाचणी २३ तारखेपासून सुरू असून उपयोगात आणले जाणारे ॲप अत्यंत सुमार दर्जाचे असल्याने सदर चाचणी घेण्यात शिक्षकांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे.

आंतरजालाची सबंद्धता व ॲप मधील तांत्रिक दोष व अक्षमता यामुळे सदर चाचणी वेळेत पुर्ण होत नाही. शिवाय ॲप मधील दोषामुळे विद्यार्थ्यांचे बोली भाषेतील उच्चार व विद्यार्थ्यांची वाचनाची गती ॲप स्वीकारत नसल्याने अनेक पात्र विद्यार्थी सुद्धा या चाचणीत निपुण ठरत नाही. शिवाय संगणकप्रणाली पुर्णक्षमतेने काम करीत नसल्याने या चाचणीत अनेक अडचणी निर्माण होत असतात.परिणामी एकीकडे दिवसभाराची अध्ययन अध्यापन




सुमार दर्जाच्या ॲपमुळे चाचणी ठरते अडथळ्यांची शर्यत

प्रक्रीया बाधित होते तर दुसरीकडे सदर चाचणी सुद्धा पुर्ण होत नाही. यामुळे विद्यार्थ्यांचे मुल्यमापन होणे दुर उलट ही चाचणी आता विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यात अडथळा ठरू पहात आहे.या ॲप मधील तांत्रीक दोष व मुल्यमापनातील वस्तुनिष्ठतेचा अभाव याबाबी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या निदर्शनास आणून देवून या ऑनलाईन चाचणी बंद कराव्या अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने करण्यात आली आहे.दर महीण्याला ही चाचणी घेणे बंद करावे.

विद्यार्थ्यांच्या परीक्षा किती घ्याव्या या बाबत शासनाने ठरवले होते.याला शासनाने हरताळ फासला असून वारंवार मुलांच्या परीक्षा घेतल्या जाणे हे चुकीचे आहे.ऑनलाईलची कोणतीही सुविधा शाळेत नसतांना तसेच दुर्गम व ग्रामिण भागात इंटरनेटची पुरेशी सुविधा आजही नाही.मग अश्या अतिरीक्त परीक्षा कशाला असा प्रश्न शिक्षकांनी विचारला आहे.विद्यार्थ्यांच्या प्रथम व व्दितीय सत्रात अशा मिळून दोन आकारीत व दोन संकलित चाचणी अश्या चारच परीक्षांमधून विद्यार्थांचे मुल्यमापन केले जाते.मग अतिरीक्त परीक्षा कश्या करीता हे शिक्षण विभागाने स्पष्ट करणे आवश्यक आहे.

# ग्रामपंचायतीत तीन महिन्यांपासून जमा-खर्चाचा हिशेबच नाही!

## ग्रामसेवकावर आक्षेप : चौकशी, कारवाईची मागणी

**आसेगाव पूर्णा/ वार्ताहर**

आसेगाव पूर्णा चांदूर बाजार तालुक्यातील मोठ्या गावांपैकी एक आसेगाव पूर्णा ग्रामपंचाय तीच्या ग्रामसेवकांनी गेल्या तीन महिन्यापासून जमाखर्च दाखवून त्याचा हिशेब दिलेला नाही. याप्रकरणी त्यांची चौकशी करून ग्रामसेवकावर कारवाई करण्याबाबतचे लेखी निवेदन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यपालन अधिकारी यांच्याकडे सरपंचासह ग्रामपंचायत सदस्यांनी दिले आहे.

निवेदनानुसार आसेगाव ग्रामपंचायतीत कार्यरत ग्रामसेवक प्रदीप भाकरे यांनी गेल्या तीन महिन्यांपासून डिसेंबर २०२५ ची मासिक सभा २३ जानेवारी




२०२६ रोजी बोलावून स्वतः गैरहजर राहिले. तीच तहकूब सभा २६ जानेवारी रोजी घेण्यासाठी सर्व सभासदांच्या स्वाक्षऱ्या घेऊन त्यांनी केबिनमध्ये इतिवृत्त कुलूपबंद केले.नोव्हेंबर २०२५ पासून खर्चाचा हिशेब न देणे, सभा-बैठकीला गैरहजरी, मजुरांच्या बिलाबाबत विचारणा केल्यास वाट्याची मागणी, खोटे व्हाउचर, सदस्यांना उडवाउ डवीची उत्तरे व धमक्या, इतिवृत्तात सदस्यांचे मत न नोंदविणे, मोफत झेरॉक्सचे बोगस बिल, वारंवार एकाच वॉर्डाची कामे दाखवून रकमा उकळणे, सदस्यांना विश्वासात न घेता त्यांच्या बोगस सह्या मारणे आदी आक्षेप नोंदविले गेले आहेत.

> सरपंचाच्या स्वाक्षरीशिवाय मी एकटा पैसे काढू शकतो काय? सवलत योजनेमुळे कर वसुली झाली. ही रक्कम तक्रार देणाऱ्यांच्या मनमर्जीने खर्च न केल्यामुळे, या रकमेतील वाटा न दिल्यामुळेच तक्रार करून दिशाभूल करण्यात आली आहे.
>
> **प्रदीप भाकरे,**
> ग्रामपंचायत अधिकारी

# होळी सण वृक्षपूजन करुन साजरा करा

## श्री साईबाबा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे आवाहन

**अमरावती/ का.प्र.**

श्री साईबाबा विद्यालय, साईनगर अमरावती येथील राष्ट्रीय हरीत सेना युनिटच्या वतिने होळी सण, वृक्षपुजन करुन व रासायनिक रंगांचा वापर टाळून साजरी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

होळी हा सण आपल्या संस्कृती मध्ये एक महत्वाचा सण आहे. हा सण मुख्यतः दोन भागात असतो होलिकाला न जळण्याचे वरदान असून ही ती मनामध्ये कपट, द्वेष असल्यामुळे अग्नित भस्म झाली पण प्रल्हाद हा सात्विक व शुध्द अंतःकरणाचा असल्याने त्याला कोणतेच कष्ट झाले नाही त्याच प्रमाणे ह्या दिवशी आपल्या मनातले द्वेष, कपट, ईर्ष्या, राग ह्या दुर्गुणांची होळी म्हणजेच त्यांना नष्ट करण्यासाठी हा सण असतो पण आपण आज होलिका दहनाचा नावावर झाडांना नष्ट करतो त्यांना जाळून वायू प्रदुषण करतो व पर्यायाने पर्यावरणाचा ऱ्हास करतो.होळीच्या दुसऱ्या दिवशी रंगपंचमी साजरी केल्या जाते. ह्या दिवशी एकमेकांना रंग लावल्या जाते व पाणी फेकल्या जाते. शास्त्रानुसार ह्या दिवशी गुलाल व अबीर लावून पळसाच्या फुलांनी तयार केलेले रंगीत पाणी फेकण्याची पध्दत आहे. या प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापक टावरी, पर्यवेक्ष पसारकर राष्ट्रीय हरित सेना प्रभारी शिक्षक मानकर, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांच्यातर्फे होळी सण वृक्षपुजन करुन व रासायनिक रंगाचा वापर टाळून साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# प्रभाग क्रमांक १९ मध्ये रमजान दरम्यान पाणीटंचाई तीव्र

**अचलपूर/ वार्ताहर**

अचलपूर शहरातील प्रभाग क्रमांक १९ मधील मैना वाली मस्जिद परिसर, शहजाद कॉलनी व मुकेरी पुरा या भागात मागील १५ दिवसांपासून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा पूर्णपणे बंद असल्याने नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. सध्या रमजानचा पवित्र महिना सुरू असून या काळात पाण्याअभावी नागरिकांची गैरसोय होत आहे.

मुस्लिम बहुल असलेल्या या परिसरात रोजेदारांना सहरी आणि इफ्तारसाठी आवश्यक पाण्याची व्यवस्था करणे कठीण झाले आहे. महिला व लहान मुले हातात बादल्या, डबे घेऊन इतर भागांतून पाणी आणण्यासाठी भटकंती करत असल्याचे चित्र दिसत आहे. काही ठिकाणी खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत असून त्यासाठी नागरिकांना अतिरिक्त खर्चही करावा लागत आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, नगर परिषदेच्या ढिसाळ



## नागरिकांमध्ये संताप

कारभारामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. प्रभाग १९ चे नगरसेवक फिरोज खान यांनी सांगितले की, त्यांनी नगराध्यक्ष तसेच पाणीपुरवठा अभियंत्यांशी अनेक वेळा दूरध्वनीवर संपर्क साधला, प्रत्यक्ष भेट घेतली आणि लेखी निवेदन देऊन नियमित जलपुरवठा सुरू करण्याची मागणी केली. मात्र, अद्यापही समस्या कायम असून कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. रमजानसारख्या पवित्र महिन्यातही प्रशासनाने संवेदनशीलता दाखवली नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, नागरिकांनी मुख्याधिकारी व संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देत तात्काळ नियमित पाणीपुरवठा सुरू करण्याची मागणी केली आहे. येत्या तीन दिवसांत प्रश्न निकाली न काढल्यास नगर परिषद कार्यालयावर धडक देत आंदोलन छेडण्याचा इशाराही रहिवाशांनी दिला आहे.पेयजल ही मूलभूत गरज असताना त्यासाठी संघर्ष करावा लागणे अत्यंत दुर्दैवी असल्याची भावना स्थानिकांनी व्यक्त केली आहे. तत्काळ टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा तसेच कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.आता नगर परिषद प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे कितपत गांभीर्याने पाहते आणि प्रभाग क्रमांक १९ मधील नागरिकांना दिलासा कधी मिळतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# भारतीय विद्यामंदिर अमरावतीची नवनिर्वाचित कार्यकारणी जाहीर



**अमरावती/ का.प्र.**

भारतीय विद्यामंदिर अमरावती या शिक्षण संस्थेच्या कार्यकारणीची निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीत संस्थेच्या अध्यक्षपदी भारतीय महाविद्यालय अमरावती येथील प्राचार्य आराधना गजानन वैद्य यांची निवड करण्यात आली. गौरवाची बाब म्हणजे संस्थेच्या पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून त्यांना हा मान प्राप्त झालेला आहे.

तसेच संस्थेच्या सरचिटणीसपदी डॉ. प्रशांत वसंतराव भागवतकर यांची तर कोषाध्यक्षपदी अनंत सोमवंशी यांची निवड करण्यात आली. संस्थेच्या उपाध्यक्षपदी डॉ.रमेश बिजवे व डॉ. सतीश कुलकर्णी तर सचिवपदी सलील चिंचमलापुरे व अमित बिजवे यांची निवड करण्यात आलेली आहे.शिक्षण क्षेत्रात अत्यंत नामांकित असलेल्या भारतीय विद्यामंदिर या शिक्षण संस्थेची स्थापना १९५८ साली झाली. शिक्षकांनी बहुजन समाजातल्या व तळागाळातल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी निर्माण केलेली संस्था असा या संस्थेचा नावलौकिक आहे व अमरावती क्षेत्रामध्ये आपल्या महाविद्यालयांद्वारा अतिशय बहुमूल्य अशी सेवा सातत्याने प्रदान केलेली आहे.या संस्थेमध्ये २०२६ते २०२९ या कालावधीसाठी संस्थेच्या नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली असून संस्थेच्या नवनिर्वाचित कार्यकारणीचे सर्व क्षेत्रातून अभिनंदन केल्या जात आहे.

### राज्यमंत्री पंकज भोयर यांचा भाजपा मेळघाटतर्फे सत्कार



**अचलपूर** - गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर हे धारणी चा दौऱ्यावर परतवाडा शहरातील शासकीय विश्रामगृहात भाजपा मेळघाट ग्रामीण तर्फे सत्कार करण्यात आले.यावेळी जिल्हाध्यक्ष माजी आमदार प्रभुदास भिलावेकर, महामंत्री सुधीर रसे, भाजयुमो जिल्हाध्यक्ष तुषार खेरडे, गिरीश भोयर आदी उपस्थितीत होते.

# विद्यानिकेतन शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनातून सामाजिक प्रबोधनाचा जागर

**अमरावती/ का.प्र.**

शहरातील रामनगर येथील श्री विद्यानिकेतन शिक्षण संस्थेद्वारा संचालित, विद्यानिकेतन प्राथमिक शाळेचा ३७ वा वार्षिक उत्सव सोहळा नुकताच सुयोग मंगल कार्यालय, रुक्मिणी नगर येथे संपन्न झाला. तीन दिवसीय चाललेल्या या उत्सवात विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली.

सोहळ्याचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार माधव पांडे यांच्या हस्ते करण्यात आले.अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार अविनाश दुधे होते.व्यासपीठावर संस्थेच्या सचिव सुप्रसिद्ध लेखिका, निवेदिका, वसुंधरा काशीकर, मुख्याध्यापिका विद्या देशमुख व मान्यवर उपस्थित होते.याप्रसंगी वसुंधरा काशीकर यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा शाल, श्रीफळ व ग्रामगीता देऊन सत्कार केला. सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी प्लास्टिक निर्मूलनावर आधारित 'मले बाजाराला जायचं बाई' हे पथनाट्य प्रभावीपणे सादर केले. पहिल्या महिला डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या जीवनावरील लघु नाटिका आणि सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणाच्या वारशा वर



आधारित विविध वेशभूषांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.सोहळ्यात गुणवत्ता यादी स्थान पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांसह समर्थ विद्यापीठाच्या परीक्षेत सुवर्ण रजत व कांस्यपदक मिळवणाऱ्या गुणवंतांचा पदक व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. संस्थेच्या सचिव वसुंधरा काशीकर यांनी पालकांशी संवाद साधताना प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व, राष्ट्रप्रेम आणि मुलांमधील सुप्त गुणांना वाव देण्याचे आवाहन केले. संस्थेचे सहसचिव आ.आल्हाद काशीकर यांनी २१ व्या शतकातील आव्हाने पेलणारे, सक्षम विद्यार्थी घडवण्यासाठी, शाळा कटीबद्ध असल्याचे सांगत, पालकांना मुलांच्या जडणघडणीत जबाबदारीने वागण्याचा मोलाचा सल्ला दिला. उद्घाटक माधव पांडे व अध्यक्ष अविनाश दुधे यांनी शाळेच्या प्रगती बद्दल व शिस्तीबद्दल गौरवोदगार काढले. संचालन शिक्षिका योगिनी घोटकर व शितल खांदे यांनी केले. प्रास्ताविक आरती देशपांडे यांनी तर आभार प्रदर्शन ज्योती जांभळे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता श्रीनिवास मोहोड सरांनी सादर केलेल्या 'पसायदानाने' झाली. या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका विद्या देशमुख व जेष्ठ शिक्षिका आरती देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## मेळघाटातील आदिवासी बांधवांची होळी
# सकारात्मक दृष्टकोन असणारी आनंद पर्वणीच!!

आदिवासी बांधवांचा असा विश्वास आहे की, ही सृष्टी निसर्गाने निर्माण केली असून आपल्या सर्व गरजा त्यांच्या कृपेनेच पूर्ण होतात. त्यामुळे त्यांच्या मनात ईश्वराबाबत आदर व भीती निर्माण झालेली आहे. ईश्वराला प्रसन्न करण्यासाठी पूजा विधी या पद्धती निर्माण झाल्या आहेत. जीवनाच्या प्रत्येक प्रसंगी ते ईश्वराची आराधना करतात. चांगली शिकार मिळण्याकरिता, चांगले पीक येण्याकरिता, रोगापासून मुक्तता मिळण्याकरिता, आजार बरा होण्याकरिता इत्यादी. त्यांचे जीवन हे अतिशय खडतड आहे. जीवन संघर्ष अतिशय कठीण आहे व त्यापासून मुक्तता मिळावी, जीवनातील आनंद प्राप्त व्हावा म्हणून अनेक सण व उत्सव कोरकू समाजामध्ये पाहायला मिळतात.व्यक्तिगत जीवनाला कोरकू समाजात महत्त्व नाही. व्यक्तिगत जीवनापेक्षा सामुदायिक जीवनाला त्यांच्यात अधिक महत्त्व आहे.देवाविषयी, निसर्गा विषयी आपली कृतज्ञता



म्हणून मेळघाट मधील कोरकू आदिवासी बांधव विविध सण साजरे करतात. त्यामध्ये होळी हा त्यांचा सर्वात आवडता व महत्त्वाचा सण आहे.

होळी कोणत्या तारखेला साजरी करायची याचा निर्णय गावप्रमुख व इतर पंचांच्या साह्याने घेतात. जसजशी होळी जवळ येते तसतसे प्रत्येक कोरकू खेड्यात ढोलाचा आवाज घुमत असतो. ढोलाच्या तालावर पावलांची हालचाल सुरू असते व सुरेख गीतांनी जंगलातही मंगलमय वातावरण निर्माण होते. मेळघाट मध्ये आदिवासींची होळी ही एक अनोखी परंपरा आणि निसर्गाशी जोडलेला सण आहे होळीमध्ये प्रत्येक आदिवासी बांधव जो कामाकरिता, शिक्षणाकरिता किंवा नोकरी करिता स्थलांतरित झालेला असेल आपापल्या गावी होळी साजरी करण्यासाठी येतात. होळीच्या सणाकरिता विशेष नवीन कपड्याची खरेदी, दागिन्यांची खरेदी, मुला मुलींच्या लग्नाविषयक संबंधाची बोलणी या सर्व व्यवहाराची सुरुवात शुभ मुहूर्त म्हणून होळीच्या सणापासून मेळघाटातील आदिवासी बांधव करतात. (डी. जी. पाटील, १९९८ : पा.नं.१०६-१०७) यांच्या मते, होळीच्या आधीपासूनच मेळघाटामध्ये विविध दिवशी भरणाऱ्या आठवडी बाजारामध्ये आदिवासी स्त्री-पुरुषांच्या खरेदी करिता बाजार फुललेला असतो. घराची साफसफाई, सडा सारवण करून घरे सजविली जातात.

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, नृत्य करण्यासाठी आवश्यक ढोल, ताशे, टिमकी, बासुरी इत्यादी साहित्य स्वच्छ केले जाते. आदिवासी बांधवांची ही होळी सुमारे पाच दिवसापर्यंत चालते. होळीच्या एक महिना अगोदर बांबूचा दांडा किंवा सावळ्याचा दांडा जुन्या होळीच्या ठिकाणी रोवून ठेवतात. त्यानंतर गावातील प्रत्येक माणूस आपल्या बैलाची जोडी घेऊन जंगलात जातो व पडलेल्या झाडांची लाकडे आणून होळीच्या पटांगणात ठेवतो. बांबूंच्या दांड्याच्या भोवती सर्व लाकडी व्यवस्थितपणे रचून ठेवली जातात. त्यामुळे होळीच्या भोवती उंच उंच अशी लाकडांची थप्पी लागते. होळीचा हा पाच दिवसाचा सण निर्विघ्नपणे पार पडावा म्हणून देवाची उपासना विधी केली जाते. होळी पेटवायच्या जागेवर टेंभुर्णीच्या झाडाची फांदी तोडून गाढली जाते. त्यानंतर फांदीभोवती होळी रचली जाते त्यात पाच बांबू रोवून त्यांच्या टोकावर पळसाची फुलं, डहाळ्या, पुऱ्या, चपाती इत्यादी सामग्री बांधतात, याला होळीचा शृंगार करणे असे म्हणतात. बांबू भोवती तुराट्या, पराठ्या व लाकडे व्यवस्थित रचून ठेवली जातात. गावामध्ये पेटणाऱ्या होळीत गावातील प्रत्येकाने एक लाकूड टाकावे असा दंडक असतो. या सणाच्या दिवशी अगोदर गावाच्या मध्यभागी मेघनाथाची प्रतिमा उभारली जाते. त्याभोवती चार खांब रोवली जातात व एक खांब मेघनाथाच्या प्रतिमेच्या समोर काही अंतरावर अंदाजे वीस ते पंचवीस फुटावर रोवला जातो. त्या खांबाला तेलात भिजवून शेंदूर लावला जातो व त्याची पूजा केली जाते. रात्रभर त्या खांबाभोवती नाच सुरू असतो. गावातील वयोवृद्ध मंडळी या ठिकाणी जमा होतात व आपले फगनई नृत्य करतात. हे नृत्य करत करत गावातील पाटलाच्या घरी ही सर्व टोळी जमा होते. (अ.द.पवार २००५: ४६-४७) पाटलाची पत्नी मिरवणुकीतील प्रत्येक व्यक्तीला ओवाळून गुलाल लावते. नंतर ही मिरवणूक पाटील व त्यांच्या पत्नीला घेऊन पुन्हा मुठवा देवाजवळ येते. रस्त्याने जाताना पाटलाची पत्नी वाटेवरील सर्व देवतांची पूजा करते. या दरम्यान 'शिदु' (कोरकूंची पारंपारिक दारू) प्राशन केली जाते. त्यानंतर ही मिरवणूक होळीच्या ठिकाणी जाते. विविध अलंकाराने नटलेल्या महिला व पुरुष नृत्य करतात. त्यानंतर गावातील पाटलाची बायको व पाटील होळीची पूजा करतो व त्यानंतर इतर लोक सुद्धा होळीची पूजा करतात.

गावातील होळी ही गावातील मुखिया म्हणजे पाटील यांच्या हाताने पेटवली जाते. होळी दहनानंतर आदिवासी फगवा मागतात. फगवा हा धान्य व पैशाच्या स्वरूपामध्ये असतो. गावातील विविध ठिकाणी घरोघरी तसेच दुकानात सुद्धा होळीचा फगवा मागितला जातो. विविध गावातील नृत्य पथके होळी पेटवण्याच्या दिवशी विनो दाणे भरलेली गाणी गातात. होळी जाळवताना जो उंच उंच दांडा व बांबू रोवलेला असतो तो खाली पडायला आल्यास पोलीस पाटील त्याला दुसऱ्या लाकडाच्या सहाय्याने वरचेवर झेलतो कारण, बांबू व दांडा खाली पडल्यास आदिवासी समाजात अपशकुन मानला जातो. तो डांडा झेलल्यावर त्याची पूजा केली जाते यानंतर गावातील सर्व लोक,नृत्य पथके, स्त्रिया, पुरुष ,मुले आनंदाने बेहोश होऊन होळी भोवती नाचतात व रात्र जागून काढतात. कोरकू बांधव हो होळीमध्ये गाव पाटलाच्या भेटीवरून परत आल्यानंतर भोजन करून रात्रभर मुठवा देवासमोर नृत्य केले जाते.होळी नंतर दुसऱ्या दिवशी रंगपंचमी साजरी करतात. महत्त्वाची बाब म्हणजे पळसाच्या फुलापासून रंगपंचमीसाठी रंग तयार केला जातो. रंग तयार केलेल्या भांड्यात जोपर्यंत फगवा टाकत नाही तोपर्यंत रंग खेळला जात नाही. हा सण सतत पाच दिवस साजरा केल्यानंतर पाचव्या दिवशी पाच दिवसाच्या फिरस्ती नंतर मात्र एकत्र बसून वर्गणी गोळा केली जाते. पैशाची व धान्याची मोजणी केल्यानंतर फगवा मागण्यासाठी जी मंडळी होती त्या मंडळीला एकत्र करून जमा झालेल्या पैशातून कोंबड बोकड बोलावून त्याचा वाटा करून प्रत्येकाच्या घरात देतात. किंवा एकत्रच स्वयंपाक करून सर्वच एकत्रित जेवतात. अशा प्रकारे मोठ्या उत्साहाने व आनंदाने मेळघाट मधील आदिवासी बांधव होळी हा सण साजरा करतात रंगपंचमीच्या दिवशी एकमेकांच्या अंगावर रंग उधळून गुलाल, रंग लावून एकमेकांसोबत रामराम घेतला जातो. एकमेकांसोबत अबोला भांडणे सर्व विसरून या सणात सर्वजण एकत्र येतात. होळीला वाईट शक्तीवर चांगल्याचा विजय मानला जातो. पिकाची भरभराट आणि गावाच्या कल्याणासाठी सुद्धा या दिवशी प्रार्थना केली जाते.मेळघाटा मधील आदिवासींची होळी ही साधी नैसर्गिक आणि परंपरांनी समृद्ध अशी असते ती त्यांच्या संस्कृतीचे आणि निसर्गाशी असलेल्या घट्ट नात्याचे सुंदर प्रतीक आहे.

**डॉ. रोहिणी देशमुख**
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

# महागाई भत्ता:हक्क की हप्ते?

महाराष्ट्र शासन वित्त विभागाच्या २५ फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णयानुसार, ७ व्या वेतन आयोगानुसार महागाई भत्ता ५५% वरून ५८% करण्यात आला आहे. हा निर्णय १ जुलै २०२५ पासून लागू असला तरी त्याची रोख अंमलबजावणी १ फेब्रुवारी २०२६ पासून करण्याचे ठरविण्यात आले आहे. तसेच जुलै ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीतील थकबाकी मार्च २०२६ मध्ये, तर उर्वरित थकबाकी स्वतंत्र आदेशाने देण्यात येणार आहे. महागाई भत्ता हा वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांच्या क्रयशक्तीचे संरक्षण करणारा मूलभूत आर्थिक हक्क मानला जातो. मात्र त्याची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्याचा निर्णय पाहता, हा घटनात्मक व वेतन आयोगानुसार मान्य हक्क आहे की, शासनाच्या आर्थिक सोयीप्रमाणे दिला जाणारा हप्ता असा स्वाभाविक प्रश्न निर्माण होतो.

महागाई भत्ता हा केवळ एक आर्थिक घटक नसून तो वाढत्या महागाईविरुद्ध कर्मचाऱ्यांच्या उत्पन्नाचे संरक्षण करणारे महत्त्वाचे साधन आहे. याशिवाय थकबाकी टप्प्याटप्प्याने देण्याचा निर्णयही प्रश्न उपस्थित करतो. जुलै ते ऑक्टोबर २०२५ या कालावधीची थकबाकी वेगळी आणि उर्वरित रक्कम स्वतंत्र आदेशाने देण्याची तरतूद केल्यामुळे आर्थिक नियोजनात अनिश्चितता निर्माण होते. घरकर्जाचे हप्ते, शैक्षणिक फी, विमा प्रीमियम किंवा इतर मासिक देणी यांचे नियोजन ठराविक उत्पन्नाच्या आधारे केले जाते. तुकड्यांत मिळणारी रक्कम ही स्थैर्याऐवजी अस्थैर्य निर्माण करते.

दरवर्षी शासनाच्या अंदाजपत्रकात वेतन व भत्त्यांसाठी तरतूद असते. त्यामुळे अशा नियमित व अपेक्षित वाढीसाठी विलंब, स्वतंत्र आदेश आणि हप्त्यांची पद्धत का अवलंबावी, हा प्रश्न स्वाभाविकपणे पुढे येतो. आर्थिक शिस्त आणि पारदर्शक नियोजन यांची सुसंगती राखणे ही शासनाची जबाबदारी आहे, अशी अपेक्षा व्यक्त होते.



महागाई भत्त्यातील वाढ केवळ ३% - ५५% वरून ५८% अशी असली, तरी तिचा तत्त्वतः अर्थ मोठा आहे. केंद्राच्या ज्ञापनानंतर राज्याने निर्णय घेणे स्वागतार्ह असले, तरी रोख प्रवाह व्यवस्थापनाच्या नावाखाली हक्काची रक्कम टप्प्याटप्प्याने देणे प्रश्न निर्माण करते. वेतन व भत्ते हा शासनासाठी अनपेक्षित खर्च नाही; महागाई भत्ता सहामाही वाढतो, ही बाब प्रशासनाला पूर्वकल्पित असते. मग वेळेवर आणि पूर्ण तरतूद का करण्यात येत नाही? शासन निर्णयानुसार हा खर्च संबंधित लेखाशीर्षाखाली भागवायचा आहे, म्हणजे निधीची जबाबदारी विभागांवर सोपविण्यात येते. यामुळे केंद्रस्थानी निर्णय जाहीर करून आर्थिक भाराचे विकेंद्रीकरण करण्याचा प्रयत्न दिसतो. आर्थिक व्यवस्थापनाची गरज मान्य असली, तरी कर्मचाऱ्यांच्या हक्काचे विखंडन हे सुयोग्य प्रशासनाचे लक्षण मानता येईल का, हा प्रश्न अनुत्तरित राहतो.

राज्य यंत्रणेचा कणा म्हणजे कर्मचारी वर्ग आहे. शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी, सार्वजनिक सेवा आणि प्रशासनाची गती ही त्यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. शासनाकडून वेळेवर काम, अचूकता आणि जबाबदारीची अपेक्षा केली जाते; त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांनाही वेळेवर देयके मिळणे ही शासनाची बांधिलकी असली पाहिजे. थकबाकी तुकड्यांत देण्याचा निर्णय अनेक स्तरांवर परिणाम करतो. घरकर्ज किंवा शैक्षणिक कर्जाच्या हप्त्यांवर ताण येतो, कुटुंबाच्या मासिक अर्थकारणात अनिश्चितता निर्माण होते, वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर वास्तविक उत्पन्न घटल्याची भावना तीव्र होते.

थकबाकीबाबत 'स्वतंत्र आदेश' काढला जाईल, अशी तरतूद अनिश्चिततेची छाया निर्माण करते. निश्चित वेळापत्रकाऐवजी पुढील आदेशाची प्रतीक्षा ठेवणे म्हणजे कर्मचाऱ्यांच्या अपेक्षांवर अनिश्चिततेची तलवार लटकविण्यासारखे आहे. प्रशासनात स्पष्टता आणि पूर्वनियोजन महत्त्वाचे असताना, अशा प्रकारची भूमिका ही अनिश्चिततेचे प्रशासन दर्शवते, अशी भावना निर्माण होणे स्वाभाविक आहे. पुढची दिशा स्पष्ट, वेळेवर आणि एकरकमी या पार्श्वभूमीवर शासनाने काही मूलभूत बाबी तातडीने स्पष्ट करणे आवश्यक आहे. उर्वरित थकबाकी देण्याची निश्चित तारीख जाहीर करणे, भविष्यातील महागाई भत्ता वाढीसाठी स्वयंचलित अंमलबजावणी यंत्रणा उभारणे, अंदाजपत्रकात सहामाही वाढीसाठी स्वतंत्र राखीव तरतूद करणे ही पावले विश्वास निर्माण करणारी ठरतील. तुकड्यांत देय टाळून एकरकमी अंमलबजावणीची स्पष्ट भूमिका घेणे ही काळाची गरज आहे.

**डॉ. प्रशांत विघे**
मो. ९३२६८७७७४९

## शेतात राबणाऱ्या हातांची गोडवी गाणारा
# 'झालं बाटुकाचं जिणं'

ग्रामीण जीवनामध्ये दुष्काळी भागात शेतकऱ्याच्या वाट्याला येणार जिणे आणि त्या जगण्याला गाणे बनवत शेतकरी बाप कसा अभिमानाने जगतो, याच ग्रामीण जीवन कवी आकाश भोरडे यांनी 'झालं बाटुकाचं जिणं' कविता संग्रहातून मांडले आहे. शेती, माती आणि निसर्ग शेतकऱ्याला कधी साद घालतात तर कधी हुलकावणी देतात. यातून मात करत पुढे जायला शिकवणाऱ्या कविता खऱ्या अर्थाने शेतात राबणाऱ्या हातांची गोडवी गातात. आकाश भोरडे हा शिरूर तालुक्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्याचा पुत्र आहे. शालेय जीवनापासूनच अवतीभवती असलेला निसर्ग शेतकऱ्याचे जीवन त्याने आपल्या कवितेतून उतरवले आहे. आकाश हा एक आदर्श पत्रकार असून ग्रामीण जीवनाशी रसमय झालेले असे त्याचे व्यक्तिमत्व आहे. कविता संग्रह वाचताना प्रत्येक कविता ही शेतकरी असलेल्या व्यक्तीच्या मनातील संवाद सांगणारी आहे. कवितासंग्रहात एकूण ७६ कविता आहेत. कुटुंब पद्धती, नातेसंबंध, शालेय जीवन, राजकीय विचार, निसर्ग, पशू पक्षी, शेती अवजारे याबरोबर शेतकऱ्यांचे, कष्ट करणाऱ्या कष्टकऱ्यांचे, उपेक्षित वर्गाचे कवितांमधून केलेले सार्थ वर्णन अगदी वाखण्याजोगे आहे. आकाशचा हा पहिला कवितासंग्रह खरोखर आकाशाला गवसणी घालत आहे.

'बाप माझा शेतकरी' या कवितेत आकाश म्हणतो की,



**माझा बाप शेतकरी**
**कष्ट करितो मातीत**
**पंचपक्वान्न नसे पोटी**
**मिरची भाकर हातात**

शेतकरी बाप हा शेतीमाती बरोबर कुटुंब व्यवस्था कशी सांभाळतो त्याचे वर्णन दिसून येते. 'माझ्या बापाची शाळा' या कवितेत

समीक्षण

**पीक पाहुनी रानात जमला**
**पाखरांचा गोतावळा**
**माझ्या बापाची रोज उन्हात**
**भरते शाळा**

शेतीत राबणाऱ्या बापाला शेतीत राबणे त्याला शेती हीच पंढरी वाटत असते आणि तो आपल्या जीवनाचा मळा हा फुलवत राहतो ते या कवितेतून दिसून येते. नात्यावर लिहिताना 'जपा कर्तव्याची नाती' या कवितेत

**आजी आणि आजोबा**
**म्हणजे**
**हिऱ्या मोत्याची खाण**
**त्यांचा असता सहवास**
**शोभून दिसते घरदार**

ग्रामीण भागातील एकत्र कुटुंब पद्धती कशी असते त्याच्यात आजी आजोबा ते नातवंडे पत्वांडापर्यंतचा हा गोतावळा घराला कसा शोभून दिसतो. ते 'घरपण' कवितेतून जाणवते. 'आई-वडिलांची इच्छा' या कवितेत

**संसाररूपी निरंजनीत**
**माय वात होऊन जळते**
**स्वतः सोसूनिया दुःख**
**सुख इतरांना देते**

माती आणि माता या शेतकऱ्याच्या संसाररूपी जीवनात कशा पद्धतीने झिजतात दिसून येते. खरे 'कल्पतरू' कवितेत

**बाबा माझे जमदग्नी ऋषी**
**पण आईसारखे होते**
**शेतात राबायचे बैलासारखे**
**पण गाईवाणी होते**

शेतात राबणारा बाप हा आपला प्रपंच साकारताना स्वतःला अंगभर कपडे न घेता उपासमारी सहन करून शेतात राबतो आणि मुलांबाळांचे जीवन फुलवतो तो खऱ्या अर्थाने कल्पतरूच असतो. 'बळीराजा' या कवितेतून शेतकरी हा निराशामय न होता तो कसे उभारी घेतो या कवितेत कवी म्हणतो

**झाली थोडी गारपीट**
**म्हणून काय झालं**
**हातामधलं नेलयं**
**नशिबातलं थोडेच गेलं**

गरिबीची व्यथा मांडताना 'गरिबी खेळते झोका'कवितेत मतलबी दुनिया कशी आहे तो ते मांडतो. भाळावरचा घाम त्याच्या नशिबी देतोय धोका आयुष्याच्या फांदीला गरिबी खेळते झोका तर दिवाळी सारखा सण साजरा करताना शेतकऱ्याला सुगीचे दिवस चांगले यावेत व त्यातून घरभर आनंद पसरावा अशी माफक आशा असणाऱ्या 'दिवाळी' कवितेत कवी म्हणतो..

दुष्काळ सरून पाऊस थोडा पडावा वेळोवेळी शेतकऱ्याच्या दारात यंदा साजरी व्हावी दिवाळी अशा अनेक कविता मधून कवी आकाश हा शेतीमाती, शेतकरी, कुटुंब यांचा संवाद मांडतो. झाले बाटुकाचे जिणे या कविता संग्रहाचे नाव उभा जोंधळा जोंधळा या कवितेतील पुढील ओळीतून आले आहे. बाटुक म्हणजे शेतीत पेरलेली ज्वारी पावसाअभावी करपून जाते. ज्वारीला गोंडा न येताच अपुरी वाढ असलेले पीक त्याला ग्रामीण भाषेत बाटुक अस म्हटल जात. अशा शेतीची व्यथा आणि कथा मांडली आहे. ती ओळ अशी

**बाप कष्टकरी माझा, त्याचं**
**उंच उंच मन**
**सारा अन्याय सोसून, झालं**
**बाटुकाचं जिणं**

कवितासंग्रहातून प्रत्येक कविता ही शेतीमातीची आणि राबणाऱ्या हातांची गोडवी गाणारी गीतमालाच आहे. प्रसिद्ध प्रकाशन परिस पब्लिकेशन यांनी हा कवितासंग्रह प्रकाशित केला असून पाठ्यपुस्तकातील कवी व गीतकार हनुमंत चांदगुडे यांनी समर्पक प्रस्तावना लिहिली आहे. प्रा. पुंडलिक कदम यांनी आकाशचा कविता जीवनाचा प्रवास मांडला आहे. अध्यक्ष मराठी अभ्यास मंडळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रा.डॉ. संदीप सांगळे यांनी या कवितासंग्रहाची पाठ राखण केली आहे. आकाशच्या साहित्य प्रवासाला मनपूर्वक शुभेच्छा...

**विठ्ठल वळसे पाटील**
**पुणे -४८४०६६०४२**

# 'आरटीई' प्रवेशाचा मुद्दा

राज्यातील शिक्षण व्यवस्थेबाबत अलीकडे घेतले जाणारे निर्णय आणि त्यांचे परिणाम यावर व्यापक चर्चा होणे आवश्यक आहे. 'शिक्षण हक्क कायदा २००९' म्हणजेच 'राईट ऑफ चिल्ड्रन टू फ्री अँड कम्पलसरी एज्युकेशन ॲक्ट' (आरटीई) हा कायदा समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकातील मुलांना दर्जेदार शिक्षणाची समान संधी मिळावी, या उदात्त हेतूने अस्तित्वात आला. या कायद्यानुसार, खासगी शाळांमध्ये २५ टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद आहे. मात्र, या प्रवेश प्रक्रियेत राज्य शासनाने निवासस्थानापासून एक किलोमीटर अंतराची सक्तीची अट घातल्याने मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याची टीका आता जोर धरू लागली आहे.

या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नेते व आमदार एकनाथ खडसे यांनी हा मुद्दा उचलत शिक्षणमंत्री दादा भुसे यांना पत्राद्वारे ही अट तातडीने रद्द करण्याची मागणी केली आहे. खडसेंची ही भूमिका केवळ राजकीय प्रतिक्रिया नसून, प्रत्यक्ष परिस्थितीचा अभ्यास करून मांडलेली वस्तुस्थिती आहे, हे त्यांच्या पत्रातील उदाहरणांवरून स्पष्ट होते. उदाहरणार्थ, मुक्ताईनगर शहराचा भौगोलिक विस्तार पाहिला, तर अनेक नामांकित शाळा शहराच्या एका टोकाला किंवा मुख्य




वस्तीपासून दूर आहेत. शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतचे अंतर साधारणत: ५ ते ६ किलोमीटर आहे. अशावेळी १ किलोमीटरची कठोर मर्यादा लावल्यामुळे शहराच्या मध्यवर्ती भागात राहणाऱ्या पालकांना आरटीई पोर्टलवर गुणवत्तापूर्ण शाळांचा पर्याय निवडणेच शक्य होत नाही. परिणामी, पात्र विद्यार्थी असूनही केवळ अंतराच्या निकषामुळे त्यांना प्रवेशापासून वंचित राहावे लागते.

खरे तर 'आरटीई' कायद्याचा हेतू 'समान संधी' हा आहे, 'समान अंतर' नव्हे. ग्रामीण आणि निमशहरी भागातील वस्त्यांची रचना, शहरांचा असमतोल विस्तार, सार्वजनिक वाहतुकीची मर्यादित साधने या सर्व बाबींचा विचार न करता एक कि.मी. अट लागू करणे तांत्रिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या दोन्ही स्तरांवर चुकीची ठरते. विशेषतः, लहान शहरांमध्ये नामांकित शाळा विशिष्ट भागात केंद्रित असतात. त्यामुळे १ कि.मी.ची अट ही वास्तवापासून दूर असलेली धोरणात्मक कठोरता ठरते.

पूर्वीप्रमाणे ० ते १ कि.मी., १ ते ३ कि.मी. आणि ३ ते ८ कि.मी. अशी टप्प्याटप्प्याने लवचिक मर्यादा ठेवली असता, स्थानिक परिस्थितीनुसार विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध होत होती. या पद्धतीत पारदर्शकता आणि न्याय या दोन्ही गोष्टी साधल्या जात होत्या. आता मात्र एकच कठोर मर्यादा लागू करून शासनाने स्वतःच प्रवेशाचे दार अरुंद केले आहे. खासगी शाळांचे भरमसाट शुल्क परवडत नसल्यामुळे गरीब पालकांसाठी 'आरटीई' हाच एक आशेचे किरण असतो. अशावेळी तांत्रिक अटींमुळे हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात जाणे हे सामाजिक न्यायाच्या संकल्पनेलाच धक्का देणारे आहे. शासनाने धोरण आखताना केवळ प्रशासनिक सोयीपेक्षा सामाजिक परिणामांचा विचार करणे अधिक आवश्यक आहे. एकनाथ खडसे यांनी केवळ मुक्ताईनगरच नव्हे, तर राज्यातील हजारो कुटुंबांचा प्रश्न पुढे आणला आहे. हा मुद्दा कोणत्याही पक्षीय चौकटीपलीकडे जाऊन विचार करण्यासारखा आहे. शिक्षणमंत्री आणि शासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन १ किलोमीटरची जाचक अट तातडीने रद्द करावी. पूर्वीप्रमाणे लवचिक अंतरमर्यादा लागू करून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने न्याय द्यावा. 'आरटीई'चा आत्मा जपायचा असेल, तर धोरणे वास्तवाशी सुसंगत असली पाहिजेत. खडसेंनी उचललेला हा मुद्दा योग्य, रास्त आणि सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.

# तालुक्याचा विकास कागदावरच शासकीय कार्यालयांना 'घरघर'

## शासकीय इमारतींची दुरवस्था; प्रशासन झोपेत, कर्मचाऱ्यांच्या जीवाशी खेळ

**सेलू/ अभय बेदमोहता**

तालुक्याच्या विकासाच्या गप्पा रंगवणारे सत्ताधारी आणि अधिकारी एकदा तरी या शासकीय कार्यालयांच्या भग्न भिंतींना हात लावून पाहणार आहेत का? कारण सेलूत आज ९५ टक्के शासकीय इमारती अक्षरशः मृत्यूच्या छायेत उभ्या आहेत. कर्मचाऱ्यांचे जीव धोक्यात घालून कामकाज सुरू आहे, आणि प्रशासन मात्र कागदोपत्री विकासाच्या फुशारक्या मारण्यात मश्गूल आहे.मिनी मंत्रालय म्हणून ओळखली जाणारी पंचायत समितीची इमारत पावसाळ्यात ताडपत्रीने झाकावी लागते, ही शरमेची बाब नाही का, कृषी विभाग, सिंचन विभाग यांच्या इमारती कोसळण्याच्या उंबरठ्यावर उभ्या आहेत. भिंतींना तडे, छपरांतून गळती, आणि दररोज भीतीच्या सावटाखाली काम करणारे



कर्मचारी यालाच का विकास म्हणायचे,

**२४७ लाखांचा फलक उंच पण एकही वीट नाही**

तालुका कृषी विभागाच्या नव्या इमारतीसाठी २४७ लाख रुपये मंजूर झाल्याचा गाजावाजा झाला. वर्षभरापूर्वी मोठ्या थाटात भूमिपूजन झाले. फोटोसेशन, भाषणे, आश्वासने सगळे झाले. पण आजवर एकही वीट चढवली गेली नाही! फलक मात्र उभा आहे, तारीख नाही, मुदत नाही, जबाबदार कोण याचा उल्लेख नाही. हा विकासाचा दिखावा की जनतेची थेट फसवणूक?

**रुग्णालय रखडले; गरिबांच्या जीवाशी खेळ**

गेल्या पाच वर्षांपासून शासकीय रुग्णालयाची इमारत अपूर्णावस्थेत उभी आहे. लाखो-कोटींचा खर्च दाखवला जातो; पण रुग्णांना अद्यापही दर्जेदार सुविधा नाहीत. २४ तास सेवा देण्याची घोषणा कागदावरच राहिली. अर्धवट भिंतींमध्येच गरिबांच्या उपचारांची आशा गाडली गेली आहे.

तहसील कार्यालयाचे नवे बांधकाम व रंगरंगोटी झाली, पण पिण्याच्या पाण्याची व महिलांसाठी प्रसाधनगृहाची सुविधा नाही, ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. रोज शेकडो नागरिक येथे येतात. मूलभूत सोयी नसताना केलेली सजावट केवळ दिखावा ठरतो. प्रशासनाने तातडीने आवश्यक सुविधा उपलब्ध करून नागरिकांची गैरसोय थांबवावी.

**नितीन निघडे, सेलू**

भारत कृषिप्रधान देश असताना तालुक्यातील कृषी कार्यालय जीर्ण अवस्थेत आहे, हे शेतकऱ्यांसाठी धोकादायक आहे. छत गळते, भिंतींना तडे आहेत. योजनांसाठी येणाऱ्या शेतकऱ्यांचा जीव धोक्यात घालणे योग्य नाही. प्रशासनाने तात्काळ निधी मंजूर करून नवीन सुरक्षित इमारत उभारावी, ही आमची ठाम मागणी आहे.

**काशिनाथ लोणकर, सेलू**

**कुठे झकास, कुठे भकास**

नूतन तहसीलदारांनी तहसील कार्यालयाला रंगरंगोटी करून झकास केले. पण त्याच आवारातील दुय्यम निबंधक कार्यालय मात्र जीर्णावस्थेत महसूल देणारा विभाग दुर्लक्षित हे प्रशासनाचे दुहेरी धोरण नाही का,

**पोलीस वसाहत: बळीची वाट?**

कायदा राखणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना धोकादायक वसाहतीत राहावे लागते. छत



गळते, भिंती पडझडीच्या अवस्थेत. प्रशासनाला जाग यावी म्हणून एखादा अपघात व्हावा, अशीच प्रतीक्षा आहे काय, सेलूतील ही परिस्थिती म्हणजे विकासाच्या नावाने जनतेची थट्टा आहे. लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकारी आता तरी जागे होणार का, की पुढील निवडणुकीपर्यंत आश्वासनांचीच पतंग उडवत राहणार? सेलूची जनता आता उत्तर मागत आहे.

## हरितगृह व्यवस्थापन प्रशिक्षण

**वर्धा/ जनमाध्यम**

बदलत्या हवामानानुसार शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे ही काळाजी गरज बनली आहे. याउद्देशाने संचालक फलोत्पादन कार्यालय, कृषी आयुक्तालय पुणे आणि महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसीय निवासी हरितगृह व्यवस्थापन प्रशिक्षण झाले.

सेवाग्राम येथे दि. २३ ते २७ फेब्रुवारी दरम्यान आयोजित या प्रशिक्षणाचे उद्घाटन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अरविंद उपरीकर यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचे वरिष्ठ प्रशिक्षण अधिकारी हेमंत जगताप, एमसीडीसीचे विभागीय व्यवस्थापक दीपक बेदरकर, अ‍ॅग्रीप्लॉस्टचे विभागीय अधिकारी सोमनाथ जाधव, तांत्रिक अधिकारी राजन निफाडकर आदी उपस्थित होते.

प्रशिक्षणात संरक्षित शेती तंत्रज्ञान, शेडनेट हाऊस व पॉलीहाऊस व्यवस्थापन, प्लास्टिक मल्चिंग, भाजीपाला व फुल पिकांचे उत्पादन तंत्र याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर संरक्षित शेतीची गरज अधोरेखित करत शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारावे, असे आवाहन मान्यवरांनी केले. या कार्यक्रमात वर्धा, अमरावती व नागपूर परिसरातील सुमारे ६० हून अधिक शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला.

## वर्धा येथील दोन आजी-माजी खासदारांना नवी जबाबदारी

### अमर काळे भारत–युक्रेन संसदीय गटात; रामदास तडस भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष

**वर्धा/ जनमाध्यम**

जिल्ह्यातील दोन ज्येष्ठ राजकीय नेत्यांना नव्या पातळीवर महत्त्वाच्या जबाबदाऱ्या मिळाल्याने राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत. एका नेत्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करण्याची संधी मिळाली आहे, तर दुसऱ्याला प्रदेश संघटनेत स्थान देण्यात आले आहे.

खा. अमर काळे यांची १८ व्या लोकसभा कार्यकाळासाठी स्थापन करण्यात आलेल्या भारत–युक्रेन संसदीय मैत्री गटात निवड झाली आहे. लोकसभा सचिवालयाने या गटाची स्थापना केली असून भारत आणि युक्रेन यांच्यातील संसदीय, सांस्कृतिक व द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याचे उद्दिष्ट आहे. काळे यांनी लोकसभेत मतदारसंघातील प्रश्नांसह विविध सार्वजनिक मुद्द्यांवर सक्रिय भूमिका घेतली होती. त्यांच्या निवडीमुळे वर्ध्याला आंतरराष्ट्रीय संसदीय पातळीवर प्रतिनिधित्व मिळणार आहे. पक्षाचे नेते शरद पवार यांनी त्यांच्या निवडीबद्दल समाधान व्यक्त केले आहे.



दरम्यान, माजी खा.रामदास तडस यांची भाजपच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतरही पक्षाने त्यांच्यावर विश्वास दाखवला आहे. तडस हे यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून दोन वेळा विधान परिषदेवर निवडून गेले होते. विदर्भातील संघटनात्मक काम आणि समाजातील प्रभाव लक्षात घेऊन त्यांना प्रदेश कार्यकारिणीत स्थान देण्यात आल्याचे सांगितले जाते.प्रदेश उपाध्यक्ष पद हे संघटनात्मकदृष्ट्या महत्त्वाचे मानले जाते. निवडणूक नियोजन, कार्यकर्त्यांशी समन्वय आणि प्रदेशाध्यक्षांना सहाय्य करणे अशी जबाबदारी या पदावर असते. तडस यांच्या नियुक्तीमुळे विदर्भातील भाजप संघटनेला बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.वर्ध्यातील या दोन्ही नियुक्त्यांमुळे जिल्ह्याचे राजकीय महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

### बँक ग्राहकांनो, सावध रहा

## मार्चमध्ये १८ दिवस बँका बंद वर्षअखेरच्या धावपळीत अडकू नका

**सेलू/ जनमाध्यम**

आर्थिक वर्षअखेरचा महिनाष्ठ व्यवहारांची लगबगष्ठ आणि त्यातच तब्बल १८ दिवस बँकांना सुट्ट्या मार्च २०२६ मध्ये विविध सण, शनिवार-रविवार आणि स्थानिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर बँकांचे कामकाज अनेक दिवस ठप्प राहणार आहे. भारतीय रिझर्व्ह बँक यांनी जाहीर केलेल्या अधिकृत सुट्ट्यांच्या यादीमुळे ग्राहकांनी आतापासूनच खबरदारी घेणे गरजेचे ठरणार आहे.

सणांचा महिना, सुट्ट्यांची रेलचेल होळी, ईद-उल-फितर, रामनवमी, महावीर जयंती यांसारख्या प्रमुख सणांमुळे मार्चमध्ये बँकांना सुट्ट्यांची मालिकाच आहे. त्यातच दुसरा व चौथा शनिवार आणि नियमित रविवार यांची भर पडल्याने अनेक दिवस शाखांचे शटर खाली राहणार आहे. राज्यनिहाय काही तारखांमध्ये बदल असू शकतो, मात्र एकूण चित्र पाहता ग्राहकांसाठी हा 'सुट्ट्यांचा महिना' ठरणार आहे.या तारखांना कामकाज बंद महिन्याच्या सुरुवातीला २, ३ आणि ४ मार्च रोजी काही राज्यांत बँका बंद राहतील. मध्यंतरी १३, १७, १९, २० आणि २१ मार्च रोजी सुट्ट्या असतील.तर महिन्याच्या शेवटी २६, २७ आणि ३१ मार्च रोजीही कामकाज बंद राहणार आहे.वर्षअखेरचे व्यवहार, करसंबंधित कामे, कर्ज प्रकरणे आणि चेक क्लिअरन्स या सगळ्यांवर याचा परिणाम होऊ शकतो.ऑनलाइन सेवा सुरू, पण...शाखा बंद असल्या तरी नेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, UPI आणि एटीएम सेवा सुरू राहतील. मात्र प्रत्यक्ष बँकेत जाऊन करावयाची कामे रखडण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेवटच्या क्षणी रांगेत उभे राहण्याची वेळ येऊ नये म्हणून ग्राहकांनी नियोजनपूर्वक व्यवहार पूर्ण करावेत.मार्च म्हणजे केवळ सणांचा आनंद नाही, तर आर्थिक जबाबदाऱ्यांचीही वेळ आहे. त्यामुळे आजच काम उरका, उद्यावर ढकलू नका, हा इशारा बँक ग्राहकांसाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

## क्रिडा गुण सवलतीकरीता ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन

**वर्धा** - सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून ग्रेस गुणासाठी केली जाणारी प्रक्रिया शासनाच्या आपले सरकार पोर्टलव्दारे ऑनलाईन करण्यात आली आहे. तसेच ऑनलाईन प्रणाली व्दारे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडे सादर करण्याची सुविधा निर्माण करुन देण्यात आली आहे. त्यामुळे खेळाडू विद्यार्थी व जिल्ह्यातील सर्व माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयांनी क्रिडा गुण सवलतीचा अर्ज आपले सरकार सेवा पोर्टलवर सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रिडा स्पर्धेत सहभागी झालेल्या किंवा प्राविण्य प्राप्त करणा-या विद्यार्थी खेळाडूंचे प्रस्ताव https://aaplesarkar.mahaonline.gov.in या आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. अर्ज करतांना खेळाडूचे परीक्षा बैठक क्रमांक, प्रपत्र १ व २, क्रिडा प्रमाणपत्र, १२ वीसाठी अर्ज करीत असल्यास १० वीचे गुणपत्रक असणे आवश्यक आहे. असे जिल्हा क्रिडा अधिकारी यांनी कळविले.

# सेलू येथे न्यायालयाची सुसज्ज व तहसील कार्यालयाची इमारत बनणार

## पालकमंत्री डॉ. भोयर यांच्या प्रयत्नाचे फलित दोन्ही इमारतीसाठी ६१.८८ कोटी मंजूर

**वर्धा/ जनमाध्यम**

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या प्रयत्नामुळे सेलू तालुक्यातील नागरिकांना होळीच्या शुभ पर्वावर शुभवार्ता मिळाला आहे. सेलू येथील न्यायालयाच्या नवीन इमारतीस व तहसील कार्यालयाच्या पहिल्या मजल्याच्या बांधकामाला राज्य सरकारने हिरवी झेंडी दाखविली आहे.

सेलू तालुक्याचे ठिकाणी असल्याने येथे न्यायालय असावे, जेणे करून नागरिकांना जिल्हा मुख्यालयी यावे लागू नये, यासाठी दिवाणी न्यायालय मंजूर करण्यात आले होते. मात्र न्यायालयासाठी इमारत नसल्याने न्यायालयाचे कामकाज भाडयाच्या इमारतीमधून चालत होते.सदर इमारती जीर्ण व जुनी असल्याने प्रशासकीय कामकाज करताना अनेक अडचणी येत होत्या.परिणामी नागरिकांनी सोयी सुविधा पुरवितात अडचण येत होती. सदर इमारत न्यायाधिश, कर्मचारी व अभ्यासगत यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक असल्याने नवीन इमारतीची निकड निर्माण झाली होती. सेलू तालुक्याचे मुख्यालय असून सिंदी सारखे मोठे शहर व १०० च्या आसपास गांवे तालुक्यात असल्याने न्यायालयीन कामकाजासाठी नागरिकांची दररोज येथे गर्दी असायची. तथापि, सेलू येथे न्यायालयाची स्वतंत्र इमारत असावी, यासाठी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पुढाकार घेत तसा प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले होते. बांधकाम विभागाने ४७.७२ कोटी रूपयांचा प्रस्ताव तयार करून तांत्रिक सहमती घेऊन प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे सादर केला. सदर प्रस्तावास उच्चाधिकार समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. राज्याच्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सेलू न्यायालयाच्या इमारतीचा ४७.७२ कोटीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.

**न्यायालयात या राहणार सुविधा**

दिवानी न्यायालयात न्यायाधीश यांच्यासाठी तीन न्यायालयीन कक्ष, एक व्हीडब्लूडीसी आणि एक लोकअदालत यांचा समावेश राहणार आहे. तळ मजला, स्टिल्ट, सह जीन मजले राहणार आहे. यासोबतच इतर आवश्यक त्या सुविधा देखील उपलब्ध करून् देण्यात येणार आहे.

**तहसील कार्यालयासाठी १४.१६ कोटींची तरतूद**

सेलू तहसील कार्यालयाच्या पहिल्या मजल्याच्या बांधकामास मंजूरी देण्यात आली आहे. पहिल्या मजल्याच्या बांधकावर १४ कोटी १६ लक्ष ९३ हजार रूपये खर्च होणार आहे. पालकमंत्री डॉ. भोयर यांच्या प्रयत्नामुळे सेलू तहसील कार्यालयाच्या इमारतीचा मार्ग प्रशस्त झाला होता. आता पहिल्या मजल्याचा देखील मार्ग सुकर झाला आहे. त्यामुळे नागरिकांसह कर्मचारी चांगल्या सुविधा मिळणार आहे.

**पालकमंत्री यांनी मानले मुख्यमंत्री व महसूलमंत्र्यांचे आभार**

सेलू येथील दिवाणी न्यायालयाचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित होता. न्यायालयासाठी सुसज्ज अशी इमारती व्हावी, यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला होता. तसेच सेलू च्या तहसील कार्यालयाच्या प्रथम मजल्याचे बांधकाम देखील गरजेचे होते. कारण सदर इमारती अपुरी होती. या दोन्ही मागण्या राज्य सरकारने मंजूर केल्या आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे याबाबत खुप सहकार्य लाभले. त्यांचे मनापासून आभार व्यक्त करतो.

**डॉ.पंकज भोयर – पालकमंत्री, वर्धा**

## संक्षिप्त

### घराच्या बांधकामावरून ठेकेदाराचा धारदार हल्ला

**सेलू** - घरात लग्नकार्य जवळ आल्याने बांधकाम लवकर पूर्ण करून द्यावे, अशी विनंती केल्याचा राग मनात धरून ठेकेदाराने घरमालकावर धारदार शस्त्राने हल्ला केल्याची धक्कादायक घटना तुळजापूर वघाळा येथे उघडकीस आली. समीर जनार्धन झाडे (वय ३०) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. शंकर निमजे असे आरोपी ठेकेदाराचे नाव असल्याचे पोलिसांनी सांगितले. किरकोळ वादातून थेट हल्ल्यापर्यंत प्रकरण गेले. जखमीच्या तक्रारीवरून सेलू पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### दारू पिण्यावरून वृद्ध महिलेवर मारहाण

**हिंगणघाट** - मद्यपानाबाबत जाब विचारल्याचा राग मनात धरून मद्यधुंद व्यक्तीने वृद्ध महिलेच्या घरी जाऊन शिवीगाळ व मारहाण केल्याची घटना वाघोली येथे घडली. शांता महादेव सोनटक्के या जखमी झाल्या असून त्यांच्या तक्रारीवरून शेखर नामदेव चाफले याच्याविरुद्ध हिंगणघाट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. किरकोळ बोलण्यावरून संताप अनावर झाल्याने हा प्रकार घडल्याचे समजते. पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला असून पुढील तपास सुरू आहे.

### आईची नरडी पिचकली' म्हणत दोघांकडून मारहाण

**हिंगणघाट** - कौटुंबिक वादातून 'तू माझ्या आईची नरडी पिचकली' असा आरोप करीत दोघांनी एकास मारहाण केल्याची घटना वाघोली येथे घडली. शेखर नामदेव चाफले हे जखमी झाले असून त्यांच्या तक्रारीवरून वैभव सोनटक्के व शंकर महादेव सोनटक्के यांच्याविरुद्ध हिंगणघाट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शाब्दिक वादाचे रूपांतर हाणामारीत झाल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

### दुचाकी रस्त्यावर ठेवल्याने वाद

**वर्धा** - रस्त्यावर दुचाकी उभी केल्याच्या कारणावरून दोन गटांत वाद होऊन मारहाण झाल्याची घटना हमदापूर येथे घडली. राजेंद्र लक्ष्मण श्रावणकर यांच्या तक्रारीवरून शुभम राजू ढोणे याच्याविरुद्ध दहेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच ढोणे यांच्या तक्रारीवरून राजू व चेतन श्रावणकर यांच्याविरुद्धही गुन्हा नोंदविण्यात आला आहे. किरकोळ कारणावरून वाद वाढल्याने दोन्ही बाजूंनी तक्रारी दाखल झाल्या आहेत. पोलिस तपास करीत आहेत.

### कीटकनाशक प्राशन करून व्यक्तीची आत्महत्या

**आष्टी** - माणिकवाडा येथील ४८ वर्षीय व्यक्तीने कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. श्रीराम जागोजी वाघाडे असे मृताचे नाव आहे. प्रकृती गंभीर झाल्यानंतर त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी आष्टी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली असून आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. पुढील तपास सुरू आहे.

### महिलेची कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या

**वर्धा** - जैतापूर येथील ४५ वर्षीय महिलेने कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना समोर आली. सरीता रामलाल डीकु असे मृत महिलेचे नाव आहे. मनस्तापातून हा टोकाचा निर्णय घेतल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी पंचनामा करून आकस्मिक मृत्यूची नोंद केली. पुढील तपास सुरू आहे.

### तरुणाने गळफास घेऊन संपविले जीवन

**हिंगणघाट** - शहरातील संत गाडगेबाबा वॉर्ड परिसरात ३२ वर्षीय तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. मंगेश वामन उमाटे असे मृत तरुणाचे नाव आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून हिंगणघाट पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेत तपास सुरू केला आहे.

### तूर शेतकरी नोंदणी करीता २४ मार्च पर्यंत मुदतवाढ

**वर्धा** - हंगाम २०२५-२६ मध्ये तुरीचा बाजार भाव शेतक-यांचे हित विचारात घेऊन नाफेड द्वारे तूर शेतकरी नोंदणीकरीता २४ मार्च पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, शेतक-यांनी नाफेड मार्फत तूर विक्री करण्यासाठी विहित मुदतीत तूर नोंदणी करुन घ्यावी, असे जिल्हा पणन अधिकारी यांनी कळविले आहे.

### सुरासह दहशत माजवणाऱ्यास अटक

**वर्धा** - सार्वजनिक ठिकाणी शस्त्र घेऊन दहशत पसरविणाऱ्या राजू तुमडाम (४०, रा. भूगाव) याला पोलिसांनी अटक केली. त्याच्या ताब्यातून धारदार सुरा जप्त करण्यात आला. नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार पोलिसांनी तातडीने कारवाई केली. संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. अशा प्रकारच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांकडून विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ९४**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# शेतकऱ्यांच्या रक्ताने लिहिले पत्र; 'आता तरी कर्जमाफी द्या!'

## -मोझरी येथे प्रहारचे अनोखे आंदोलन

**अमरावती/प्रतिनिधीः-** निवडणुकीपुरती आश्वासने देऊन सत्तेत बसल्यानंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे पाठ फिरवणाऱ्या सरकारला जाग आणण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाने आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. तिवसा तालुक्यातील मोझरी येथे शेतकऱ्यांच्या मुलांनी स्वतःचे रक्ताने मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले आहे. 'रक्ताने लिहिले... आता तरी कर्जमाफी द्या!' अशी आर्त हाक या आंदोलनातून देण्यात आली असून, या अनोख्या आंदोलनाने संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधून घेतले आहे.

मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे हाता तोंडाशी आलेले पीक शेतातच सडून गेले. जे काही थोडेफार हाती आले, त्याला कवडीमोल भाव मिळाला. या कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीची अपेक्षा होती.





मात्र, पीक विमा मिळाला नाही आणि नुकसान भरपाईदेखील 'भीक' दिल्यासारखी अत्यल्प मिळाली. ओला दुष्काळ आणि नापिकीमुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला, तरीही सरकारकडून ठोस मदत न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

राज्यातील विरोधी पक्षांच्या शांत भूमिकेच्या पार्श्वभूमीवर, प्रहारचे संस्थापक अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी रायगड ते नागपूर असा दौरा करून सरकारला कर्जमाफीबाबत सकारात्मक बोलायला भाग पाडले. मात्र, आता जाहीर होणाऱ्या कर्जमाफीत पुन्हा जाचक अटी लावल्या जाण्याची भीती शेतकऱ्यांना वाटत आहे. याच पार्श्वभूमीवर मार्चच्या पहिल्या आठवड्यात 'आठवण कर्जमाफीची' ही पदयात्रा काढली जाणार आहे.

**पन्नासहून अधिक जणांचे रक्तदान-**

या पदयात्रेच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून तिवसा प्रहारच्या वतीने मोझरी येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. विशेष म्हणजे, ५५ शेतकऱ्यांच्या मुलांनी आणि भारतीय सीमेवर तैनात असलेले जवान श्रीकांत प्रधान यांनी स्वतःचे रक्तदान केले. याच रक्ताची शाई करून मुख्यमंत्र्यांना आठवण करून देणारे स्वाक्षरी पत्र पाठविण्यात येणार आहे. यावेळी संजय देशमुख, योगेश लोखंडे, सुरेंद्र भिवगडे, कपिल उमप, निलेश राऊत, प्रशांत राऊत, अंकुश राऊत, योगेश भुसारी, विशाल ठाकूर अजय चौधरी, समिर लांडगे, बंडूभाऊ मोने, सुधीर चौधरी, दिनेश ठाकरे, निखिल काकडे, वैभव निंभोरकर, मुरली मदणकर, सुनील वानखडे, मनोज गाढे, दिगंबर कांडलकर, अशोकराव लांजेवार, गौरव मते, अमोल पांडे, बालाजी जवंजाळ,श्रीकांत प्रधान, अमर मुंगले, साहिल शेख, भुषण महल्ले, मनिष कान्हे, ऋतिक राऊत, रुपेश होले,ज्ञानेश्वर राजूरकर, इर्शाद बेग,मिलिंद काळमेघ, पुंडलिक खारोडे,प्रदीप संभारे, आदेश साबळे गौरी देशमुख, मनीषा राऊत, मोहिनी लांडगे, सुवर्णा राऊत इत्यादी उपस्थित होते.

आता शेतकऱ्यांच्या रक्ताने लिहिलेल्या या पत्राची दखल सरकार घेणार की पुन्हा आश्वासनांचाच पाऊस पाडणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# गुरुकुल विद्या मंदिर येथे मराठी राजभाषा दिन

## आम्ही सेवेकरी बहुउद्देशीय संस्थेचे आयोजन



**अमरावती/प्रतिनिधीः-** आम्ही सेवेकरी बहुउद्देशीय संस्थेने गुरुकुल विद्या मंदिर येथे (दि.२७) मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा केला. सोबतच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला मानवंदना देऊन जयंतीनिमित्त झालेल्या चित्रकला स्पर्धेचे प्रमाणपत्र वितरण व प्रोत्साहन पर बक्षीसांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या प्रा. पूजा उमेश डहाके यांनी उपस्थितांना संस्थेचे कार्य व चित्रकला स्पर्धेचे महत्त्व समजावून सांगितले. या सोबतच गुरुकुल परिवाराचे पदाधिकारी यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले. संस्थेचे सचिव शुभम हिवराळे यांनी प्रास्ताविक केले आणि संस्थेच्या कार्याचा उलगडा केला. आम्ही सेवेकरी बहुउद्देशीय संस्था जी दरवर्षी चित्रकला स्पर्धा राबवते त्याबद्दल गुरुकुल ने आभार व्यक्त केले.

याप्रसंगी कार्यक्रमाचे संचालन संस्थेची सेवेकरी भाग्यश्री सोनवणे यांनी केले तसेच सोशल मीडियाची जबाबदारी लुकेश यांनी पार पाडली.

# कुख्यात गुन्हेगार अमन चंडालेवर एमपीडीए

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गुन्हेगारी विश्वात ओळखला जाणारा अमन कैलास चंडाले (वय ३४, रा. मनपा शाळा क्र. २, मसानगंज) एमपीडीए कायद्याअंतर्गत कठोर कारवाईत अडकला. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशानुसार २८ फेब्रुवारी २०२६ रोजी त्याला स्थानबद्ध करून मध्यवर्ती कारागृह, अमरावती येथे दाखल करण्यात आले.

अमन चंडाले २०१८ पासून गंभीर गुन्ह्यांमध्ये सक्रिय आहे. त्याच्याविरुद्ध नागपुरी गेट आणि गाडगेनगर पोलीस ठाण्यांमध्ये खुनाचा प्रयत्न, महिलांचा पाठलाग व विनयभंग, घरात अतिक्रमण,




दुखापत, शांतता भंग, फौजदारी धाकदपट, अश्लील कृत्ये, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे व विक्री, तसेच हद्दपार आदेशांचे उल्लंघन अशा एकूण ९ गुन्ह्यांची नोंद आहे. यापूर्वी त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई झाली असून, दोन वेळा तडीपार करण्यात आले तरी तो गुन्हेगारी कार्यात सक्रीय राहिला. नागपुरी गेट पोलीस ठाण्याचे अधिकारी व एमपीडीए सेलने सर्व आवश्यक कागदपत्रे तपासून प्रस्ताव वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवला. प्रभारी उपायुक्त (गुन्हे) सीमा दाताळकर आणि पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रस्ताव सादर झाला. सर्व तपासणीनंतर पोलीस आयुक्तांनी एमपीडीए कायद्याअंतर्गत त्याला स्थानबद्ध करण्याचा आदेश दिला. आगामी सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील गुन्हेगारांची माहिती संकलित करून कठोर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

**सणाउत्सवाच्या काळात कठोर कारवाई**

# आदिवासी मुलींच्या वसतिगृहातील अन्यायाविरोधात विद्यार्थिनींचा आक्रोश

## -अधीक्षिका व चौकीदारांच्या अभद्र वागणुकीसह अपुऱ्या जेवणाविरोधात एसडीओ कार्यालयावर ठिय्या

**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा येथील आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृह क्रमांक १ मधील विद्यार्थिनींनी वसतिगृहातील गंभीर समस्यांबाबत आज थेट उपविभागीय अधिकारी (एसडीओ) अचलपूर यांच्या कार्यालयावर धडक दिली. अधीक्षिका व चौकीदारांच्या अभद्र वागणुकीसह अपुरे व निकृष्ट जेवण, पिण्याच्या पाण्याचा अभाव, स्वच्छतेची दयनीय अवस्था आदी प्रश्नांवर ठोस कारवाईची मागणी करत विद्यार्थिनींनी लेखी आश्वासन मिळेपर्यंत कार्यालयात ठिय्या आंदोलन केले.

सकाळी सुमारे ९ वाजता मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या विद्यार्थिनींनी एसडीओ यांची भेट घेऊन आपली कैफियत मांडली. परतवाडा येथील आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह क्रमांक १ हे प्रकल्प अधिकारी धारणी यांच्या अधिपत्याखाली असून, गेल्या काही दिवसांपासून येथे विद्यार्थिनींना प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

विद्यार्थिनींच्या म्हणण्यानुसार, वसतिगृहात नियमित व पौष्टिक जेवण दिले जात नाही. फळे मिळत नाहीत, जेवण अपुरे दिले जाते. शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय नाही. टॉयलेट व बाथरूमची स्वच्छता वेळेवर केली जात नाही. याहून गंभीर बाब म्हणजे, अधीक्षिका



विद्यार्थिनींकडून झाडू-पोछा यांसारखी घरकामे करून घेतात आणि त्यांच्याशी अपमानास्पद वागणूक करतात. तसेच वसतिगृहातील चौकीदार नेहमी मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत असल्याच्या तक्रारीही विद्यार्थिनींनी मांडल्या. या प्रकाराची दखल घेत एसडीओ यांनी तात्काळ तीन सदस्यीय समिती स्थापन करून प्रश्नांवर तोडगा काढण्याच्या सूचना दिल्या. या समितीत प्रकल्प अधिकारी धारणी यांचे प्रतिनिधी, मुलांच्या शासकीय वसतिगृहाचे अधीक्षक तसेच एसडीओ कार्यालयातील प्रतिनिधी यांचा समावेश आहे.

समितीने उपस्थित विद्यार्थिनींकडून समस्या ऐकून घेतल्या असून, याबाबतचा सविस्तर अहवाल वरिष्ठांकडे सादर केला जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

दरम्यान, या प्रकरणात चौकशीअंती दोषी आढळणाऱ्यांवर योग्य ती कारवाई केली जाईल, अशी माहिती कनिष्ठ शिक्षण विकास अधिकारी, प्रकल्प कार्यालय धारणी येथील कांचन रोगरे यांनी दिली आहे.

**पाहिजेत**

अमरावती व वरुड येथे पार्ट टाईम ऑफीस कामा करीता मोटरसायकल असलेले युवक पाहिजे.
पगार १० हजार + TA, DA + कमीशन
**संपर्क :** ९४२२१९६३१९

# खारतळेगाव येथे माजी विद्यार्थी स्नेहसंमेलन उत्साहात

## -श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाला दिली भेट

**खारतळेगाव/प्रतिनिधीः-** स्थानिक खारतळेगाव येथे श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय येथे शिक्षण घेत असणारे २००९ ते २०१२ चे विद्यार्थी यांनी स्नेहसंमेलन आयोजित केले होते. यामध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थी सहभागी झाले. कार्यक्रमांमध्ये मोठी रंगत आली. या कार्यक्रमाला सेवानिवृत्त शिक्षक व शिक्षिका आणि कार्यरत शिक्षक यांनी प्रामुख्याने उपस्थिती दर्शवली. विद्यार्थ्यांनी वृक्ष व ट्री गार्ड शाळेला भेट दिली .



या कार्यक्रमांमध्ये प्रामुख्याने शिक्षकांची उपस्थिती लाभली. त्यामध्ये शिक्षकांना वृक्ष देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी जुन्या आठवणीचा उजाळा झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल जवंजाळ यांनी केले व आभार जयश्री बैस यांनी मानले. कार्यक्रमांमध्ये सेवानिवृत्त शिक्षक व कार्यरत शिक्षक वटाणे सर, धर्माळे सर, करडे सर, निर्मळ सर, वडतकर सर, गोहाड सर, पाटील सर, मोरे सर, भटकर सर, पारडे सर, हरणे सर, वैद्य सर व शिक्षिका मेटकर मॅडम, पंचभाई मॅडम, ढगे मॅडम, बोबडे मॅडम, सतीश काका, भोरे काका, भैसने काकू प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वांनी मार्गदर्शन सुद्धा केले. विद्यार्थ्यांनी सुद्धा मोठा सहभाग दर्शविला. यामध्ये करिष्मा कड,जयश्री बैस, शितल सखे, मेघा मांदुरकर, नयना वानखडे, गुडदे, पूजा मानकर, पल्लवी अंभोरे, नीलिमा जुवार, शुभांगी नाईक, रीना इंगळे, दिपाली जुमळे, पूजा गावनेर, राणी कराळे व आशिष भटकर, अंकुश शिरसागर, देवानंद जुमळे, गणेश भांडे, अविनाश भांडे, संदीप मानकर, सुरेश वानखडे, रोशन वानखडे, संदीप भैसने, सागर पवार, संतोष गाडे, पवन बोंडे, रिकेश भास्कर, सोपान लाड, सुरज झुरे, गजानन इंगोले, रोशन नाईक आदी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुऱ्हा येथे शिक्षण परिषद

**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा कुऱ्हा येथे दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ ला शिक्षण परिषद आयोजित करण्यात आली होती. सदर शिक्षण परिषदेच्या अध्यक्षस्थानी कुऱ्हा शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेशराव सपाटे , प्रमुख अतिथी रवींद्र तायडे सर, केंद्रप्रमुख कुऱ्हा यांची उपस्थिती होती. सदर शिक्षण परिषदेची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून दिपप्रज्वलनाने करण्यात आले. जि प शाळा कुऱ्हा येथील विद्यार्थ्यांनी सुंदर शालेय परिपाठ सादर केला. केंद्रप्रमुख रवींद्र तायडे सर यांनी शिष्यवृत्ती परीक्षा सराव वर्ग , मासिक नियोजन ,विनोबा अँप वापर , मिशन पटसंख्या वाढ याबाबत मार्गदर्शन केले. काशीराव लांजेवार सर स.शि. जि प प्राथ.शाळा कुऱ्हा हे नियत वयोमानानुसार दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ ला सेवानिवृत्त होत असल्याने त्यांचा केंद्रप्रमुख आणि केंद्रातील सर्व शिक्षकांच्या तर्फे सत्कार घेण्यात आला. सूत्रसंचालन सुनील सुने सर तर आभार प्रदर्शन नंदकिशोर कळसकार सर यांनी केले.

**TRIVENI PRE PRIMARY SCHOOL**

Near SSD Bungalow, Arjun Nagar, Amravati
**– WANTED –**
**PRINCIPAL & TEACHERS**
**(Play House to KG2)**
-Only Female Candidates Required
Qualification: D.Ed / B.Ed / Graduate
- Experienced candidates will be preferred
- Good communication skills in English required
**-Interview:** Saturday, 28-02-2026
**-Time:** 10:00 AM to 2:00 PM
**- Contact:** 9764178800 / 9765986512

STATEMENT ABOUT OWNERSHIP AND OTHER PARTICULARS OF **JANMADHYAM, AMRAVATI** AS REQUIRED UNDER RULE 8 OF THE REGISTRATION OF NEWSPAPERS (CENTRAL) RULES, 1956
**FORM IV**
**(SEE RULE 8)**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | : | Janmadhyam Office, Ambapeth, Rajkamal Chowk, Amravati-444601 |
| 2. Periodicity of its publication | : | Morning Daily |
| 3. Printer's Name | : | Pradeep P.Deshpande |
| Whether citizen of India | : | Yes |
| Address | : | Janmadhyam Office, Ambapeth, Rajkamal Chowk, Amravati-444601 |
| 4. Publisher's Name | : | Pradeep P.Deshpande |
| Whether citizen of India | | Yes |
| Address | | Janmadhyam Office, Ambapeth, Rajkamal Chowk, Amravati-444601 |
| 5. Editor's Name | : | Pradeep P.Deshpande |
| Whether citizen of India | | Yes |
| Address | | Janmadhyam Office, Ambapeth, Rajkamal Chowk, Amravati-444601 |
| 6. Name & Address of individuals who own the newspaper | : | Janmadhyam News & Publication Private Limited, Amravati-444601 |
| AND Shareholders holding more than one per cent of the total capital | : | 1) Pradeep P.Deshpande 2) Abhiram P.Deshpande 3) Radha V. Naigaonkar |

I, Pradeep P. Deshpande, hereby declare that the particulars given above are true and to the best of my knowledge and belief.

Date : 01.03.2026

Sd/-
Pradeep P.Deshpande
Publisher

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १७३
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

***No.2***
**CIVIL JUDGE SENIOR DIVISION**
IN THE COURT OF **Smt. S.V. Chandak**
16th Jt.Civil Judge, Sr. Dn. Amravati, AMRAVATI

**SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES**
**(0.5, R.1, 5)**

Spl.C.S../891/2024
**Smt. Anjali Pramod Gharode -Vs- Sanjay Shankarrao Dalal**
**NEXT DATE -13.03.2026**

**To,**
1) Smt. Jayashree Deepak Charade, R/o.Shanti Sadan Colony, Amravati
2) Suraj Ramdas Ghore, R/o.Kholapuri Gate, Hanuman Nagar, Amt.
3) Amar Murlidhar Dhore, Kharkadipura, Amravati
4) Yuvraj Suresh Aagle, R/o. Hariom Vatika Sitabardi, Nagpur
5) Sangita Ganeshrao Raut, R/o. Hanuman Nagar, Amravati

6) Pravin Mahadeorao Mohoture,R/o.Jalka Shahapur,Tq. & Dist. Amt.
7) Rajesh Uttamrao Kasar, R/o. Gandhi Nagar, Amravati
8) Nitin Prabhakarrao Kandalkar, R/o.Anand Nagar, Nashik (M.S.)
9) Nagorao Pandurang Shende, R/o. Akola Jahangir, Dist. Akola
10) Mamta Diliprao Solanke, R/o.Hanuman Nagar, Amravati
11) Niyzuddin Pathan Nijamuddin Pathan, R/o.Nagpuri Gate, Amt.
12) Sonali Gajanan Nimke, R/o.Bhim Nagar, Ghatkopar, W. Mumbai

Whereas **Smt.Anjali Pramod Gharode** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the **13.03.2026** at **11.00 o'clock in the forenoon**, to answer the claim, and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base y our defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this **26.02.2026.**

**16th Jt.Civil Judge Sr.Dn.**

**Notice :** 1) Should you apprehend your witnesses will not attend of their own accord, y ou can have a summons from this Court to compel the attendance of any witness, and the production of any document that you have a right to call on the witness to produce, on applying to the Court and on depositing the necessary exenses. (2) If you admit the claim, you should pay the money into Court together with the costs of the suit, to avoid execution of the decree, which may be against your person or property, or both.

**Visit ecourts.govi.in for updates or download mobile app "ecourts Services" from Android or IOS.**

शिक्का

सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२३९/२०२६
**स्वरुपा श्रीराव + 1 -वि- निरंक**
पुढील ता.१३.०३.२०२६

**अर्जदार :** 1. **Sau. Swarupa Prabhant Shirrao**
Aged about 38 Yrs. Occu.: Household
R/o Ward No.1, Gandhi Chowk,
Mu. Post- Jarud, Jarud Warud, Dist. Amravati
2. **Vaibhav Sudhakar Saksule,**
Aged about 37 Yrs. Occu.: Private Job
R/o Jabreshwar Chowk, Walgaon, Walgaon,
Tq. Dist. Amravati- 444 801

-- **विरुध्द** --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **Sudhakar Puransa Saksule** हे दिनांक 30.06.2003 रोजी **वलगाव, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. तसेच **Chhaya Sudhakar Saksule** हया दिनांक **20.11.2003** रोजी **वलगाव, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **Sau. Swarupa Prashant Shrirao + 1** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Sau. Swarupa Prashant Shrirao + 1** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

**नगर परिषद कार्यालय, अचलपूर**

**जाहीरनामा**

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव गुंजल विनोद वानखडे, पत्ता मेहराबपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.३० संगणक मालमत्ता क्र.ACHA000/26601 जुना मालमत्ता क्र.३००००६१४ नझुल शिट क्र....प्लॉट नं.....ही कर आकारणी नोंदवहीनुसार नझुल जागा भोगवटदार **लक्ष्मण गुलाबराव वानखडे** या नावाने असून वरील अर्जदार यांनी **गुंजन विनोद वानखडे** या नावाने फेरफार घेण्याकरीता या कार्यालयामध्ये दिनांक २७.०२.२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -

**पुर्वेस** - रस्ता
**पश्चिमेस** - प्रकाश वानखडे यांचे घर
**दक्षिणेस** - प्रदीप वानखडे यांचे घर
**उत्तरेस** - राजेश वानखडे यांचे घर

शिक्का

**मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, अचलपूर**

---

**मा. सह दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, यांचे न्यायालयामधील**

**किरकोळ (R.M.J.C.) क्र.५६/२०२६** **ने.ता.२५.०३.२०२६**

**चंद्रशेखर + ३ वि. निरंक**

१. चंद्रशेखर बापुराव बावणे, रा.वार्ड नं.३ नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. यशोधन बापुराव बावणे, रा.वार्ड नं.३ नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. शैलाजा वासुदेव रघुवंशी,
रा.प्लॅट नं.४०१, गोकुल गोवर्धन श्याम जयहिंद हाऊसिंग सोसायटी, नागपूर
४. शिला संजय कुकडे व्दारा संजय कुकडे तरोडा, पो.स्टे.बेलोरा, ता.तरोडा, जि.यवतमाळ

**// वि.//**
**निरंक**

ज्याअर्थी मयत **ताराबाई बापुराव बावणे** यांचा मृत्यू **दि.२८.०७.२०२५** रोजी ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयताचे पती नामे **बापुराव गणाजी बावणे** यांचा मृत्यू दि.१२/०६/२०१२ रोजी ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ व अर्जदार नं.२ मयताचे मुले आहेत. अर्जदार नं.३ व ४ ही मयतांच्या विवाहित मुली आहेत.मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत.करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**प्र. सहायक अधीक्षक**
मा.दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**जाहीर नोटीस**

प्रो.नं.६३८/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.२७.०२.२०२६

**वि.सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क्र.१०२/२०२६ दिनांक २०.०४.२०२६

**अर्जदार -** १. **माला दिलीपराव चौरपगार,** वय ५० वर्षे, धंदा - घरकाम
रा.गोराळा, ता.मोर्शी, जि.अमरावती

--- **विरुध्द** ---

**गैरअर्जदार- निरंक**

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **पुंडलिक आकाती सोनोने** हे दिनांक **१२.०१.२०२६** रोजी मरण पावलेले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदार मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** ः- **पुंडलिक आकाती सोनोने** यांचे नांवे मौजा सासन रामापुर,ता.दर्यापूर, जि.अमरावती येथे ग्राम पंचायत अंतर्गत अ.क्र.४५४,मालमत्ता क्र.४४३, क्षेत्रफळ २६३ चौ.फूट (२४ चौ.मी.) यावर बांधलेले घर येणेप्रमाणे मिळकत आहे. सदर मिळकतीची बाजार भाव किंमत १०,००० रु. आहे.

आज दि.२३.०२.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

## परतवाडा-धारणी मार्गावर काळाचा घाला

# अज्ञात वाहनाच्या धडकेत पिता-पुत्राचा दुर्दैवी मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** परतवाडा ते धारणी मार्गावरील गारवा रेस्टॉरंट परिसरात शनिवारी (दि.२८) दुपारी एक भीषण अपघात घडला. एका अज्ञात वाहनाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने पिता-पुत्राचा जागीच मृत्यू झाला. शोभेलाल तोटे आणि बबलू शोभेलाल तोटे (रा. डोमागाव) अशी या अपघातात प्राण गमावलेल्या दुर्दैवी पिता-पुत्रांची नावे आहेत. सणासुदीच्या काळात घडलेल्या या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण डोमा गावावर शोककळा पसरली आहे.





मिळालेल्या माहितीनुसार, डोमा गावचे रहिवासी असलेले शोभेलाल तोटे हे शनिवारी दुपारी आपला मुलगा बबलू सोबत होळी सणाची खरेदी करण्यासाठी घराबाहेर पडले होते. खरेदी आटोपून दोघेही आपल्या एमएच २७ एमएच ८९९५ क्रमांकाच्या दुचाकीने गावाकडे परतत होते. परतत असताना गारवा रेस्टॉरंटसमोर त्यांच्या दुचाकीला समोरून येणाऱ्या ☞(पान २ वर)

## पत्नीला सिगारेटचे चटके देत छळ

### पतीसह चौघांविरुद्ध गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील कलीम नगर परिसरातील २४ वर्षीय विवाहितेने पती व सासरच्यांकडून होत असलेल्या शारीरिक व मानासिक छळाबाबात पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.



तिचा विवाह २०२३ मध्ये झाला असून तिला एक मुलगी आहे. लग्नानंतर चार ते पाच महिन्यांतच पतीने त्रास देण्यास सुरुवात केली. वादाच्या कारणावरून पतीने तिला सिगारेटचे चटके देत अमानुष वागणूक दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. यापूर्वीही महिलेने छळाबाबत तक्रार दिली होती. त्यावेळी समेट घडवून आणण्यात आला होता. मात्र त्यानंतरही पती व इतर सासरच्यांनी☞(पान २ वर)

## आयआयएमसीचे क्षेत्रीय निदेशक

# प्रो.अनिल कुमार सौमित्र यांची उच्च न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता

**नागपूर/प्रतिनिधीः-** मुंबई उच्च न्यायालय (नागपूर खंडपीठ) यांनी अमरावती येथील भारतीय जनसंचार संस्थान (आय. आय. एम.सी) चे प्रादेशिक संचालक डॉ. अनिल कुमार सौमित्र यांच्यावरील अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यानुसार दाखल गुन्हा रद्द करत त्यांना निर्दोष मुक्त केले आहे. न्यायमूर्ती पी. एस पाटील यांनी नुकताच हा निर्णय दिल्याने डॉ. सौमित्र यांना दिलासा मिळाला आहे.

संस्थेतील एका कराराधारित सहाय्यक प्राध्यापकाने डिसेंबर २०२१ मधील दोन घटनांचा



उल्लेख करत प्रादेशिक संचालकांवर जातीय अपमान व मानसिक छळाचे आरोप केले होते. त्यानंतर फेब्रुवारी २०२२ मध्ये अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरण अतिरिक्त सत्र न्यायालयात प्रलंबित होते.

उच्च न्यायालयाने साक्षीदारांचे जबाब, चार्जशीट आणि संस्थेच्या अंतर्गत चौकशी अहवालाचा बारकाईने अभ्यास केला. न्यायालयाच्या निदर्शनास आले की, कोणत्याही ठिकाणी जातीय स्वरूपाचे स्पष्ट वक्तव्य किंवा हेतुपुरस्सर अपमान सिद्ध होत नाही. न्यायालयाने नमूद केले की, केवळ प्रशासकीय निर्णय किंवा शिस्तभंगाची कारवाई यास जातीय छळ ठरविता येत नाही. अत्याचार प्रतिबंधक कायदा लागू होण्यासाठी अपमान हा स्पष्टपणे जातीय कारणावर आधारित असल्याचे ठोस पुरावे आवश्यक ☞(पान २ वर)

# महापालिकेच्या आमसभेत स्वच्छतेवर घमासान

## सत्ताधा-यांसह विरोधी पक्षातील नगरसेवकांचा संताप

### स्वच्छता अधिकारी आणि कंत्राट रद्द करण्याचा सूर

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरामध्ये गेल्या काही महिन्यापासून स्वच्छतेची अवस्था बिकट आहे. जागोजागी घाणिचे साम्राज्य पसरली आहे. यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाच्या विरोधात नाराजी पाहायला मिळत आहे. अशात आज शनिवार २८





फेब्रुवारी रोजी झालेल्या आमसभेमध्ये स्वच्छतेच्या मुद्द्यावर जोरदार घमासान झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहामध्ये बोलविण्यात आलेल्या सभेमध्ये सत्ताधारी सह विरोधी पक्षातील नगरसेवक चांगलेच संतापले. त्यांनी अधिकाऱ्यांना फटकारले. त्यांच्या एकाही प्रश्नाचे उत्तर ☞(पान २ वर)

# मेळघाटातील सुविधा, सुरक्षेवर भर देणार

### गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर -धारणी पोलीस स्टेशनला भेट, अभ्यासिकेत पुस्तकांचे वाटप





**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील धारणी आणि चिखलदरा या दुर्गम भागांच्या विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. या भागाच्या समस्या जाणून परिसराचा कायापालट करण्यात येणार आहे. प्रामुख्याने मेळघाटातील सुविधा, सुरक्षेवर भर देणार आहे, असे गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी सांगितले.

आज शनिवारी (दि.२८) डॉ. भोयर यांनी धारणी येथील पोलीस स्टेशनला भेट देऊन पोलीस ठाण्याच्या कामकाजाचा आढावा घेतला, तसेच विविध उपक्रमांची पाहणी केली. यावेळी आमदार केवलराम काळे, प्रभुदास भिलावेकर, नगराध्यक्ष सुनील चौथमल, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, सहाय्यक जिल्हाधिकारी तसेच प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, उपविभागीय☞(पान २ वर)

## जिल्हा रुग्णालयातून महिलांचे दागिने लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील जिल्हा सामान्य रुग्णालयात सध्या चोरट्यांचा सुळसुळाट वाढल्याचे चित्र आहे. शुक्रवारी उपचारासाठी आलेल्या दोन महिलांच्या पर्समधून एकूण ६२ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी सिटी कोतवाली पोलीस ठाणे येथे अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



माहितीनुसार, शहरातील आसिम नगर परिसरातील ५२ वर्षीय महिला आपल्या भाचीसोबत उपचारासाठी रुग्णालयात आली होती. उपचारानंतर त्या ओपीडीकडे जात असताना एका अज्ञात महिलेने स्वतःचा पर्स चोरीला गेल्याची ओरड करत असल्याचे त्यांनी पाहिले. त्यानंतर तक्रारदार महिला औषधे घेण्यासाठी रांगेत उभी असताना तिने स्वतःची पर्स तपासली ☞(पान २ वर)

## आसेगाव येथे रेतीचा ट्रक जप्त

### महसूल विभागाची धडक कारवाई

**चांदूरबाजार/प्रतिनिधीः-** तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक विरूध्द महसूल विभागाने, आपली कारवाई मोहीम अधिक तीव्र केली आहे. शुक्रवारी दुपारी २:१५ वाजता, अवैध रेतीची वाहतूक करणारा एक ट्रक महसूल पथकाने रंगे हात पकडला.आसेगाव परिसरात ही कारवाई करण्यात आली. महसूल पथकाने अवैध रेती सह ट्रक ताब्यात घेतला असून, तो पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी आसेगाव पोलीस स्टेशन येथे जमा करण्यात आला आहे. ही कारवाई तहसील कार्यालयाच्या महसूल पथकाद्वारे



करण्यात आली. या कारवाईत ग्राम महसूल अधिकारी विपुल ठाकरे व मोहन पाखरे यांनी सहभाग घेतला.

अवैध रेती उपसा आणि विनापरवाना गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्यांवर, महसूल विभागाची ☞(पान २ वर)

## फ्रेजरपुरात हातभट्टीवर पोलिसांची कारवाई आरोपी ताब्यात, साहित्य जागीच उद्ध्वस्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात अवैध दारू निर्मितीविरोधात गुन्हे शाखेने पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेत फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीत सुरू असलेल्या हातभट्टीवर सापळा रचत कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे टाकलेल्या या धाडीत आरोपीला प्रत्यक्ष दारू गाळताना पकडण्यात आले.

मिळालेल्या माहितीनुसार, मनोज मोहन बेनिवाल (वय ५०, रा. परिहारपुरा, वडाळी) हा स्वतःच्या घरासमोरील मोकळ्या जागेत हातभट्टी लावून अवैधरित्या दारू तयार करत होता. पथकाने अचानक छापा टाकताच तो दारू निर्मितीच्या प्रक्रियेत गुंतलेला असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी तयार हातभट्टी दारू, मोहाचा सडवा आणि निर्मितीसाठी लागणारे साहित्य असा एकूण सुमारे ५२ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पंचनामा करून संपूर्ण साहित्य जागीच नष्ट करण्यात आले. आरोपीविरुद्ध☞(पान २ वर)



## नागपुरी गेट हद्दीत ५२ पत्त्यांचा अड्डा उद्ध्वस्त, ८ जणांवर गुन्हा दाखल



### ४५,०४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील नागपुरी गेट पोलीस ठाणे हद्दीतील गुलिस्ता नगर परिसरात सुरू असलेला ५२ पत्त्यांचा जुगार अड्डा गुन्हे शाखेने उध्वस्त केला. या कारवाईत आठ जणांना रंगेहात पकडण्यात आले असून ४५,०४५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

२७ फेब्रुवारी २०२६ रोजी गुन्हे ☞(पान २ वर)

## रासेगाव घरफोडीचा लागला छडा

### तीन अल्पवयीनांच्या टोळीचा पर्दाफाश

### -५.७३ लाखांचे दागिने हस्तगत

**अमरावती/प्रतिनिधीः-** पथ्रोट पोलीस ठाणे हद्दीतील रासेगाव येथे बंद घर फोडून तब्बल १२ लाखांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल लंपास करणाऱ्या घरफोडी प्रकरणाचा अखेर छडा लागला आहे. अमरावती ग्रामीण पोलिसांनी तीन विधीसंघर्षीत (वय १४ वर्ष) बालकांना ताब्यात घेत त्यांच्या ताब्यातून सुमारे ५.७३ लाख रुपये किमतीचे ३९.१९ ग्रॅम



सोन्याचे दागिने जप्त केले आहेत.

फिर्यादी साधना सुभाषराव नावकार या कुटुंबासह बाहेरगावी गेल्या ☞(पान २ वर)

## परतवाड्यात घरफोडी टोळीचा पर्दाफाश

### -दोन सराईत आरोपी गजाआड

### घरफोड्या आणि मोटार सायकल चोरीचा छडा

**अमरावती/प्रतिनिधीः-** परतवाडा परिसरात अलीकडे वाढलेल्या घरफोड्यांच्या घटनांनी नागरिकांची झोप उडवली असताना पोलिसांनी वेगवान आणि नियोजनबद्ध कारवाई करत घरफोडी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. दोन सराईत आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्या ताब्यातून सुमारे १ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पांडुरंग नगर येथील सचिन मनोहरे यांच्या घरफोडीपासून तपासाची सूत्रे हलली. २१ फेब्रुवारी रोजी ते बाहेरगावी असताना अज्ञात चोरट्यांनी कुलूप तोडून सोने-चांदीचे दागिने व रोकड असा १.८५ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला होता. गुन्हा नोंद होताच डीबी पथकाने परिसरातील संशयितांची हालचाल,

## हरवलेली ३० ग्रॅम सोन्याची पोत काही तासांत सापडली

**अमरावती/प्रतिनिधीः-** रस्त्यात पडलेली सुमारे सहा लाख रुपये किंमतीची ३० ग्रॅम सोन्याची पोत अवघ्या काही तासांत शोधून काढत गाडगेनगर पोलिसांनी तत्परतेचे उदाहरण दिले. ही पोत सुरक्षितपणे मालकिणीच्या ताब्यात देण्यात आली.

लक्ष्मीनगर येथील रहिवासी डॉ. स्मिता अनिल कांबळे यांनी २८ फेब्रुवारी रोजी गाडगेनगर पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली. त्या आईच्या घरी जाऊन परत येत असताना त्यांच्या पर्समधील सोन्याची पोत असलेले पाकीट रस्त्यात पडल्याचे लक्षात आले. घरी पोहोचल्यानंतर पाकीट हरवल्याचे स्पष्ट झाल्याने त्यांनी तातडीने पोलिसांकडे धाव घेतली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांनी तक्रार मिळताच डी.बी. पथकाला तपासाचे आदेश दिले. पथकाने घटनास्थळ व परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता रस्त्यावर पडलेली वस्तू उचलताना एक इसम दिसून आला. या आधारे विजय अवधुतराव राऊत (वय २७) याला ☞(पान २ वर)

## १५ वर्षीय विद्यार्थिनीला धमकावणारे दोघे ताब्यात

### 'तु माझी नाही तर कोणाचीही नाही'असे म्हणत धमकी



**अमरावती/प्रतिनिधीः-** दहावीची परीक्षा संपवून शाळेबाहेर उभ्या असलेल्या १५ वर्षीय विद्यार्थिनीचा छळ करत तिच्यावर हात उगारल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रस्ताव नाकारल्याच्या रागातून आरोपींनी तिचा पाठलाग☞(पान २ वर)

## खाकीही असुरक्षित!

### महिला पोलिसाचा विनयभंग

### ऑक्सिजन पार्क परिसरीतील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात महिलांवरील अत्याचारांच्या घटना वाढत असताना आता खाकी वर्दीही सुरक्षित नाही, हे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. एका महिला पोलिस कर्मचाऱ्याचा विनयभंग केल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेमुळे संतापाची लाट उसळली आहे.



या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाणे येथे विजय निकम (वय ५२, रा. अमरावती) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.तक्रारीनुसार, संबंधित महिला २०२२ पासून शहरात पोलीस☞(पान २ वर)

## नरेंद्र वैरागडे डिजिटल मिडिया संघटनेच्या राज्य उपाध्यक्ष पदी

नागपूर/प्रतिनिधीः- येथील पत्रकार नरेंद्र वैरागडे यांची अखिल भारतीय डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेच्या राज्य उपाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. पूर्वी डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र असे नाव होते त्यावेळी वैरागडे यांनी विदर्भ कार्याध्यक्ष या पदावर काम केले आहे. आता संघटना भारतीय स्तरावर काम करीत आहे. संघटनेचे संस्थापक अद्यक्ष राजा माने, विकास भोसले महासचिव आणि सतीश सावंत महाराष्ट्र प्रदेश अद्यक्ष यांनी नियुक्ती केली आहे. नरेंद्र वैरागडे मागील ३५ वर्षा पासून मीडिया क्षेत्रात कार्यरत आहे. वृत्तनामा न्युज २४ या डिजिटल चॅनल चे ते संपादक आहेत.




सारांश
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
▢ रविवार, १ मार्च २०२६ ▢ E-paper - www.janmadhyam.com

> भारतात एकीकडे कोटय़वधी नागरिक स्वच्छ पाण्यासाठी संघर्ष करत आहेत तर दुसरीकडे देशातील श्रीमंत वर्ग पाण्याकडे एक मूलभूत गरज म्हणून नाही तर आलिशान अनुभव म्हणून पाहत आहेत. बाटलीबंद पाणी हे स्वच्छ पाण्याची हमी देत असताना दुसरीकडे ते स्टेटस सिम्बॉल आणि जीवनशैलीचा भाग होताना दिसत आहे. देशातील मोठय़ा महानगरात इटली, फ्रान्स आणि अन्य युरोपिय देशांकडून आयात केलेले महागडय़ा पाण्याची मागणी वेगाने वाढत असून देशात एक नवीन प्रीमियम वॉटर कल्चर विकसित होत आहे. दिल्ली, मुंबई, बंगळुरू, गुरुग्राम यासारख्या निवडक शहरांत आलिशान फुड स्टोअर आणि पंचतारांकित हॉटेलमध्ये विशेष चवीचे पाणी प्राशन करण्याचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. या कार्यक्रमात सहभागी होणारी मंडळी जगभरातील नामांकित ब्रँडचे पाणी वाईन, कॉफीप्रमाणे तपासत आहेत.

# 'एपस्टीन', युरोप व भारत

**जयंत माइणकरे**



युरोपच्या राजकारणात एपस्टीन फाइल्समुळे सध्या चांगलीच उलथापालथ सुरू आहे. इंग्लंडचे राजपुत्र अँड्र्यू यांना तर थेट अटकच झाली आहे. जेफ्री एपस्टीन हा अमेरिकी अर्थपुरवठादार आणि सेक्स ट्रॅफिकिंगचा दोषी ठरलेला गुन्हेगार होता, हे आता सर्वज्ञात आहे. त्याच्याविषयी आणि त्याच्या एपस्टीन फाइल्सविषयी खूप काही लिहून आले आहे, लिहून येते आहे. अमेरिकेच्या जस्टिस डिपार्टमेंटने लाखो पानांचे दस्तऐवज जारी केले आहेत, ज्यात ३० लाखहून अधिक पाने आणि हजारो फोटो, व्हिडीओ यांचा समावेश आहे. अँड्र्यू म्हणजे किंग चार्ल्स यांचे धाकटे भाऊ. त्यांचे एपस्टीनशी अनेक वर्षांपासून निकटचे संबंध होते. आपण अल्पवयीन असताना अँड्र्यू यांच्यासोबत शरीरसंबंधांसाठी एपस्टीनने आपल्यावर दबाव आणला, असा आरोप व्हर्जिनिया गिफ्रे या महिलेने केला होता. अँड्र्यू यांनी हे आरोप सातत्याने नाकारले. पण २०२२ मध्ये त्यांनी गिफ्रेसोबत १२-१५ दशलक्ष पौंडांची 'कायदेशीर तडजोड' केली. मुळात आधी आरोप नाकारणारे अँड्र्यू यांनी ही तडजोड केली, याचा अर्थ त्यांनी आरोप मान्य केले, असा होऊ शकतो. इंग्लंडमधील मजूर पक्षाचे माजी नेते, अमेरिकेतील ब्रिटिश राजदूत पिटर मँडेलसन यांना एपस्टीनशी संबंधित आरोपांवर फेब्रुवारी २०२६मध्ये अटक झाली. इंग्लंडचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी, अँड्र्यू यांनी अमेरिकी काँग्रेससमोर साक्ष द्यावी, अशी मागणी केली आहे. या घडामोडींमुळे एकूण ब्रिटिश राजेशाहीवरच आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नॉर्वेमधील क्राउन प्रिन्सेस मेटे-मारिट यांचे नाव एपस्टीन फाइल्समध्ये आले. त्यांनी २०१३मध्ये एपस्टीनच्या पाम बीचमधील घरात मुक्काम केला. सन २०१२मध्ये त्यांच्यात ई-मेल संदेशांची देवाणघेवाण झाली होती. फ्रान्स, जर्मनी आणि इतर देशांत एपस्टीनशी संबंधित व्यक्तींच्या नावांची चर्चा आहे. त्यामुळे राजकीय राजीनामे आणि तपासचक्र सुरू झाले. त्यातच बिल गेट्स यांचेही नाव आल्याने खळबळ माजली. एपस्टीन फाइल्समध्ये युरोपीय नेत्यांचीही नावे आहेत. यात अँड्र्यूसह पीटर मँडेलसन (यूके), एहुद बराक (इस्रायल), जॅक लँग (फ्रान्स) यांचा समावेश आहे.

एपस्टीन फाइल्समध्ये उद्योगपती बिल गेट्स यांचे नाव अनेकदा येते. गेट्स आणि एपस्टीन हे २०११पासून अनेकदा एकमेकांना भेटले. फोनवर बोलले. आमच्यात अनेकदा बोलणे झाले हे खरे, मात्र ते 'परोपकारी कामां'बद्दल होते, असा गेट्स यांचा दावा आहे. एपस्टीनने 'गेट्स फाउंडेशन'च्या काही कर्मचाऱ्यांना भेटायला बोलावले होते. मध्यंतरी काही नव्या फाइल्स बाहेर आल्या आहेत. त्यात एपस्टीनने स्वतःला पाठवलेल्या काही ई-मेल्सचा उल्लेख आहे. त्या मेल्समध्ये असा दावा केला होता, की बिल गेट्स यांनी रशियन महिलांशी शरीरसंबंध राखले. त्यातून त्यांना संसर्ग झाला. त्यासाठी त्यांनी प्रतिजैविके देखील घेतली. गेट्स यांनी ही प्रतिजैविके पत्नी मेलिंडा यांना देखील त्यांच्या नकळत देण्याचा प्रयत्न केला, असा एपस्टीनचा दावा आहे. गेट्स यांच्या प्रतिनिधीने मात्र हे दावे सपशेल फेटाळले आहेत. बिल गेट्स यांनी या संदर्भात नुकतीच कर्मचाऱ्यांसमोर माफी मागितली. एपस्टीनसोबत वेळ घालवणे ही माझी फार मोठी चूक होती, असे त्यांनी नमूद केले. छायाचित्रात आपल्यासोबत दिसणाऱ्या दोन रशियन महिलांपैकी एक ब्रिज खेळाडू, तर दुसरी न्युक्लिअर फिजिसिस्ट होती. मी काहीही गैर केले नाही, काही गैर पाहिले नाही असा दावा गेट्स यांनी केला आहे. बिल गेट्स यांच्यावर अद्याप कोणताही गुन्हा सिद्ध झालेला नाही किंवा ठोस आरोप नाहीत. पडताळणी न केलेले दावे आहेत.

> **एपस्टीन फाइल्समध्ये उद्योगपती बिल गेट्स यांचे नाव अनेकदा येते. गेट्स आणि एपस्टीन हे २०११पासून अनेकदा एकमेकांना भेटले. फोनवर बोलले. आमच्यात अनेकदा बोलणे झाले हे खरे, मात्र ते 'परोपकारी कामां'बद्दल होते, असा गेट्स यांचा दावा आहे. एपस्टीनने 'गेट्स फाउंडेशन'च्या काही कर्मचाऱ्यांना भेटायला बोलावले होते. मध्यंतरी काही नव्या फाइल्स बाहेर आल्या आहेत. त्यात एपस्टीनने स्वतःला पाठवलेल्या काही ई-मेल्सचा उल्लेख आहे. त्या मेल्समध्ये असा दावा केला होता, की बिल गेट्स यांनी रशियन महिलांशी शरीरसंबंध राखले. त्यातून त्यांना संसर्ग झाला.**

भारतात देखील राजकारण, उद्योगजगत यांसह इतर काही क्षेत्रांतील खूप शक्तिशाली अशा काही जणांची नावे याबाबत चर्चेत आहेत. उद्योगपती अनिल अंबानी, पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांची नावे चर्चेत आहेत. राजस्थानच्या उपमुख्यमंत्री दिया कुमारी व त्यांच्या मुलावर या संदर्भात काँग्रेस नेते पवन खेरा यांनी आरोप केलेले आहेत. पवन खेरा यांनी जयपूरचे महाराजा सवाई पद्मनाभ सिंह यांच्या २०१८मधील वाढदिवसाच्या समारंभाशी एपस्टाइनशी संबंधित कागदपत्रांचा संबंध जोडणारी सोशल मीडिया पोस्ट शेअर केल्यानंतर एक नवीन राजकीय वाद निर्माण झाला आहे. जयपूरचे महाराजा म्हणजे राजस्थानच्या उपमुख्यमंत्री दिया कुमारी यांचे पुत्र सवाई पद्मनाभ सिंह. २०१८मध्ये रोममध्ये पद्मनाभ सिंह यांच्या विसाव्या वाढदिवसाच्या सोहळ्याचे यापूर्वी मोठ्या प्रमाणात वृत्तांकन झाले होते.

दीपक चोप्रा, मीरा नायर, नंदिता दास यांचीही नावे एपस्टीन फाइल्समध्ये यांच्याशी संपर्क साधण्याची विनंती आहे. केंद्रीय मंत्री हरदीप पुरी यांचा उल्लेख यात आहे. पुरी यांनीच अनिल अंबानी यांचा एपस्टीनशी परिचय करून दिला, असा आरोप विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. तर, एपस्टीनला आपण तीन-चार वेळा भेटलो होतो; मात्र त्या भेटी पूर्णपणे व्यावसायिक होत्या आणि हवामान शिखर परिषदेच्या, तसेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या संदर्भात होत्या, असे पुरी यांनी म्हटले आहे. इंग्लंडमध्ये व इतरत्र या प्रकरणी राजीनामे देणे सुरू असले तरी भारतात तसे काही होणे शक्य नाही. बोफोर्सपासून अगदी टू जी, कॉमनवेल्थ गेम्सपर्यंत सर्व प्रकारचे आरोप करून काँग्रेसच्या तत्कालीन सत्ताधाऱ्यांचे, मंत्र्यांचे राजीनामे मागणारा, घेणारा तेव्हाचा विरोधी पक्ष भारतीय जनता पक्ष आज सत्तेवर आहे. हा पक्ष स्वतःकडील कुणावर आरोप झाले तर त्याचा राजीनामा घेईल, असे वाटत नाही.. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण हे गेल्या काही दिवसांपासून सातत्याने दावा करीत होते, की एपस्टीन फाइल्समध्ये भारतातील काही आजी-माजी खासदारांची नावे आहेत आणि त्यामुळे देशाचा पंतप्रधान बदलू शकतो. त्यावर सर्वत्र मोठी चर्चाही झाली. आपल्या त्या दाव्यावर पृथ्वीराज चव्हाण आजही ठाम आहेत.

'सत्ता भ्रष्ट करते आणि पूर्ण शक्ती पूर्णपणे भ्रष्ट करते,' असे एकोणिसाव्या शतकातील ब्रिटिश इतिहासकार लॉर्ड अ‍ॅक्टन यांनी म्हटले होते. अधिकार नियंत्रित नसल्यामुळे नैतिक सचोटीचा ऱ्हास होतो. नेते अनेकदा स्वसंरक्षणासाठी सत्तेचा गैरवापर करतात, क्षमतेपेक्षा निष्ठेला प्राधान्य देतात आणि लोभाला बळी पडतात, असे हे सूत्र सांगते. आज

फक्त एपस्टीन सोबतचे संबंध आणि

कुठल्या ना कुठल्या कारणाने

आल्यामुळे चर्चेत आहेत. २०१७-२०१९ दरम्यान एपस्टीन आणि अनिल अंबानी यांच्यातील अनेक मेसेज आणि ई-मेल सापडले, असा दावा केला जातो. यात दिल्लीतील नेतृत्वाच्या वतीने ट्रम्प प्रशासनातील जॅरेड कुश्नर, स्टिव्ह बॅनन

यामुळे एपस्टीन फाइल्सद्वारे ज्या घटना उघड केल्या जात आहेत त्या लॉर्ड अ‍ॅक्टन यांच्या विधानाशी सुसंगतच आहेत, असे दिसते. या सगळ्या गदारोळात जगभर इतरत्र राजीनामे देण्याच्या घटना घडत आहेत. असे असले तरी भारतात जे सुरू आहे, त्याबाबत सर्वोच्च नेतृत्वाकडून काही स्पष्टीकरण, खुलासा येणे कठीण. नव्हे अशक्यच आहे. खरे तर राज्यकर्त्यांवर अशा प्रकरणांत काही आरोप होणे, हेच अयोग्य आहे. आणि असे आरोप झाले तर ज्यांच्यावर असे आरोप होत आहेत त्यांनी त्यांनी पत्रकारांकडे स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे.

पण पत्रकारांना खड्यासारखे दूर ठेवणाऱ्या सत्ताधारी भाजप नेत्यांना हे कोण सांगणार?

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

# सोन्या–चांदीची झळाळी.....



जगभरात बचतीची आणि गुंतवणुकीची कितीही आधुनिक साधने आली, तरीही अडीनडीला उपयोगी पडते ते सोनेच, हे सोन्याच्या गेल्या काही दिवसांतील भावावरून स्पष्ट दिसून आले आहे.

सोन्यासोबत चांदीही चांगलीच भाव खाऊन गेली आहे. आखाती प्रदेशात गेल्या काही दिवसांपासून अशांतता आहे. अमेरिकेकडून भारताबरोबरच्या व्यापारासाठी कोणतेच स्पष्ट संकेत अद्याप मिळालेले नाहीत. दोन्ही देशांतील व्यापार कराराच्या चर्चेच्या पुढील फेरीसाठी अमेरिकेचे शिष्टमंडळ ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात भारतात येणार आहे. यामुळे भारतीय आयात-निर्यातदारांमध्ये अस्वस्थता आहे. त्यातच अमेरिकी डॉलर गेल्या काही दिवसांपासून आंतरराष्ट्रीय बाजारात कमजोर झाला आहे. अमेरिकेच्या सरकारी रोख्यांपासून मिळणाऱ्या उत्पन्नात घसरण झाली आहे. आता सर्वांचे लक्ष अमेरिकेची मध्यवर्ती बँक असलेल्या यूएस फेडरलकडून नेमकी किती व्याजदर कपात केली जाते याकडे आहे. या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणून जगभरातील वित्तसंस्था, व्यापारी, दलाल ते सर्वसामान्य नागरिक या सर्वांकडून बेसुमार सोने खरेदी सुरू आहे.

सौरऊर्जा, मोबाइल, विजेवरील वाहने असे नवे उद्योग जगभरात वेगाने फोफावत असल्यामुळे या उत्पादनांसाठी चांदीची खरेदी कारखान्यांकडून मोठ्या प्रमाणावर होत आहे. यास्तव, सोन्याचा १० ग्रॅमसाठी सरासरी भाव एक लाख रुपये ते १.०३ लाख रुपयांमध्ये राहिला आहे. चांदीचा भाव प्रतिकिलो सरासरी १.१४ लाख रुपये ते १.१८ लाख रुपयांपर्यंत गेला आहे.

सध्याचा सणासुदीचा काळ पाहता, सोने आणि चांदी यांची सर्वसामान्यांकडून खरेदी होणे साहजिक आहे. आगामी काळात सोन्याचा भाव खाली येण्याची फारशी शक्यता दिसत नाही. सोन्याचा भाव असाच चढा राहिला तर त्याच्या विक्रीवर निश्चित परिणाम होणार आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आजही फार कमी जण सोने गुंतवणुकीचे साधन म्हणून खरेदी करतात. बहुतांश खरेदी ही दागिन्यांसाठी केली जाते.

एक दागिना घडवताना त्याची घडणावळ, जीएसटी असे अन्य शुल्क सोन्याच्या किमतीत मिळवल्यास सोने अधिक महाग पडताना दिसत आहे. सध्याच्या परिस्थितीत आपण सोने खरेदी करण्यामागचा उद्देश बदलणे गरजेचे आहे. सोन्याची खरेदी यापुढे प्राधान्याने दागिन्यांसाठी न करता गुंतवणूक म्हणून करायला हवी. सोन्याचा भाव वधारल्यावर ते विकताना आपल्या भावना त्यात गुंतलेल्या राहणार नाहीत. सध्याच्या महाग झालेल्या सोन्यापासून हा बोध घ्यायला काहीच हरकत नाही.

# प्रीमियम वॉटर कल्चर

**रंगनाथ कोकणे**

भारतात एकीकडे कोटय़वधी नागरिक स्वच्छ पाण्यासाठी संघर्ष करत आहेत तर दुसरीकडे देशातील श्रीमंत वर्ग पाण्याकडे एक मूलभूत गरज म्हणून नाही तर आलिशान अनुभव म्हणून पाहत आहेत. बाटलीबंद पाणी हे स्वच्छ पाण्याची हमी देत असताना दुसरीकडे ते स्टेटस सिम्बॉल आणि जीवनशैलीचा भाग होताना दिसत आहे. देशातील मोठय़ा महानगरात इटली, फ्रान्स आणि अन्य युरोपिय देशांकडून आयात केलेले महागडय़ा पाण्याची मागणी वेगाने वाढत असून देशात एक नवीन प्रीमियम वॉटर कल्चर विकसित होत आहे. दिल्ली, मुंबई, बंगळुरू, गुरुग्राम यासारख्या निवडक शहरांत आलिशान फुड स्टोअर आणि





पंचतारांकित हॉटेलमध्ये विशेष चवीचे पाणी प्राशन करण्याचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. या कार्यक्रमात सहभागी होणारी मंडळी जगभरातील नामांकित ब्रँडचे पाणी वाईन, कॉफीप्रमाणे तपासत आहेत. या कार्यक्रमातून पाण्यातील मिनरल कंटेट, कार्बोनेशन, खारटपणा आणि चवीबद्दल गांभीर्याने चर्चा होते. सध्या ही बाब भारतातील उच्चभ्रू वर्गापुरतीच मर्यादित आहे. परंतु आगामी काळात त्याची व्याप्ती वाढण्याची शक्यता अधिक आहे.

पाण्याची चव घेण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करणा-यांपैकी एक अवंती मेहता यांनी स्वतःला भारताची सर्वात तरुण 'वॉटर सोमेलिएर' असल्याचे म्हटले आहे. सेमिलिएर हा शब्द वाईन तज्ञांसाठी वापरला जातो आणि आता पाणी क्षेत्रातही उपयोगात आणला जात आहे. अवंतीच्या मते, वेगवेगळ्या भौगोलिक स्थितीतून उपसलेल्या पाण्याची चव आणि पोषणमूल्य वेगळे असते. 'रॉयटर्स'च्या एका अहवालानुसार या आयोजनात फ्रान्सच्या पर्वतरांगातील पाणी सादर करणारे एबिया, दक्षिण फ्रान्सची पेरिये, इटलीची सॅन पेलग्रिनो, भारतातील अरावली पर्वताचे पाणी आणणारे आवा मिनरल वॉटर यासारख्या ब्रँडचा समावेश होतो. अवंतीच्या मते, प्रत्येक ठिकाणच्या पाण्याची चव वेगळी असते, हे लोकांना कळून चुकले आहे. काही ठिकाणी कॅल्शियम अधिक असते तर काहीत मॅग्नेशियम तर काही ठिकाणी नैसर्गिक कार्बोनेशन. योग्य प्रकारचे पाणी निवडणे हे शरीरासाठी फायदेशीर राहू शकते. विशेष म्हणजे अवंती यांचे कुटुंबीय आवा मिनरल नावाची कंपनी चालवते आणि ते भारतातील प्रीमियम वॉटर ब्रँड्समध्ये स्वतःचे स्थान निर्माण करत आहे.

१.४ अब्ज लोकसंख्येच्या आपल्या देशात स्वच्छ पाणी हा कळीचा मुद्दा ठरत आहे. संशोधकांच्या मते, देशातील सुमारे ७० टक्के भूजल कोणत्या ना कोणत्या रूपाने दूषित झाले आहे. अनेक शहर आणि वाडय़ावर नळातून येणारे पाणी पिण्याजोगे राहिलेले नाही. गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात इंदूरमध्ये गलिच्छ पाणी पिल्याने सोळा जणांचा मृत्यू झाल्याची बातमी खळबळ उडविणारी ठरली. अशावेळी बाटलीबंद पाणी भारतातील काही लोकांसाठी अत्यावश्यक बाब बनली आहे. किराणा दुकानात एक लिटरची पाण्याची बाटली वीस रुपयांना मिळते. हे पाणी पेप्सी, कोका कोला, बिस्लरी तयार करतात. पिण्याच्या पाण्याच्या उद्योगाची उलाढाल तब्बल पाच अब्ज डॉलर आहे. यात दरवर्षी २४ टक्क्यांनी वाढ होत असून त्यात भारत या क्षेत्रात वेगाने विकसित होणारी बाजारपेठ म्हणून समोर येत आहे.

जागतिक पातळीवर बाटलीबंद पाण्याची उलाढाल तीस अब्ज डॉलरपेक्षा अधिक आहे. चीन आणि अमेरिकेसारख्या देशांत होणारी मागणी ही प्रामुख्याने जीवनशैली अणि सुविधेच्या रूपातून होताना दिसते. तेथे दरवर्षी चार ते पाच टक्के वाढ नोंदली जात आहे. या तुलनेत भारतात प्रीमियम पाण्याची मागणी अनेक पटीने वाढताना दिसून येते. बाजारातील रिसर्च कंपनी युरोमॉनिटरच्या आकडेवारीनुसार, भारतात प्रीमियम वॉटरची मागणी २०२१ मध्ये केवळ एक टक्का असताना २०२५ पर्यंत ती वाढत आठ टक्क्यांवर पोचली आहे. 'युरोमॉनिटर'चे अधिकारी अमूल्य पंडित यांच्या मते, महानगरपालिकेकडून पुरविण्यात येणा-या पाण्यावरचा लोकांचा विश्वास उडत चालला आहे. केवळ बाटलीबंद पाणीच आरोग्यासाठी उपायकारक असल्याचे लोकांच्या मनात भावना निर्माण झाली आहे. पंडित यांच्या मते, पाणी महाग असले तरी त्याची मागणी पुढेही वाढणार आहे. जी मंडळी नियमितपणे बाटलीबंद पाणी खरेदी करू शकत नाहीत, ते वॉटर प्युरिफायरची मदत घेतात. मात्र प्युरिफायरमध्ये पाणी स्वच्छ होताना त्यातील नैसर्गिक तत्त्व निघून जाते, असे निरीक्षण आहे.

**स्पार्कलिंग आणि स्प्रिंग वॉटरची मागणी**

भारतात आता केवळ स्टिल वॉटरच नाही तर स्पार्कलिंग आणि स्प्रिंग वॉटरची मागणीदेखील वाढत आहे. हा ट्रेंड पूर्वी युरोप आणि अमेरिकेपर्यंतच मर्यादित होता, परंतु आता भारतीय ग्राहकांकडूनही त्याला पसंती दिली जात आहे. टाटा समूहाने अलीकडेच स्पार्कलिंग वॉटरचा प्लँट सुरू केला आहे आणि कंपनी भविष्यात स्प्रिंग वॉटरच्या उत्पादनातदेखील येण्याची तयारी करत आहे. टाटा अधिका? यांच्या मते, त्यांच्या पाण्याच्या उद्योगाची उलाढाल दरवर्षी सुमारे ३० टक्के वाढ नोंदवू शकते. भारतात प्रीमियम वॉटर ब्रँड आवा याची विक्री ही मागील वर्षी विक्रमी पातळीवर नऊ दशलक्ष डॉलरपर्यंत पोचली होती. कंपनीच्या मते, शहरातील मध्यम वर्ग आणि श्रीमंत गटातील ग्राहकांत आरोग्य आणि चवीवरून वाढलेली जागरुकता पाहता प्रीमियम वॉटरची मागणी वाढत आहे. त्याचवेळी परकी ब्रँडसदेखील भारताकडे मोठी बाजारपेठ म्हणून पाहत आहेत. अर्थात या संपूर्ण ट्रेंडमागे एक कटुसत्यही दडलेले आहे. त्यात देशात कोटय़वधी नागरिक आजही सुरक्षित पाण्यापासून वंचित आहेत. हे चित्र सामाजिक असमानता दाखविणारे आहे. तज्ञांच्या मते, पाण्यासारख्या मूलभूत गरजा केवळ बाजाराच्या भरवशावर सोडणे कितपत योग्य आहे? अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनी सार्वजनिक पाणीपुरवठा प्रणाली सक्षम करण्यावर भर देण्याचा मुद्दा मांडला आहे. पाण्याची गळती थांबवून स्वच्छ आणि आरोग्यपुरक पाणी देणे आवश्यक असताना लोकांना महागडय़ा पर्यायाची निवड करण्यास भाग पाडू नये, असेही मत नोंदविले.

पाण्याची चव आखण्यासंदर्भात आयोजित कार्यक्रमात सहभागी झालेल्या मंडळींनी काही अनुभव शेअर केले. ते म्हणतात, पाण्याची चव वेगळी असली तरी त्याची किंमत आटोक्याबाहेरची आहे. एका ग्राहकाच्या मते, पाण्याची चव छान वाटली, मात्र पाणीदेखील एवढे महाग असू शकते, याची कल्पना करवत नाही. याउलट श्रीमंत वर्गात त्याचे प्रस्थ वाढताना दिसून येते. एकुणातच भारतात बाटलीबंद पाण्याची कहाणी आता केवळ तहान भागविण्यापुरती मर्यादित राहिलेले नाही, हे स्पष्ट आहे. या पाण्यावर आता आरोग्य, चव, सामाजिक प्रतिष्ठा आणि आर्थिक असमानतेचे थर जमा झालेले आहेत. एकीकडे चविष्ट पाणी पिण्याचा बाजार बहरत असताना दुसरीकडे स्वच्छ पाण्यासाठी सर्वसामान्य माणसांची तडफड सुरू आहे. आगामी काळात हे चित्र भारतात संतुलित कसे केले जाईल हे महत्त्वाचे राहील.

**बाटलीबंद पाण्याचा बाजार**

बाटलीबंद पाण्याचा बाजार भारतात आलिशान प्रॉडक्टचे रूप धारण करत आहे. चांगल्या गुणवत्तेच्या पाण्याचा बाजार सुमारे ४०० दशलक्ष डॉलरपर्यंत पोचू शकतो. तज्ञांच्या मते, भारताची लोकसंख्या आणि वाढते शहरीकरण पाहता हा बाजार आगामी काळात आणखी वाढू शकतो. प्रामुख्याने उच्च उत्पन्न गटातील लोक आता पाण्याकडे आरोग्याबरोबरच सामाजिक प्रतिष्ठेला जोडत आहेत. भारतात सर्वात महाग आणि विशेष मिनरल असलेल्या बाटलीबंद पाण्याची किंमत एका लिटरसाठीं ८० ते शंभर रुपये आहे. त्याचवेळी परदेशातून आयात बाटलीची किंमत अडीचशे ते तीनशे रुपयांपर्यंत आहे. या किमती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असतानाही त्याची मागणी वाढत आहे. पंचतारांकित हॉटेल्समध्ये भोजनाबरोबरच पाण्याचीदेखील विचारणा केली जात आहे, हे विशेष.

(लेखक पर्यावरण अभ्यासक आहेत.)

# लंडन फॅशन वीक २०२६ मध्ये क्रिती सॅननने उधळला

बॉलिवूडमधील आघाडीची स्टाइल आयकॉन ख्रि्ग् ऍहदह हिने पुन्हा एकदा लंडन फॅशन वीकमध्ये आपल्या शानदार उपस्थितीने अधोरेखित झाली आहे. या प्रसंगी कृतिने लैब् चा पोशाख परिधान करत टेक्स्चरचा समतोल आणि परंपरेची झलक सादर केली. तिने चॉकलेट-



तपकिरी रंगाचा आकर्षक ट्रेंच कोट घातला होता, जो तिच्या संपूर्ण लूकचा मुख्य आधार ठरला. संरचित सिल्हूट आणि कंबरेवर बांधलेली बेल्ट यामुळे तिच्या व्यक्तिमत्त्वात कालातीत मोहकता आणि आत्मविश्वासाची भर पडली. मोनोक्रोम रंगसंगतीला ब्रेक देत तिने टील रंगाचा नमुन्यांचा स्कार्फ परिधान केला, ज्यामुळे लूकमध्ये ताजेपणा आणि दृश्यात्मक विविधता आली. यासोबत तिने गुडघ्यांपर्यंतचे स्लीक लेदर बूट्स आणि एक क्लासिक स्ट्रक्चर्ड हँडबॅग कॅरी केली. तिचे केस हाय-फॅशन टॉप-नॉटमध्ये स्टाइल करण्यात आले होते, ज्यामुळे तिचा नितळ चेहरा आणि सुसंस्कृत मेकअप अधिक उठून दिसत होता. फक्त पोशाखापुरतेच मर्यादित न राहता, कृतिची ही उपस्थिती जागतिक मंचावर एक प्रभावी फॅशन स्टेटमेंट ठरली. भारतीय सिनेसृष्टा पासून लंडनच्या प्रतिष्ठित रनवेच्या फ्रंट रोपर्यंतचा तिचा प्रवास आधुनिक 'इट-गर्ल' प्रतिमेला एक वेगळा आंतरराष्ट्रीय आयाम देणारा आहे. इंडस्ट्रीतील तिचा दर्जा सातत्याने उंचावत असून, अशा आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांमधील तिची उपस्थिती हे स्पष्ट करते की ती ऑन-स्क्रीन आणि ऑफ-स्क्रीन दोन्ही ठिकाणी ट्रेंडसेटर म्हणून अग्रस्थानी आहे. तिच्या आगामी चित्रपटांबाबतही चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. कृति सेनन लवकरच कॉकटेल २ मध्ये Shahid Kapoor आणि Rashmika Maåanna यांच्यासोबत झळकणार आहे.

जागतिक मंचावर ठसठशीत छाप पाडली. आंतरराष्ट्रीय फॅशन विश्वातील या प्रतिष्ठित सोहळ्यात तिची उपस्थिती हा सिझनमधील प्रमुख आकर्षण ठरली. हाय-कॉन्सेप्ट कुट्यूरला सहज आणि परिधान करण्यायोग्य एलिगन्ससह सादर करण्याच्या तिच्या क्षमतेने जगभरातील फॅशन तज्ज्ञांचे लक्ष वेधून घेतले. तिच्या कारकिर्दीच्या शिखरावर, भारतीय चित्रपटसृष्टीतील अग्रगण्य अभिनेत्री म्हणून ही जागतिक ओळख अधिकच

# 'रामजी आके भला करेंगे' टीझरमध्ये पीक कॉमेडीची झलक

भूत बंगला हा २०२६ मधील सर्वात बहुप्रतीक्षित चित्रपटांपैकी एक ठरत असून, तब्बल चौदा वर्षांनंतर बॉलिवूडमधील दोन दिग्गज — अक्षय कुमार आणि प्रियदर्शन — पुन्हा एकदा एकत्र आले आहेत. बालाजी मोशन पिक्चर्सच्या बॅनरखाली साकारलेल्या या चित्रपटाने या जोडीच्या कल्ट कॉमेडी चित्रपटांवर वाढलेल्या प्रेक्षकांमध्ये जबरदस्त उत्सुकता निर्माण केली आहे. या चर्चेला अधिक रंग चढवत, निर्मात्यांनी चित्रपटातील पहिले गाणे 'रामजी आके भला करेंगे'चा टीझर प्रदर्शित केला आहे. या टीझरमध्ये प्रेक्षकांना अपेक्षित असलेल्या भन्नाट कॉमेडी आणि धमालपणाची झलक पाहायला मिळते. अक्षय कुमार त्यांच्या जुन्या, अस्सल आणि एनर्जेटिक अंदाजात दिसत असून, ते का बॉलिवूडमधील सर्वाधिक एंटरटेनिंग कलाकारांपैकी एक मानले जातात याची पुन्हा एकदा आठवण करून देतात. हे पेप्पी आणि हाय-एनर्जी गाणे व्हायब्रंट व्हिज्युअल्स, कॅची बीट्स आणि अक्षयच्या सिग्नेचर कॉमिक टाइमिंगने भरलेले आहे. प्रीतम यांनी संगीतबद्ध केलेले आणि कुमार यांनी लिहिलेले हे गाणे देव नेगी यांनी गायले आहे. तसेच मेलो डी यांनी लिहिलेला आणि सादर केलेला रॅप सेगमेंट या गाण्याला अधिक खास बनवतो — असे गाणे जे तुम्ही सहज स्किप करू शकणार नाही!

हा टीझर केवळ एका गाण्याची झलक नाही, तर एका दिग्गज क्रिएटिव्ह जोडीच्या दमदार पुनरागमनाचा संकेत आहे. 'भूत बंगला'मधून अक्षय कुमार आणि प्रियदर्शन पुन्हा एकदा त्यांची ओळखीची कॉमिक धमाल मोठ्या पडद्यावर आणण्यास सज्ज आहेत. हा चित्रपट प्रेक्षकांना जुन्या आठवणी, भरपूर हशा आणि दीर्घकाळापासून वाट पाहत असलेला बिग-स्क्रीन मनोरंजनाचा अनुभव देण्याचे आश्वासन देतो. बालाजी टेलीफिल्म्स लिमिटेडच्या डिव्हिजन असलेल्या बालाजी मोशन पिक्चर्स आणि ऍंज द उदद् इग्त्से यांच्या संयुक्त विद्यमाने सादर होत असलेल्या या चित्रपटात अक्षय कुमारसोबत वामीका गब्बी, परेश रावल, तब्बू आणि राजपाल यादव हे कलाकार झळकणार आहेत. प्रियदर्शन यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या चित्रपटाची निर्मिती अक्षय कुमार, शोभा कपूर आणि एकता आर कपूर यांनी केली आहे. 'भूत बंगला' हा चित्रपट दहा एप्रिल २०२६ रोजी चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे.




# 'लव्ह जिहाद' या मुद्द्यावर आधारित असलेला केरळ स्टोरी

या सिनेमाचा दुसरा भाग येत्या शुक्रवारी २७ फेब्रुवारीला प्रदर्शित होणार आहे. ऐन प्रदर्शनाच्या तयारीत असताना सेन्सॉर बोर्डाने चक्क १६ बदल आणि कट्स सुचवले आहेत. लव्ह जिहाद या विषयावरच्या चित्रपटात बऱ्याच वेळा मुलींना मारहाण, अश्लील कृत्ये, चुंबन यांसारखे दृश्ये दाखवलेली असतात. जी सेन्सॉर बोर्डाच्या मर्यादा ओलांडतात आणि ते भाग सेन्सॉर बोर्ड चित्रपटातून काढून टाकण्याचा किंवा कट् करण्याचा आदेश देतात. असेच काही सीन्स केरला स्टोरी २ या सिनेमात असल्याने बोर्डाने चक्क १६ कट्स सुचवले आहेत. सीन्स जितके वगळता येतील तितके कमी करण्याचे आदेश दिले आहेत.

बोर्डाच्या आदेशामुळे या सिनेमातील चुंबन सीन्स ५० टक्क्यांनी कमी करण्यात आले आहेत. बलात्काराची दृश्ये सुद्धा ५० टक्क्यांनी कमी करण्यात आले आहेत, तसेच काही मारहाणीच्या सीन्स मधेही कट्स केले आहेत. काही डायलॉग्स बदलेले गेलेत तर काही शब्दांना म्यूट करण्यात आलंय. तसेच डिस्लेमार स्क्रीन टाइम आणि त्यासोबत व्हॉइस ओव्हर सुद्धा २ मिनिटांनी वाढवण्यास सांगितलं आहे. निर्मात्यांना डायलॉगच्या होशोबाने स्क्रिप्ट जमा करण्याचे आणि चित्रपटात दाखवलेल्या काही सत्य घटनांची योग्य कागदपत्रे जमा करण्याचे आदेश दिले आहेत.

विपुल शाहांची निर्मिती आणि कामाख्या नारायण सिंह यांनी दिग्दर्शन केलं आहे. तसेच यामध्ये उल्का गुप्ता, आदिती भाटिया आणि ऐश्वर्या ओझा यांच्या मुख्य भूमिका आहेत. येत्या २७ जानेवारी रोजी हा चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.




# विजय देवरकोंडा आणि रश्मिका मंदाना अडकले विवाहबंधनात

साऊथ सिनेसृष्टीतील सर्वात लोकप्रिय जोडी अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि अभिनेता विजय देवरकोंडा अखेर गुरुवारी विवाहबंधनात अडकले आहेत. उदयपूरमधील निसर्गरम्य अरावली पर्वत रांगांमध्ये असलेल्या 'आयटीसी हॉटेल्स द मोमेंटोस'मध्ये हा भव्य विवाहसोहळा पार पडला. सकाळी हिंदू परंपरेनुसार आणि वैदिक मंत्रोच्चारात या दोघांनी एकमेकांचा जोडीदार म्हणून स्वीकार केला. यावेळी जवळचे नातेवाईक आणि मित्रमंडळींच्या उपस्थितीत विजयने रश्मिकाच्या गळ्यात मंगळसूत्र बांधले. विशेष म्हणजे, रश्मिकाच्या कोडाव परंपरेचा मान राखण्यासाठी दुपारी ४.३० वाजता ही जोडी पुन्हा एकदा विवाहबंधनात अडकणार आहे. 'गीता गोविंदम' या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान विजय आणि रश्मिका यांची पहिली भेट झाली होती. याच काळात त्यांच्यात मैत्री झाली आणि मैत्रीचे रूपांतर पुढे प्रेमात झाले. गेल्या काही वर्षांपासून ते एकमेकांना डेट करत होते, मात्र त्यांनी आपल्या नात्याबाबत कमालीची गुप्तता पाळली होती. अखेर विजयने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करून चाहत्यांना ही आनंदाची बातमी दिली. सोशल मीडियावर त्यांनी आपल्या लग्नाला 'वेडिंग ऑफ ऋ्रेंधएए' असे नाव दिले असून, लग्नाआधीच्या हळद आणि मेहेंदीचे फोटोही चाहत्यांसोबत शेअर केले आहेत.



रश्मिकाचे सासरे गोवर्धन राव देवरकोंडा हे दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध दिग्दर्शक आणि निर्माते आहेत. त्यांनी अनेक गाजलेल्या टीव्ही शोजचे दिग्दर्शन केले असून २०२१ मध्ये विजयच्या 'पुष्पक विमानम' या चित्रपटाची निर्मितीही त्यांनी केली होती.

विजयची आई माधवी देवरकोंडा या गृहिणी असून त्या सोशल मीडियावर आपल्या मुलांसोबतचे फोटो शेअर करत सक्रिय असतात. सध्या सोशल मीडियावर या नवदाम्पत्यावर चाहत्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# 'भूत बंगला'चा नवा पोस्टर प्रदर्शित

'भूत बंगला' हा २०२६ मधील सर्वाधिक चर्चेत असलेला चित्रपट ठरत आहे. यामागील मुख्य कारण म्हणजे बॉलिवूडचा 'ओजी' स्टार आणि दिग्दर्शक यांची तब्बल १४ वर्षांनंतर होत असलेली पुनर्भेट. या जोडीने यापूर्वी दिलेल्या गाजलेल्या विनोदी चित्रपटांमुळे चाहत्यांमध्ये या चित्रपटाबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. बालाजी मोशन पिक्चरच्या बॅनरखाली तयार होत असलेल्या या चित्रपटाने, आयकॉनिक जोडीचे चित्रपट पाहत मोठे झालेल्या प्रेक्षकांमध्ये विशेष उत्साह निर्माण केला आहे. त्यांच्या आधीच्या सहकार्यातून अनेक अविस्मरणीय कॉमेडी क्लासिक्स प्रेक्षकांना मिळाले होते. त्यामुळे 'भूत बंगला'मधूनही त्याच जुन्या धम्माल विनोदाची आणि खास शैलीची मोठ्या पडद्यावर पुनरागमन होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या उत्सुकतेत आणखी भर घालत निर्मात्यांनी अक्षय कुमारचा मोशन पोस्टर प्रदर्शित केला आहे. 'भूत बंगला'चा हा नवा लूक गडद हॉरर वातावरणासोबतच विनोदाचा तडका देणारा आहे. अक्षय कुमार पुन्हा एकदा त्यांच्या जुन्या अंदाजात दिसत असून, त्यांचा पोशाख, रुद्राक्षांची माळ, खास खळखळून हसण्याची शैली आणि भीतीदायक चेहरे व शिंगांनी सजलेल्या सिंहासनावर बसलेला त्यांचा अवतार चित्रपटाच्या भव्यतेची झलक दाखवतो. बालाजी टेलिफिल्मसच्या विभाग असलेल्या बालाजी मोशन पिक्चर्सने इग्त्स्सोबत मिळून 'भूत बंगला'ची निर्मिती केली आहे. या चित्रपटात अक्षय कुमार यांच्यासह वामिका गब्बी, परेश रावल, तब्बू, राजपाल यादव, मिथिला पालकर आणि दिवंगत असरानी यांसारखे कलाकार झळकणार आहेत. प्रियदर्शन यांच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या चित्रपटाची निर्मिती अक्षय कुमार, शोभा कपूर आणि एकता आर कपूर यांनी केली आहे. 'भूत बंगला' हा चित्रपट १० एप्रिल २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.




# अमिताभ बच्चन यांना साऊथचा पहिला फिल्मफेअर

७० वा साऊथ फिल्मफेअर अॅवॉर्ड्स सोहळा केरळच्या कोच्ची शहरात रंगला. अमिताभ बच्चन यांना तेलुगु भाषेतील 'कल्की २८९८ एडी' चित्रपटासाठी बेस्ट सपोर्टींग अॅक्टरचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. अमिताभ बच्चन यांचा हा पहिला साऊथ फिल्मफेअर आहे. 'कल्की' चित्रपटात त्यांनी



भीष्माचार्यची भूमिका साकारली आहे. या सोहळ्यात तेलगु, तामिळ, मल्याळम आणि कन्नड फिल्म इंडस्ट्रीतील कलाकारांना सन्मानित करण्यात आले. 'कल्कि २८९८ एडी' चित्रपट २७ जून २०२४ रोजी प्रदर्शित झाला होता. याने बॉक्स ऑफिसवर मोठे यश मिळवत जगभरात १,००० कोटींहून अधिक कमाई केली होती. अमिताभ बच्चन पुरस्कार सोहळ्याला उपस्थित नव्हते. 'पुष्पा २' चित्रपटाने तेलुगू श्रेणीत पाच पुरस्कार जिंकले. सर्वोत्कृष्ट चित्रपट, सुकुमार यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक आणि अल्लू अर्जुन यांना सर्वोत्कृष्ट अभिनेता पुरस्कार मिळाला.

# नारळ पाणी की उसाचा रस उन्हाळ्यात काय प्यायला हवे



नारळाच्या पाण्याला उन्हाळ्यातील सुपर ड्रिंक म्हटले जाते, परंतु त्याची किंमत जास्त असल्याने लोक ते पिणे टाळतात. त्याऐवजी, ते १० रुपयांना उसाचा रस पिऊन शरीराला हायड्रेट ठेवण्याचा प्रयत्न करतात. पण जेव्हा स्वच्छतेचा विचार येतो तेव्हा उसाच्या रसापासून दूर राहणे चांगले. बहुतेक लोक उष्णतेवर मात करण्यासाठी स्वस्त उसाचा रस पसंत करतात. एखाद्याला वारंवार उच्च रक्तदाबाचा त्रास होत असेल तर त्याने नारळाचे पाणी प्यावे. त्यात असलेले पोटॅशियम शरीरातून अतिरिक्त सोडियम काढून टाकण्यास मदत करते. त्यात मॅग्नेशियम, कॅल्शियम आणि मँगनीज सारखे आवश्यक घटक देखील असतात. हे इलेक्ट्रोलाइट्सचा समृद्ध स्रोत आहे जे सर्व ऋतूंमध्ये शरीराला हायड्रेट ठेवण्यास मदत करते. उन्हाळ्यात ते पिणे हायड्रेशनसाठी आदर्श आहे.

नारळाचे पाणी चरबीमुक्त असते आणि त्यात व्हिटॅमिन सी असते, जे एक अँटिऑक्सिडंट असते जे आपली रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. एखाद्याला वारंवार कमी रक्तदाबाचा त्रास होत असेल तर त्यांनी तज्ज्ञांचा सल्ला घेतल्यानंतरच नारळाचे पाणी प्यावे. उसाचा रस हा उन्हाळी सुपर ड्रिंक म्हणून देखील ओळखला जातो. मधुमेह नसलेल्यांसाठी हे अत्यंत फायदेशीर आहे कारण त्यातील नैसर्गिक साखर, ग्लुकोज आणि फ्रुक्टोज त्वरित ऊर्जा प्रदान करतात. त्यात कॅल्शियम, पोटॅशियम, लोह, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि जीवनसत्त्वे अ, बी-कॉम्प्लेक्स आणि सी यासह अनेक अँटीऑक्सिडंट्स असतात. नारळाच्या पाण्यात पोटॅशियम, सोडियम आणि मॅग्नेशियम असते, जे शरीरातील इलेक्ट्रोलाइट्स संतुलित करण्यास मदत करते.

घाम येणे इलेक्ट्रोलाइट संतुलन बिघडवते आणि नारळाचे पाणी हे संतुलन पुनर्संचयित करण्यास मदत करू शकते. दुसरीकडे, उसाच्या रसात अनेक खनिजे असतात पण इलेक्ट्रोलाइट्स नसतात. नारळ पाणी हे हायड्रेशनसाठी सर्वोत्तम आहे.

उसाच्या रसात नैसर्गिक साखरेचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे त्वरित ऊर्जा मिळते परंतु रक्तातील ग्लुकोजची पातळी देखील वाढते. नारळ पाण्यात साखर देखील असते, परंतु कमी प्रमाणात. हायड्रेटेड राहून नैसर्गिक साखरेचे सेवन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी नारळ पाणी सर्वोत्तम आहे. वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी, कॅलरीजच्या सेवनाकडे लक्ष दिले पाहिजे.

उसाच्या रसात भरपूर नैसर्गिक साखर असते, ज्यामुळे कॅलरीजचे प्रमाण जास्त होऊ शकते. वजन व्यवस्थापनावर लक्ष केंद्रित करणाऱ्यांसाठी, नारळ पाणी पिणे हा एक चांगला पर्याय आहे.

# कडुलिंबाचा सौंदर्यासाठी ....

कडुलिंब हे भारतीय घराघरात आढळणारे औषधी झाड आहे. कडुलिंबात अँटीबॅक्टेरियल, अँटीफंगल आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म असल्यामुळे तो सौंदर्यासाठी अत्यंत उपयुक्त मानला जातो. कडुलिंबाचं पूर्ण झाडाचा काही ना काही उपयोग हा होतोच. खासकरून याच्या लहान काड्या या दातुन म्हणजेच दात घासण्यासाठी देखील वापरल्या जातात. सौंदर्याच्या दृष्टीने कडुलिंब हा फारच महत्त्वाचा मानला जातो. कडुलिंबाची पाने वाटून त्याचा लेप चेहऱ्यावर लावल्यास मुरुमे कमी होण्यास मदत होते. त्यातील जंतुनाशक गुणधर्म त्वचेवरील बॅक्टेरिया नष्ट करतात. आठवड्यातून २–३ वेळा हा लेप लावल्यास त्वचा स्वच्छ आणि तजेलदार दिसते.

कडुलिंबाची पावडर, हळद आणि गुलाबपाणी एकत्र करून फेसपॅक तयार करता येतो. हा पॅक त्वचेवरील डाग, काळेपणा आणि अतिरिक्त तेलकटपणा कमी करतो. नियमित वापराने त्वचा स्वच्छ आणि मऊ राहते. कडुलिंबाची पाने उकळून त्या पाण्याने केस धुतल्यास कोंडा कमी होतो. तसेच टाळूवरील खाज आणि संसर्ग कमी होतो. कडुलिंब तेल केसांच्या मुळांना बळकटी देते आणि केस गळणे कमी करण्यास मदत करते. खाज, ॲलर्जी किंवा पुरळ असल्यास कडुलिंबाचा लेप लावल्याने आराम मिळतो. त्याचे अँटीफंगल गुण त्वचेचे संरक्षण करतात.



कडुलिंबाचे उकळलेले पाणी चेहरा धुण्यासाठी वापरल्यास ते नैसर्गिक क्लेन्सरचे काम करते. त्यामुळे त्वचेतील घाण आणि तेलकटपणा दूर होतो. कडुलिंब हा रासायनिक पदार्थांपेक्षा सुरक्षित आणि नैसर्गिक पर्याय आहे. मात्र अतिसंवेदनशील त्वचा असल्यास वापरण्यापूर्वी चाचणी करणे आवश्यक आहे. योग्य पद्धतीने आणि नियमित वापर केल्यास कडुलिंब त्वचा व केसांसाठी प्रभावी सौंदर्यवर्धक ठरतो.

# पुरी तळून उरलेले तेल पुन्हा वापरावे का?

कोणताही पदार्थ तळून झाल्यानंतर तेल राहिल्यास ते तेल पुन्हा वापरणे हितावह आहे का असा प्रश्न अनेकांना पडतो. परंतु असे तेल वारंवार वापरणे हे हितावह नसते. मर्यादित प्रमाणात अशा तेलाचा वापर हा योग्य मानला जातो. वारंवार असे तेल आरोग्यासाठी वापरणे हानिकारक ठरू शकते. म्हणूनच पुरी किंवा भजी तळून राहिलेले तेल कसे वापरावे याकरता काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. पुरी तळल्यानंतर तेलात कण (पीठाचे तुकडे) राहतात. ते गाळून काढणे आवश्यक आहे, नाहीतर ते जळून तेल खराब होते. तेल जास्तीत जास्त एकदाच



पुन्हा वापरणे योग्य. वारंवार गरम केल्याने तेलात ट्रान्स फॅट आणि हानिकारक घटक तयार होतात.

तेलाचा रंग खूप गडद झाला असेल, धूर जास्त निघत असेल किंवा वास बदलला असेल तर ते न वापरणे अधिक योग्य. तेल पूर्ण थंड झाल्यावर हवाबंद डब्यात ठेवावे. तळलेले तेल पुन्हा वापरल्याने, हृदयविकाराचा धोका वाढू शकतो. तसेच यामुळे पचनाचा तासही उद्भवू शकतो. असे तेल आहारात वापरल्याने शरीरावर सूजही येऊ शकते. तळलेले तेल वापरण्याचा उत्तम पर्याय म्हणजे भाज्यांना फोडणी देण्यासाठी हे तेल वापरणे उत्तम. पराठा किंवा थालीपीठ भाजण्यासाठी असे तेल वापरणे हितावह आहे. परंतु पुन्हा भजी किंवा पुरी तळण्यासाठी असे तेल वापरु नये. आरोग्याच्या दृष्टीने तेल पुन्हा पुन्हा वापरणे टाळावे. शक्यतो ताजे तेल वापरणेच सुरक्षित.

# तुळशीच्या रोपाला पाणीच नाही तर घाला चमचाभर मीठही!

आपल्यापैकी बहुतेक सगळ्यांच्याच अंगणात एक सुंदर असे हिरवेगार तुळशीचे रोपं असतेच. अंगणातील तुळस कायम हिरवीगार आणि बहरुन यावी यासाठी आपण नेहमीच रोपाला पाणी घालतो, सोबतच योग्य प्रकारे काळजीही घेतो. परंतु अनेकदा योग्य काळजी घेऊनही तुळशीचे रोप सुकू लागते. कित्येकदा आपण तुळशीच्या रोपाची योग्य ती काळजी घेऊनही अचानक पानं पिवळी पडणे, रोप कोमेजणे किंवा हळूहळू सुकू लागणे अशा अनेक समस्या वरचेवर दिसू लागतात. योग्य काळजी घेत असूनही तुळस तग धरत नाही, तेव्हा नेमकं काय करावं हे समजत नाही. अशावेळी घरात सहज उपलब्ध असलेला एक साधा पदार्थ म्हणजे मीठ... तुळशीच्या रोपासाठी मीठ फायदेशीर ठरू शकते, हे फार कमी लोकांना माहिती असतं. मिठाचा योग्य आणि मर्यादित वापर केल्यास काही समस्या कमी होऊन रोपाला पुन्हा तजेला मिळू शकतो. रोप सुकण्यामागे मातीतील पोषक तत्वांची कमतरता हे मुख्य कारण असू शकतं. अशावेळी 'एप्सम सॉल्ट' (मॅग्नेशियम सल्फेट) हे एखाद्या संजीवनीप्रमाणे काम करते.

# चेहऱ्यावर बर्फ लावण्याचे अगणित फायदे...



उन्हाळ्यात चेहरा काळवंडतो अशावेळी पार्लरमध्ये जाऊन, महागडे उपचार करण्यापेक्षा घरी स्वस्त आणि मस्त उपाय करता येतो. उन्हाळ्यात आपल्या चेहऱ्याला बर्फ लावल्याने अनेक फायदे होतात. आपल्या चेहऱ्याची त्वचा बर्फ लावल्याने, अधिक खुलते. त्यामुळेच सध्याच्या घडीला चेहऱ्याला बर्फ लावण्याचे प्रमाण वाढलेले आहे. सकाळी चेहऱ्यावर बर्फ चोळल्याने रक्ताभिसरण सुधारते, ज्यामुळे तेजस्वी आणि चमकदार त्वचा मिळते. शिवाय, ते त्वचेला शांत करते आणि आराम देते. बर्फ लावल्याने मुरुमे कमी होतात. मुरुमांच्या प्रवण त्वचेवर बर्फ लावल्याने लालसरपणा, जळजळ आणि मुरुमे दिसणे कमी होते. त्वचेवर मोठ्या छिद्रांमुळे घाण आणि इतर पदार्थ त्वचेवर चिकटून राहतात. अशा परिस्थितीत, आइस फेशियल खूप प्रभावी ठरते. उघडे छिद्र कमी करण्याचा आणि त्यांना लहान दिसण्याचा हा एक उत्तम मार्ग आहे. बर्फ नैसर्गिक टोनर म्हणून देखील काम करतो आणि अतिरिक्त सेबम उत्पादन नियंत्रित करतो. जर तुमच्या भुवया किंवा वरच्या ओठांना थ्रेडिंग किंवा ऑइल वॅक्सिंगनंतर जळजळ जाणवत असेल, तर त्यावर बर्फ लावल्याने लालसरपणा आणि त्वचेची जळजळ कमी होऊ शकते.

बर्फ त्याच्या दाहक-विरोधी गुणधर्मासाठी ओळखला जातो आणि उष्णतेशी संबंधित सूज कमी करण्यासाठी हा एक उत्तम पर्याय आहे. ते चेहऱ्यावरील, डोळ्यांभोवती आणि तोंडाभोवती सूज कमी करण्यास देखील मदत करते. मेकअप लावण्यापूर्वी एक वाटी बर्फाच्या पाण्यात ५ मिनिटे भिजवा. त्यानंतर, स्वच्छ टॉवेलने तुमचा चेहरा हळूवारपणे पुसून टाका. नंतर, मेकअप लावायला सुरुवात करा. तुमचा मेकअप जास्त काळ टिकल्याचे दिसेल. कोरियन सौंदर्य स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या बहुतेक महिला या सोप्या पण प्रभावी तंत्राचा वापर करतात. डोळ्यांखाली काळी वर्तुळे असल्यास, बर्फ लावणे हा प्रभावी उपाय आहे. याकरता गुलाबपाणी आणि काकडीचा रस मिसळू शकता, मिश्रण गोठवू शकता आणि नंतर डोळ्यांभोवती बर्फाचे तुकडे लावू शकता. असे काही वेळा केल्याने सकारात्मक परिणाम दिसून येतील. बर्फाच्या पाण्याचे अनेक पारंपारिक फायदे आहेत, ज्यात तुमच्या चेहऱ्याची त्वचा घट्ट आणि चमकदार ठेवणे आणि मुरुमे आणि काळी वर्तुळे कमी करणे समाविष्ट आहे.

# जेवणानंतर १०० पावले का चालायला हवे

रात्रीच्या जेवणानंतर चालण्यामुळे रात्रीचे जेवण आणि झोप यामध्ये अंतर राहते. तसेच मुख्य म्हणजे आपली पचनशक्ती सुधारते. रात्रीच्या जेवणानंतर फिरायला जाण्यामुळे आपली पाचन प्रणाली निरोगी राहते. पोटाशी संबंधित इतर कोणत्याही समस्येपासून आराम मिळतो. आपल्याकडे आजही जेवणानंतर लगेच झोपू नये असं सांगितलं जातं. पूर्वीची जुनी-जाणती माणसं कायम म्हणायची, की शतपावली करा. काय असेल बरं या सर्वांमागचं कारणष्ठ जेवणानंतर शतपावली करण्याची प्रथा आता बंद पडल्यातच जमा आहे. जेवणानंतर १०० पावले चालणे (शतपावली) ही एक प्राचीन आयुर्वेदिक पद्धत आहे जी पचन सुधारण्यास, रक्तातील साखर नियंत्रित करण्यास, चयापचय वाढविण्यास आणि वजन नियंत्रित करण्यास मदत करते. रात्रीच्या जेवणानंतर चालण्यामुळे झोपेची गुणवत्ता सुधारते, ताण कमी होतो आणि हृदयाचे आरोग्य सुधारते.



**शतपावली करण्यामुळे काय फायदे होतात**

शतपावली आतड्यांचे कार्य सुरळीत करते, ज्यामुळे पचन जलद होते आणि गॅस, बद्धकोष्ठता किंवा पोटफुगी कमी होते.

जेवणानंतर रक्तातील साखरेच्या पातळीत अचानक वाढ होण्यास प्रतिबंध होतो.

चालण्यामुळे कॅलरीज बर्न होतात आणि लठ्ठपणा नियंत्रित करण्यास मदत होते.

नियमित शतपावली रक्ताभिसरण सुधारते, ट्रायग्लिसराइड्स कमी करते आणि हृदयरोग टाळते.

शतपावली करण्यामुळे रातीर्ची चांगली झोप येते.


अलीकडे आपल्या घरी जाण्या-येण्याच्या वेळाच बदलल्या आणि तिथेचे आपल्या सवयीही बदलल्या. म्हणूनच शतपावली म्हणजे काय असा अनेकांना प्रश्न पडतो. शतपावली म्हणजे जेवणानंतर काही काळ चालणे. त्यालाच शतपावली असे म्हणतात. म्हणजे रात्रीच्या जेवणानंतर किमान शतपावली म्हणजे शंभर पावले चालणे हे खूपच गरजेचे आहे.

रात्रीच्या जेवणानंतर चालणे देखील रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यास मदत करते कारण ते तुमच्या प्रणालीतील विष बाहेर टाकते.

हे आपल्या अंतर्गत अवयवांसाठी चांगले कार्य करते. एक मजबूत प्रतिकारशक्ती फ्लू, सर्दी आणि इतर अनेक गंभीर आजारांपासून वाचवू शकते. शतपावली केल्याने शरीरातील एंडोर्फिन बाहेर पडून तणाव कमी होतो.

हे आपल्याला चांगले वाटण्यासाठी आणि आपला मूड सुधारण्यासाठी कार्य करते.

# आहारात पपईचा समावेश करणे का गरजेचे आहे



पपईचे झाड आयुर्वेदिक औषधांमध्ये खूप उपयुक्त मानले जाते. त्याची फळे आणि पाने मानवी आरोग्य सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. म्हणून रोज पपईचा वापर आहारात करायलाच हवा. दैनंदिन जीवनात पपईचा समावेश केल्याने, अनेक आजारांपासून बचाव होऊ शकतो. पपईच्या फळांचा आणि पानांचा असाच उल्लेख आयुर्वेदातही आढळतो. पपई हे एक अत्यंत पौष्टिक फळ आहे जे पचन सुधारण्यास, बद्धकोष्ठतेपासून मुक्त होण्यास, रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास आणि वजन कमी करण्यास मदत करते. जीवनसत्त्वे अ, क, ई आणि पपेन एंजाइमने समृद्ध असलेले हे फळ त्वचा उजळवण्यासाठी, दृष्टी सुधारण्यासाठी आणि हृदयाचे आरोग्य राखण्यासाठी विशेषतः फायदेशीर आहे. पपईच्या पानांचा काढा प्यायल्याने तुमचे आरोग्य देखील सुधारेल. पपईच्या पानांचा वापर डेंग्यूच्या तापामध्ये केला जातो. पपईच्या पानांमध्ये औषधी गुणधर्म आहेत जे प्लेटलेटची संख्या वाढविण्यास मदत करतात. म्हणून डेंग्यूच्या तापामध्ये पपईच्या पानांचा रस बनवून पिऊ शकतो.

**आहारात पपईचा समावेश करण्याचे फायदे**

पपईमध्ये असलेले पपेन एंजाइम अन्न पचवण्यासाठी, बद्धकोष्ठता आणि आम्लता दूर करण्यासाठी खूप प्रभावी आहे. व्हिटॅमिन सीचे उच्च प्रमाण रोगप्रतिकारक शक्ती वाढवते, शरीराला रोगांशी लढण्यास मदत करते. पपईमध्ये कमी कॅलरी आणि उच्च फायबर असल्याने, पोट बराच काळ भरलेले राहते. त्यामुळे वजन कमी होण्यास मदत मिळते. जीवनसत्त्वे अ आणि क ने पपई समृद्ध असते. त्यामुळे त्वचेवरील डाग जाण्यास मदत होते.

# अवघ्या विशीतच केस झालेत पांढरे

आजकाल कमी वयातच केस पांढरे होण्याची समस्या आपल्यापैकी बऱ्याचजणांना त्रास देते. बदलती लाईफस्टाईल, ताण-तणाव, चुकीचा आहार, झोपेची कमतरता आणि प्रदूषण यांसारख्या अनेक कारणांमुळे तरुण वयातच केसांचा नैसर्गिक काळेपणा कमी होताना दिसतो. पांढरे केस दिसू लागले की अनेकजण लगेच मेहेंदी, हेअर डाय किंवा केमिकलयुक्त हेअर कलरचा वापर करतात; मात्र अशा उपायांचा वारंवार वापर केल्याने केस कोरडे, कमजोर आणि निर्जीव होण्याची शक्यता वाढते. पण हे तात्पुरते उपाय केसांचे नैसर्गिक सौंदर्य आणि आरोग्य कायमचे हिरावून घेऊ शकतात.

अवघ्या विशीतच केस झालेत पांढरे? तज्ज्ञांचा सल्ला, ६ सवयी बदला-म्हातारपणापर्यंत केस राहतील काळेभोर

योग्य पोषण, नैसर्गिक घटक आणि काही सोपे घरगुती उपाय यांच्या मदतीने केस अकाली पांढरे होण्याची समस्या कमी करता येऊ शकते, असे न्यूट्रिशनिस्ट सांगतात. केसांना बाहेरून रंगवण्यापेक्षा ते मुळापासून काळे आणि निरोगी राहण्यासाठी आतून पोषण मिळणे जास्त महत्त्वाचे असते. न्यूट्रिशनिस्ट रुची चावडा अशा ६ घरगुती उपायांबद्दल सांगत आहेत, जे केसांना आतून पोषण देऊन अकाली पांढरे होणाऱ्या केसांचा वेग कमी करण्यास मदत करू शकतात.



**१. आवळ्याचा 'मॉर्निंग शॉट'** -आवळा केसांमधील नैसर्गिक रंगद्रव्य सुरक्षित ठेवण्यास मदत करतो. १ ते २ चमचे ताज्या आवळ्याचा रस किंवा अर्धा चमचा आवळा पावडर कोमट पाण्यात मिसळून प्या. शक्यतो हा उपाय सकाळी रिकाम्या पोटी केल्यास उत्तम. हे केसांना अकाली कमकुवत होण्यापासून आणि पांढरे होण्यापासून वाचवण्यासाठी मदत करतात.

**२. काळे तीळ** -काळे तीळ केसांच्या मुळांना पोषण देऊन मेलॅनिन निर्मितीला (शर्तिहग इदर्ैंगदह) मदत करतात. १ चमचा काळे तीळ रोज हळूहळू चावून खा किंवा अन्नपदार्थांमध्ये मिसळून घ्या. हा उपाय केसांची वाढ आणि रंग या दोन्ही गोष्टी मजबूत बनवण्यास मदत करतो. रोज सकाळी किंवा दुपारी एक चमचा काळे तीळ चावून खाणे केसांच्या आरोग्यासाठी उत्तम ठरते. **३. कडीपत्ता** -कडीपत्त्यात व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि अँटी-ऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात, जे हेअर फॉलिकल्सना पोषण देतात. रोजच्या आहारात कडीपत्त्याचा समावेश करा किंवा कडीपत्ता घालून बनवलेले ताक प्या. कढीपत्ता केसांच्या मुळांना मजबूत करतो आणि अकाली पांढरे होणाऱ्या केसांचावेग मंदावतो. रोज कडीपत्त्याची ८ ते १० ताजी पाने चावून खा किंवा अन्नामध्ये (फोडणीत) टाका. कडीपत्त्यामध्ये असलेले अँटी-ऑक्सिडंट्स केसांचे आरोग्य आणि सौंदर्य वाढवण्यास मदत करतात.४. अळशीच्या बिया :- अळशी ताणतणाव आणि सूजयामुळे केसांचे पांढरे होणे कमी करण्यास मदत करते. दररोज १ चमचा भाजलेल्या अळशीची पावडर दही, डाळ किंवा कोमट पाण्यात मिसळून घ्या. हे स्काल्पच्या आरोग्यासाठी आणि हार्मोनल संतुलनासाठी अत्यंत फायदेशीर असते.

**५. तांब्याच्या भांड्यातील पाणी प्या** :-तांबे हे मेलॅनिन निर्मितीसाठी अत्यंत आवश्यक असलेले खनिज आहे. तांब्याच्या भांड्यात रात्रभर ठेवलेले पाणी सकाळी प्यावे. सकाळी १ ग्लास पाणी पिणे पुरेसे आहे. हे पाणी मर्यादित प्रमाणातच प्यावे, याची काळजी घ्यावी. हे केसांचा नैसर्गिक रंग टिकवून ठेवण्यास मदत करते. **६. सातत्य सर्वात महत्त्वाचे** :-पांढरे झालेले केस पुन्हा नैसर्गिक काळ्या रंगात येणे ही कोणतीही जादू नसून, ती एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. या घरगुती उपायांचा दररोज वापर केल्यास साधारण ३ ते ६ महिन्यांत त्याचा चांगला परिणाम दिसून येऊ शकतो.

# नात्यातील गुंतागुंत



विजय पांढरीपांडे

आरशावरची धूळ नीट पुसल्या शिवाय जसं काहीच स्वच्छ दिसत नाही तसंच स्वतचे गुणदोष पडताळून पाहिल्या शिवाय नात्यातील धूसरता कमी होत नाही. नात्यातील गुंतागुंत सुधारताना हे आत्मपरीक्षण जास्त महत्त्वाचे ठरते. किंबहुना आपण सुधारल्याशिवाय दुसऱ्याला सांगण्याचा हक्क आपल्याला प्राप्त होत नाही. अति परिचयात अवज्ञा अशी एक म्हण आहे. कुठल्याही गोष्टीचा अतिरेक हा वाईटच. मग त्यात मानवी संबंधदेखील आले. जेव्हा दोन व्यक्ती खूप जवळ येतात, त्यांना एकमेकांचे स्वभाव, गुणदोष माहिती होतात, आतले उणेदुणे उसळून बाहेर येते तेव्हा आपोआप संबंधात दऱ्या पडायला लागतात. कुटुंबातील प्रत्येक नाते जवळीक वाढली की काळानुसार उसवत जाते.

बाहेर समाजात मित्रांच्या बाबतीत, कामाच्या जागी सहका-यांच्या बाबतीतही तेच घडू शकते. आपण कुणावर आंधळा विश्वास टाकतो पण ती व्यक्ती विश्वासार्ह नसते. आपल्या, मोकळेपणाचा गैरफायदा घेतला जातो. आपण दिलेल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग केला जातो. आपल्याच सहृदांकडूनष्ठ मित्राकडूनष्ठ आपला विश्वासघात होतो. आपल्याला समज येते तोपर्यंत उशीर झाला असतो. आश्चर्य म्हणजे, अशा चुकापासून आपण फारसे काही शिकत नाही. त्याच त्या चुका आपण पुनः पुन्हा करत जातो. हा मानवी स्वभाव आहे. फार कमी असे असतात जे ठेच लागल्यावर सावध होतात, शहाणे होतात. आपल्याला वाटते, आपलेच चुकले असेल. आपणच कुठेतरी कमी पडलो असणार दुस?यांना समजून घ्यायला. आपणच कधी कधी स्वतला समजावण्याचा प्रयत्न करतो. करेक्टिव मेजर्स घेण्याचा म्हणजेच चुका सुधारण्याचा प्रयत्न करतो. यात वाईट काहीच नाही.पण मानवी संबंध हा वन वे ट्रफिक नाही. दुसरीकडूनही तोच, तसाच पॉझिटिव्ह प्रतिसाद अपेक्षित असतो. टाळी एका हाताने वाजत नाही. म्हणजे एकतर्फी प्रयत्नांना अर्थ नसतो. समोरूनही तसाच पॉझिटिव्ह प्रतिसाद अपेक्षित असतो. पण ते होत नाही सहसा. माणसे अहंकारी असतात. माझेच खरे, मीच बरोबर हा समोरच्याचा दुराग्रह असतो. अशा वेळी टाळी वाजत नाही. संबंध पुढे जात नाहीत.एक प्रकारचे कुंपण निर्माण होते दोन व्यक्तीत. ते पार करणे दोघांनाही कठीण जाते. पाहिले पाऊल कुणी उचलायचे, माघार कुणी घ्यायची, चूक कुणी आधी कबूल करायची असे हट्टी अहंकार दोघातले अंतर कमी करण्याऐवजी वाढवत जातात.

क्षमाशील असणे हा एक उपाय आहे. दुसऱ्याआधी आपणच स्वतला तपासणे हेही गरजेचे आहे. कधी कधी आपल्या चेहऱ्यावरचे डाग आपल्याला दिसत नाहीत आरशात पाहिल्याशिवाय, आरशावरची धूळ नीट पुसल्याशिवाय! हे आत्मपरीक्षण जास्त महत्त्वाचे संबंध सुधारायच्या प्रक्रियेत. आधी स्वतला सुधारा. पुढचा नंतर सुधारेल.किंबहुना आपण सुधारल्याशिवाय दुसऱ्याला सुधारण्याचा हक्क आपल्याला प्राप्त होत नाही. मीच खोटे बोलत असेन, मीच मोठ्याने ओरडत असेन तर मला समोरच्या व्यक्तीने चांगले वागावे, प्रामाणिक असावे असा आग्रह धरता येणार नाही. मला तसा नैतिक अधिकार प्राप्त होत नाही.संघर्ष, ताणतणाव, मतभेद निर्माण होण्याचे मुख्य कारण म्हणजे, आपल्याला सगळे काही शतप्रतिशत परफेक्ट हवे असते. तडजोडीची आपली तयारी नसते अन् प्रत्यक्षात हे शक्य नसते. इंजिनीयरिंगचे उदाहरण द्यायचे झाले तर ज्याला आयडियल रिस्पॉन्स किंवा रिझल्ट म्हणतो ती अशक्यप्राय गोष्ट समजली जाते. प्रॅक्टिकल रिझल्ट हे नेहमीच खालच्या पातळीवर असतात आयडियल रिझल्टच्या तुलनेत. त्या दोघांतील जो फार फरक असतो त्याला एरर म्हणतात. हा एरर कमी कसा करायचा यातच इंजिनीयरिंग कसब असते. शहाणपण, कौशल्य असते. मानवी नातेसंबंधाचेही तसेच आहे. पूर्णत्व, आदर्श, परफेक्ट हा हव्यास, ध्यास चुकीचा. एखादी वाट आपल्या योग्य नसली तर दुसरा मार्ग शोधा. ही दुसरी वाट अधिक योग्य ठरू शकते. दुसरा उपाय हा की, सारे काही नव्याने पुन्हा सुरू करणे. मागचे विसरून जायचे सगळे. झाले गेले गंगेला मिळाले म्हणत. नव्याने पुन्हा सुरू करायचे नाते. कोऱ्या पाटीवर नवा अध्याय लिहायचा. सगळे पूर्वग्रह विसरून, जुन्या चुकांची पुनरावृत्ती न करता, कसलेही पूर्वग्रह न बाळगता नव्याने तेच गणित सोडवायचे. एक गाणं आहे, त्यात कवी म्हणतो- चलो एक बार फिरसे अजनबी बन जाये हम दोनो छान सल्ला दिलाय कवीने. एकाच ठिकाणी कुंठीत बसू नका. तेच ते जुने कोळसे उगाळीत बसू नका. पुढे पाऊल टाकत नवी वाट शोधा. हवी ती मंजिल नक्की सापडेल. पुन्हा शेवटी इंजिनीयरिंगचेच तत्त्व सांगतो. प्रत्येक समस्येला उत्तर असतेच. एक नव्हे, तर अनेक उत्तरे असतात. आपल्या सोयीचे, आपल्याला योग्य वाटेल ते आपले उत्तर आपणच शोधायचे असते. तेही तडजोडीची तयारी ठेवून!

# सौर ऊर्जेचे 'वास्तव'



प्रसाद ताम्हनकर

नैसर्गिक, अक्षय आणि प्रदूषणमुक्त असलेली सौर ऊर्जा ही नैसर्गिक ऊर्जा स्रोतांमध्ये अतिशय महत्त्वाची मानली जाते. कोळशासारख्या घातक इंधनावरचे अवलंबित्व कमी करण्यात सौर ऊर्जेचा मोठा वाटा आहे. हिंदुस्थानचा विचार केल्यास गेल्या अवघ्या दशकभराच्या अवधीत आपला देश जगातील तिसरा सौर ऊर्जा उत्पादक देश बनला आहे. हे कामगिरी नक्कीच कौतुकास्पद आहे. आज ऊर्जेचा वापर एकूण वापराच्या २० टक्क्यांवर पोहोचला आहे. सरकारी आकडेवारीनुसार सध्या अनुदान योजनेअंतर्गत एकूण २४ लाख घरांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प बसवण्यात आले आहेत.

सौर ऊर्जा पार्क, घराघरावर आणि सोसायटीच्या छतांवर दिसू लागलेले सौर ऊर्जा प्रकल्प हे नक्कीच समाधान देणारे आहेत. सध्या अनेक घरे, सोसायट्या या प्रकल्पांमधून वीजनिर्मिती करत आहेत आणि ग्रिडमध्ये देखील पाठवत आहे. शुद्ध स्वरूपाची म्हणून ओळखली जात असलेली ह्या ऊर्जानिर्मितीचे व्यवस्थापन जर नीट पद्धतीने केले गेले नाही, तर पुढे पर्यावरणासाठी ते किती धोकादायक ठरणार आहे ह्या संदर्भात अनेकांना कल्पना नाही आणि त्यावर फारशी चर्चा होतानादेखील दिसत नाही. सौर ऊर्जा उत्पादनात महत्त्वाची भूमिका बजावणारे सौर पॅनेल्स हे चांदी, पॉलिमर, ॲल्युमिनियम अशा धातूंच्या मदतीने बनवले जातात. सौर पॅनेलच्या बहुतेक भागांचा पुनर्वापर शक्य असतो.

मात्र ह्यामध्ये असलेले शिसे आणि कॅडमियम हे धातू विषारी असून, त्यांचे प्रमाण जरी कमी असले तरी योग्य प्रकारे न हाताळले गेल्यास त्यांच्यापासून पाणी आणि माती प्रदूषित होण्याचा मोठा धोका असतो. सौर पॅनेल्स साधारण २५ वर्षे कार्यरत राहतात आणि त्यानंतर ती काढून टाकली जातात. हिंदुस्थानचा विचार केल्यास सध्या आपल्याकडे अशा सौर कचऱ्याच्या पुनर्वापर प्रक्रियेसाठी स्वतचे असे कोणतेही ठोस बजेट नाही. जुन्या झालेल्या सौर पॅनेल्सवर प्रक्रिया करणारी काही लहान केंद्रे आहेत, पण त्यांची संख्या फार कमी आहे.

सध्या आपल्या देशात किती सौर कचरा आहे त्याची कोणतीही अधिकृत आकडेवारी उपलब्ध नाही. मात्र एका अभ्यासानुसार सौर ऊर्जेचा वाढता वापर बघता देशात २०३० पर्यंत ६ लाख टन सौर कचरा निर्माण होऊ शकतो. तर ऊर्जा, पर्यावरण आणि पाणी परिषदेच्या नव्या अभ्यास अहवालानुसार देशात २०४७ पर्यंत १.१ कोटी टन कचरा निर्माण होण्याची शक्यता आहे.

ही आकडेवारी नक्कीच धोकादायक म्हणावी अशी आहे. ह्या कचऱ्याचे व्यवस्थापन आणि पुनर्वापर ह्यासाठी लागणाऱ्या यंत्रणांवर आताच गुंतवणूक करायला सुरुवात केली नाही तर देशाला सौर कचऱ्याच्या एका नव्या आणि धोकादायक समस्येला तोंड द्यावे लागणार आहे. देशात मोठं मोठी सौर उद्याने ही २०१० सालात बांधण्यात आली होती. त्यामुळे येणाऱ्या १० ते १५ वर्षात सौर कचऱ्याच्या खऱ्या समस्येची ओळख सामान्य लोकांना होऊ लागेल. सौर कचऱ्याचे योग्य नियोजन करणे, त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे ह्यासाठी विशेष प्रकारच्या ३०० रिसायकलिंग केंद्राची गरज देशाला भासणार आहे. या सर्वासाठी पुढील २० वर्षात देशाला अंदाजे ४७.८० करोड डॉलर्स (४७८ दशलक्ष रुपये) येवढी प्रचंड गुंतवणूक करावी लागणार आहे. मात्र काही तज्ञांच्या मते हिंदुस्थानात तयार होणारा सौर कचऱ्याचा आकडा हा अमेरिका आणि चीन सारख्या महासत्तांशी मिळता जुळता असणार आहे. २०३० सालापर्यंत अमेरिका आणि चीन दोघेही १० लाख टनांपर्यंत सौर कचरा निर्माण करू शकतील.

सौर कचऱ्याच्या योग्य नियोजनाबद्दल काही तज्ञ पूर्णपणे आशावादी आहेत. सौर ऊर्जेचा वाढत्या वापरामुळे सौर कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणाऱ्या जाणकार कंपन्यांची देखील मागणी वाढेल अशा परिस्थितीत ह्या क्षेत्रातील वाढती गुंतवणूक, जाणकारांची मोठी संख्या, वेगाने बदलणारे तंत्रज्ञान, लोकांचा सहभाग अशा सर्वांमुळे सौर कचऱ्याची समस्या फारसे गंभीर रूप घेणार नाही आणि तिच्याशी आपण सहजपणे सामना करू शकू अशी त्यांना खात्री आहे. दोन्ही बाजूंची मते भिन्न असतीलदेखील, मात्र समस्या निवारण्यासाठी आतापासूनच प्रयत्न सुरू करायला हवे हे नाकारता येणार नाही.

# चंद्रग्रहणाचे प्रकार किती आणि कोणते?

शुभम कुळकर्णी

३ मार्चला चंद्रग्रहण होणार आहे. हे वर्षातील पहिले चंद्रग्रहण आहे. हे संपूर्ण चंद्रग्रहण असेल. या वेळी चंद्राचा रंग आकाशात लाल दिसेल. हे एक अद्भुत दृश्य असेल. हे ग्रहण जगाच्या मोठ्या भागात पाहता येईल. पण, चंद्रग्रहणाचे किती प्रकार आहेत, याविषयी आज आम्ही तुम्हाला माहिती देणार आहोत, चला तर मग जाणून घेऊया.

चंद्रग्रहण

सुपर-शॅडो चंद्रग्रहण हे पृथ्वीची सावली मानले जाते, ज्यामध्ये चंद्राच्या आकारावर कोणताही परिणाम होत नाही. यामध्ये चंद्रप्रकाशात किंचित अंधुक आहे. म्हणजे चंद्रप्रकाश थोडा अंधुक असेल, पण तो ओळखणे कठीण होईल. रंग थोडा गोंधळलेला असू शकतो. विज्ञानानुसार, जेव्हा सूर्य, पृथ्वी आणि चंद्र रेषेत येऊ शकत नाहीत तेव्हा असे ग्रहण होते. पृथ्वी सूर्यप्रकाशाचा काही भाग चंद्राच्या पृष्ठभागावर पोहोचण्यापासून रोखते. मग पृथ्वी चंद्राचा संपूर्ण बाह्य पृष्ठभाग व्यापते, ज्याला पेनम्ब्रा म्हणतात. अशा चंद्राला पौर्णिमेच्या चंद्रापासून वेगळे करणे कठीण आहे.

**खग्रास चंद्रग्रहण**

खग्रास चंद्रग्रहणात सूतक कालावधी वैध असतो आणि ग्रहणाच्या वेळेच्या १२ तास आधीचा सूतक कालावधी असतो. जेव्हा पृथ्वी चंद्र आणि सूर्याच्या मध्ये येते आणि पृथ्वी चंद्राला पूर्णपणे व्यापते तेव्हा खग्रास चंद्रग्रहण होते. त्या वेळी खग्रास चंद्रग्रहण होते. त्यावेळी चंद्राचा रंग पूर्णपणे लाल दिसू लागतो आणि चंद्राचे डागही स्पष्टपणे दिसू लागतात..

**खंडग्रास चंद्रग्रहण**

जेव्हा पृथ्वी सूर्य आणि चंद्राच्या पूर्णपणे दरम्यान येत नाही आणि पृथ्वीची सावली चंद्राच्या एखाद्या भागावर पडते तेव्हा खंडग्रास चंद्रग्रहण होते. अशा परिस्थितीला खंडग्रास चंद्रग्रहण असे म्हणतात. त्याचा कालावधी फार मोठा नसतो, परंतु सूतकच्या नियमांचे पालन करावे लागते.

**चंद्रग्रहण कधी दिसणार?**

ग्रहण संपूर्ण आशिया आणि ऑस्ट्रेलियामध्ये पाहता येईल. हे चंद्रग्रहण पॅसिफिक बेटे आणि उत्तर आणि दक्षिण अमेरिकेतही दिसेल.

भारतीय वेळेनुसार हे चंद्रग्रहण दुपारी ०३.२० ते ०६.४७ या वेळेत असेल. दीर्घ कालावधीमुळे हे ग्रहण वेगवेगळ्या टाईम झोनमध्ये दिसेल.

**चंद्रग्रहण कसे पाहू शकता?**

सूर्यग्रहण थेट उघड्या डोळ्यांनी पाहू नये, तर चंद्रग्रहण उघड्या डोळ्यांनी पाहण्यास पूर्णपणे सुरक्षित आहे. चंद्रग्रहण पाहण्यासाठी विशेष चष्म्याची आवश्यकता नाही. तथापि, अभ्यास करणारे खगोलशास्त्रज्ञ निश्चितपणे दुर्बिणी किंवा दुर्बिणीसारख्या उपकरणांचा वापर करतात. तुम्ही तज्ज्ञांचा सल्ला घेतल्याशिवाय उघड्या डोळ्यांनी ग्रहण पाहू नका.



# नवलच! ऑक्... छी.....!



शीर्षकातला आवाज 'शिंक' येते तेव्हाचा. वास्तविक अशा 'स्वरां'ना शब्दबद्ध करणंच मुळी कठीण. पण त्यातल्या त्यात सर्वमान्य आवाज असाच असावा. कुणी ऐकू येईल न् येईल असं शिंकतो तर कोणी सातमजली बिकट आवाज काढतही शिंकतो. मर्जी ज्याची त्याची. मात्र शिंक एकदा येऊ घातली की टाळता येत नाही हे खरंच. एका स्वरमैफलीच्या सुरुवातीला पहिल्याच रांगेत बसलेले गृहस्थ ऑक्ष्ठ छी करून शिंकले. श्रोते अर्थातच हसले. बुवाही मिष्किल. ते म्हणाले, 'तरी बरं, हेच शिंकलेष्ठ माशी शिंकली असती तर मैफल गुंडाळावी लागली असती!' गंमत जाऊ द्या. पण माशी 'शिंकते' हा शोध ज्याने लावला तो धन्य होत.

माणसाची शिंक मात्र अभ्यासाचा, निरीक्षणाचा विषय होऊन त्याविषयीच्या विस्मयकारी नोंदीही 'गुगल'सारख्याच ठिकाणी सापडतील. सर्दी होण्याची पूर्वसूचना म्हणून शिंक येते असं पूर्वी मानलं जायचं, परंतु बदलत्या (आणि बिघडत्या) हवामानात 'ॲलर्जी' किंवा एखाद्या गोष्टीचं 'वावडं' निर्माण झालं तरी शिंका येतात. धूळ हवेतील रसायनं, कसलासा बरा-वाईट उग्र वास किंवा फुलाफळांमधले परागकण (पोलन ग्रेन) यांच्या 'वावडय़ा' ('ॲलर्जी') शिंक किंवा एकदम पाच-पन्नास शिंका येतात. एरवीही जेव्हा कोणालाही शिंक येते तेव्हा शिंक देण्याचा 'वेग' ताशी १६० किलोमीटर एवढा प्रचंड असतो. कुठला तरी नकोसा सुक्ष्मकण श्वसनात आलाय हे कळताच तो चटकन बाहेर टाकण्याची आज्ञा मेंदू देतो आणि नाकातील M}&sMमल त्वचा हुळहुळून खाट्कन शिंक येते!

एका शिंकण्यातून सुमारे २० हजार ते १ लाख सुक्ष्म जलकण वेगाने बाहेर पडतात आणि ते सुमारे वीस फुटापर्यंत दूरवर पसरतात! म्हणूनच कोणत्याही कारणाने शिंका येणा?यांनी 'रुमाल' नावाचे नासिकावस्त्र जरूर जवळ बाळगावे. कारण शिंक काही व्हायरस आसपास पसरवू शकते आणि अगदी जवळच्या माणसांना सर्दीची लागणही होण्याचा संभव असतो. शिंकताना किंवा खोकताना लगेच रुमालाचा वापर करावा असं अगदी प्राथमिक शाळेत शिकवलं जातंष्ठ पण 'शिंक संप्रदाया'तील मंडळी अशा सूचना नेहमीच पाळतात असं नाही. एरवी, नको त्या ठिकाणी नाक खुपसू नये हे ठीक, पण शिंक येत असताना (आपल्याच) हात रुमालात जरूर खुपसावं. त्याने इतरांचंही भलं होईल!

# लशीवरून 'लक्ष्य नको'




करोनाकाळात बचावात्मक उपाय म्हणून दिल्या गेलेल्या, भारतात निर्माण झालेल्या स्वदेशी लशींवरून एक वेगळेच राजकारण सुरू आहे. निमित्त ठरले, कर्नाटकमधील हासन जिल्ह्यात हृदयविकाराच्या धक्क्याने झालेले २३ मृत्यू. आपल्या देशात हृदयविकाराने मृत्यू होण्याचे प्रमाण काळजीत टाकणारे आहे. मात्र, हासन जिल्ह्यातील चित्र वेगळे होते. तेथे २८ मे ते २९ जून या काळात ज्यांचे मृत्यू झालेत, त्यातील बहुतांश रुग्ण हे १८ ते ४१ या वयोगटातील होते. यात काही ज्येष्ठ नागरिकांचाही समावेश होता. मागील दोन वर्षांत बेंगळुरू येथील जयदेव इन्स्टिट्यूट ऑफ कार्डिओव्हॅस्क्युलर सायन्सेस अँड रिसर्च या रुग्णालयात हृदयविकाराच्या तक्रारींसाठी दाखल होणाऱ्या रुग्णांची संख्या आठ टक्क्यांनी वाढली आहे. कमी वयात हृदयविकाराच्या धक्क्याने नागरिकांचे मृत्यू झाल्याने जिल्हा प्रशासन तातडीने कामाला लागले. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनीही या मृत्यूंची नोंद घेतली. 'करोना लशीला घाईघाईने मंजुरी देणे आणि वितरित करणे हेदेखील या मृत्यूंचे एक कारण असू शकते,' अशी टिप्पणी करून टाकली. एका राज्याच्या मुख्यमंत्रिपदी असलेल्या व्यक्तीने करोना लशींच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित केल्यामुळे केंद्र सरकारने ताबडतोब दखल घेत हा दावा खोडून काढला. 'आयसीएमआर' आणि 'एम्स'च्या विस्तृत अभ्यासांचा हवाला देत करोनाच्या लशी पूर्णपणे सुरक्षित असल्याचे स्पष्ट केले. हासन जिल्ह्यात झालेल्या मृत्यूंमागे इतर कारणे असू शकतात, असे सांगितले. दुसरीकडे, या मृत्यूंचा अभ्यास करण्यासाठी कर्नाटक सरकारने एक समिती स्थापन केली आहे. सध्या केंद्रात भाजपचे सरकार आणि कर्नाटकमध्ये काँग्रेसचे सरकार आहे. हृदयविकाराच्या मृत्यूंसाठी केंद्र सरकारच्या, म्हणजेच भाजपच्या नेतृत्वातील सरकारच्या परवानगीने तयार करण्यात आलेल्या लशी जबाबदार असल्याचे विधान सिद्धरामय्या यांनी कोणत्या आधारावर केले, हे त्यांनी स्पष्ट करायला हवे. आरोग्याबाबत सरसकट विधाने योग्य नाहीत. अशाप्रकारे लशींवरून राजकीय लक्ष्य साधणे योग्य नाही.

करोना प्रतिबंधक लशींबाबत, तिच्या शरीरावरील दूरगामी परिणामांबाबत साशंकता आहे. ही नेटाने दूर करण्याची खरी गरज आहे. लशींसारख्या गंभीर विषयात राजकीय आरोप-प्रत्यारोप अपेक्षित नाहीत.